एप्रिल २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य



## महामानव

आपला आदर्श : आपली प्रेरणा



# महामानव

आपला आदर्श : आपली प्रेरणा

# भीमराव रामजी आंबेडकर

अभावग्रस्त समाजाची अस्मिता जागृत करण्याची शक्ती डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात आहे. मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे या तत्त्वज्ञानाने सर्वश्रेष्ठ मूल्य मानलेले आहे. हे सारे कवी आंबेडकर प्रणीत समाजक्रांतीचे पूत्र आहेत.

आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस
तो सुईदोरा कुठे ठेवलास
गांजलेल्या जन्मांना नरकातून ओढून
पोटाशी घेतले.
ती माऊलीची माया तू कुणाजवळ ठेवलीस
सगळ्या मापदंडांनी चरणरज व्हावे
असा तुझा बुलंद आवाज तू कुठे ठेवलास
अरे मी ज्याची भक्ती करावी, शक्ती करावी
ते तुझे इमान तू कोठे ठेवलेस
आणि मला समजून घेऊ शकेल
ते तुझे सागराएवढे शहाणपण
तू कुठे ठेवलेस
ज्यांच्यावर विनम्र होऊन मी ललाट ठेवावे
ते तुझ्या चरणांचे युद्धतीर्थ तू कुठे ठेवलेस
असत्याला, ढोंगाला लाथांनी तुडवणारे
तुझे ते कठोर निर्णयशास्त्र कुठे ठेवलेस
अरे या मनूच्या मुलांनाही माणूस होणे
भागच पडेल
अशी तुझी ती जहाल घटना
तू कुठे ठेवलीस
परमेश्वराच्या प्रेतावर बसून
कर्मविपाकाला माती दिलीस
ती अनेकांना हैराण करणारी युगंधर जिद्द
तू कुठे ठेवलीस
अरे या बेशरम अत्याचारांना फाडताना
आम्ही विजयी होऊत
असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस,
कुठे ठेवलेस?

**- यशवंत मनोहर**

(लोकराज्य ऑक्टोबर २००६च्या अंकातून पुनर्प्रकाशित)

वर्ष ६६ वे | अंक १० | एप्रिल २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम, नितीन कुटे

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हूतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग





## घटनेचे शिल्पकार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एक श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ होते. त्यांनी जगातील अनेक देशांच्या संविधानांचा अभ्यास केला होता. त्यांचा कायदा आणि संविधानाबाबत सूक्ष्म आणि सखोल अभ्यास होता. अप्रतिम आणि अद्वितीय असे भारतीय संविधान लिहिल्याबद्दल अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने मानद पदवी देऊन त्यांचा उचित गौरव केला. ७



## देशभरात उभारणार उद्योगाचे जाळे

केंद्रीय रसायने आणि खते राज्यमंत्री हंसराज अहिर त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या विभागांना सक्षम आणि आधुनिक करण्यावर अधिकाधिक भर देणार आहेत. देशभर उद्योगांचे जाळे उभारण्याचा त्यांचा संकल्प आहे. २४



## सर्वसमावेशक आणि दिशादर्शक

२०१५-१६च्या अर्थसंकल्पातून समाजातील प्रत्येक घटकांसाठी प्रयत्न करताना सरकारने अनेक नवीन योजनांची घोषणा केली आहे. अशा सर्वसमावेशकतेतूनच 'मेक इन महाराष्ट्र'ची बीजेही रोवली गेली आहेत. २०



## पारदर्शकतेला महत्त्व

संघटनात्मक कामाचा दीर्घ अनुभव असणारे आणि सहकार, वस्त्रोद्योग व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) अशी महत्त्वाची खाती सांभाळणाऱ्या चंद्रकांतदादा पाटील यांनी या सर्व विभागांना नवसंजीवनी देण्याचा निर्धार केला आहे. २६



## लोकहिताची ऊर्जा

'एक दिवस मंत्र्यांसोबत' या सदरासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्यासोबत राहून त्यांचा दिनक्रम जाणून घेण्यात आला. २८



## निर्मळ आपुलकी, आस्था....

यवतमाळ जिल्ह्यातील एका छोट्या गावात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रात्रीचा मुक्काम करून गावकऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. ३०

## प्रबोधनाचा दीपस्तंभ



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित विशेष लेख. ४२

## समृद्ध वारसा


महाराष्ट्रातील गडकिल्ले हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेचा अमूल्य ठेवा आहे. या गडकिल्ल्यांची ओळख करून देणारे नवे सदर. ४४

## याशिवाय

- अद्भुत जलसृष्टी
- ज्ञानदीप लावू जगी
- **निरामय :** आला उन्हाळा आरोग्य सांभाळा
- **भ्रमंती:** एक गाव कासवांचे - नयनरम्य वेळास
- **प्रेरणा :** संघर्षातून यशाकडे
- दिल्लीतील महाराष्ट्र



## सप्रेम नमस्कार




### सुंदर अंक

लोकराज्यचा मार्चचा अंक अतिशय सुंदर झाला आहे. याबद्दल संपूर्ण लोकराज्य टीमचे मन:पूर्वक अभिनंदन. आर. आर. आबांवरचे लेख छान आहेत. मुलाखती आणि सदरे नेहमीप्रमाणेच वाचनीय आहेत. छपाईबद्दल तर बोलायचेच काम नाही इतकी छान होत आहे. नव्या शासनाचा (राज्य तसेच केंद्र) कौशल्य शिक्षण व विकासावर भर राहणार आहे. त्यामुळे यावर एखाद्या नामांकित व्यक्तीचे, तज्ज्ञांचे सदर सुरू झाले तर युवक वाचकांना ते उपयुक्त ठरेल असे वाटते.

**– उमेश काशीकर, मुंबई**

### ज्ञानात भर

लोकराज्य हे मासिक वाचनीय तर असतेच शिवाय ज्ञानात भर घालणारे असे कौटुंबिक मासिक आहे. फेब्रुवारी २०१५ च्या अंकातील 'ग्लोबल महाराष्ट्राची डायनामिक झेप', 'आपले सरकार', 'उद्योगांना नवसंजीवनी', कौशल्य विकास नवा मंत्र प्रगतीचा, 'रेल्वे फास्ट ट्रॅकवर' या वाचनीय लेखाबरोबरच नितीन शिंदे लिखित एक दिवस मंत्र्यासोबत–सुयोग्य नियोजन आणि कामाचा झपाटा हा आदरणीय उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा खास लेख उल्लेखनीय आहे.

**– नंदकुमार रोपळेकर, मुंबई**

### महाराष्ट्राची भरारी

लोकराज्य फेब्रुवारी २०१५ अंक वाचला. या अंकातून महाराष्ट्राची ग्लोबल भरारी आणि महाराष्ट्राची जगातील एक नवीन ओळख वाचायला मिळाली. 'आपले सरकार' या वेबपोर्टलची माहिती खूप आवडली.

**– साईनाथ जोगदंड, बीड**




### सर्वांगसुंदर


'लोकराज्य'चा फेब्रुवारी २०१५ चा अंक सर्वांगसुंदर असून त्यातील महाराष्ट्राची ग्लोबल भरारी, राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'ॲट होम भेट', 'अतिथी देवो भव' या परंपरेची आठवण करून देते. 'मेक इन महाराष्ट्र', 'ग्लोबल महाराष्ट्राची डायनॅमिक झेप' असे लेख सरकारच्या योजना आणि कार्यद्धतीवर प्रकाशझोत टाकतात.

**– अनंत सुतार, चिपळूण**

### घडत राहो नवीन महाराष्ट्र

जानेवारीचा नव्या वर्षाचा नव्या संकल्पनेचा 'लोकराज्य' आवडला. आतील पहिल्याच फोटोत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस बुद्धिबळाच्या (महाराष्ट्राच्या) पटावरील पहिली चाल खेळताना बरेच काही सांगून जातात. घोषणा नव्हे कृती आराखडा, आपले मंत्री महोदय, मंत्री व त्यांच्या खात्यांचा परिचय माहितीपूर्ण आहे.

**– किशोर मंदाळ**




### उपयुक्त माहिती

लोकराज्य फेब्रुवारी २०१५ या अंकात 'बदलता महाराष्ट्र' व 'मेक इन इंडिया' मध्ये महाराष्ट्राचा सहभाग याबाबत सविस्तर माहिती मिळाली. तारांकित व इतर माहिती उपयुक्त असून राज्य सरकारच्या योजना कळण्यास मदत झाली.

**– किशोर झोटे, औरंगाबाद**

### आरोग्याची माहिती

जानेवारी २०१५ मधील लोकराज्यमध्ये 'सांभाळा आपल्या हृदयाला' हा लेख खूप माहितीपूर्ण आहे. त्यातील हृदयाची आकृती १२ वी सायन्समधील जीव–शास्त्राच्या विद्यार्थ्यांना खूप उपयुक्त व सहजासहजी काढता येण्यासारखी आहे.

**– अलका लोखंडे, सांगली**

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा. **पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# संधी नव्या प्रगतीच्या

जगातील श्रेष्ठ घटनांमध्ये आपल्या देशाच्या घटनेचा समावेश होतो. समता, बंधुभाव आणि न्याय ही तत्त्वे आपल्या घटनेचा भक्कम पाया आहे. समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांना विकास आणि प्रगती साध्य करण्याची समान संधी घटनेने दिली. या घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'लोकराज्य'च्या या अंकात या महामानवाच्या कर्तृत्वाचे विविध पैलू दर्शवणारे विशेष लेख समाविष्ट केले आहेत.

राज्याच्या अर्थव्यवस्थेला ऊर्जितावस्था देण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. **मेक इन महाराष्ट्र, मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना, आमदार आदर्श गाव विकास योजना, डिजिटल महाराष्ट्र, भाग्यश्री योजना** या नावीन्यपूर्ण योजनांसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राला एका नव्या उंचीवर नेण्यासाठी हा अर्थसंकल्प उपयुक्त ठरणार आहे.

राज्याला गडकिल्ल्यांचा वैभवशाली वारसा लाभला आहे. या वारशाची जपणूक, जतन आणि संरक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषगांने स्थापण्यात आलेल्या समितीचे प्रमुख मार्गदर्शक आणि ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ निनाद बेडेकर महाराष्ट्रातील गडकिल्ले या लेखमालिकेद्वारे या समृद्ध वारशाचा परिचय करून देणार आहेत. नव्या पिढीमध्ये साहसयुक्त भ्रमंतीची आवड निर्माण करण्यास ही लेखमाला उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

लोकराज्यचे इंग्रजी भावंड असणाऱ्या **महाराष्ट्र अहेड** या नियतकालिकामुळे आपल्या राज्याची महती इतर प्रांतात प्रभावीपणे पोहोचत आहे. आमचे वेबपोर्टल **महान्यूजला** आतापावेतो दोन कोटींच्या आसपास नेटिझन्सनी भेटी दिल्या आहेत. सह्याद्री वाहिनीवरील **जय महाराष्ट्र** या कार्यक्रमाचे ७४२ भाग प्रक्षेपित झाले आहेत. आकाशवाणीवरील **दिलखुलास** कार्यक्रमाचे २२४१ भाग प्रसारित झाले आहेत. या दोन्ही कार्यक्रमांद्वारे शासनाशी संबंधित उपयुक्त माहिती जनसामान्यांपर्यंत थेट पोहोचण्यास साहाय्य होत आहे.

इतर अंकाप्रमाणेच हा अंकही आमच्या वाचकांस आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

विशेष संपादकीय

# अभिवादन महामानवाला

**१४** एप्रिल २०१५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२४ वी जयंती साजरी होत आहे. यानिमित्त त्यांनी देशाच्या जडणघडणीत जे महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न यानिमित्त लोकराज्यमध्ये करण्यात आला आहे.

संविधान समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने घटनेच्या निर्मितीमध्ये त्यांचे अमूल्य योगदान आहे. लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीबाबत घटनासमितीच्या २५ नोव्हेंबर १९४९ रोजी त्यांनी केलेल्या भाषणात ते म्हणतात. 'आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट होऊन चालणार नाही. राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीतही केले पाहिजे. सामाजिक लोकशाहीचा आधारभूत पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही फार दिवस टिकाव धरू शकत नाही. समता, स्वातंत्र्य व बंधुभाव निर्माण करणाऱ्या जीवन पद्धतीस सामाजिक लोकशाही म्हणतात.' सामाजिक लोकशाहीचा हा मंत्र अंगीकारूनच राज्य शासनाने २०१५ च्या अर्थसंकल्पात मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद केली आहे. एवढेच नव्हे तर उच्च शिक्षण घेत असताना लंडन येथील त्यांच्या वास्तव्याने पुनीत आलेल्या वास्तूचे जतन करणे व इंदू मिलच्या जागेवर डॉ. आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्याचा सरकारने संकल्प केला आहे. त्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त त्यांना ही राज्य शासनाची आगळीवेगळी श्रद्धांजली ठरेल, यात शंका नाही.



संविधान निर्मिती आणि दलित शोषितांच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची चर्चा नेहमी होत असते. परंतु भारताच्या औद्योगिक प्रगतीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासातही त्यांचा मोठा वाटा आहे. केंद्र आणि राज्य सरकार आज देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी अतिशय वेगाने कामाला लागले आहे. यासाठी लागणाऱ्या वीज आणि पाणी या मूलभूत सुविधांची मुहूर्तमेढ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२-४६ यादरम्यान महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून रोवली. २० जुलै १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांचा महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेत समावेश करण्यात आला. कामगार, सिंचन, ऊर्जा, सार्वजनिक बांधकाम व खाण या खात्यांसह युद्धोत्तर काळातील आर्थिक नियोजन प्रामुख्याने जलसंपत्ती व जलविद्युत विकास यासंबंधीचे धोरण ठरविण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दोन्ही घटकांच्या विकासासाठी त्यांच्या अधीनस्थ श्रम विभागामार्फत महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. अतिरिक्त पाणी हे मानवी संकट आहे अशी धारणा त्याकाळी प्रचलित होती. डॉ. आंबेडकरांच्या मते मनुष्य अतिरिक्त पाण्यापेक्षा त्याच्या अभावामुळे जास्त त्रास सहन करतो. त्यामुळे अतिरिक्त पाणी हे मानवी संकट नसून पाण्याचे योग्य नियोजन केल्यास 'जल' ही मानवी संपत्ती आहे, ही संकल्पना त्यांनी सर्वप्रथम भारतात रुजविली. अतिरिक्त पाण्याचे प्रबंधन केवळ पूर प्रतिबंधक स्वरूपाचे न राखता त्याला बहुद्देशीय प्रकल्पाचे स्वरूप देण्याची संकल्पना त्यांनी मांडली. त्यासाठी ३ जानेवारी १९४४ रोजी कोलकता येथे दामोदर नदी खोरे बहुद्देशीय प्रकल्पावर चर्चा करण्यासाठी एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेत दामोदर खोरे प्रकल्पाचा हेतू केवळ महापूर थांबवणे एवढाच नसून त्यातून ऊर्जा निर्मिती, सिंचन व औद्योगिक वापरासाठी पाणी, जलवाहतूक इत्यादी मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी दोन तांत्रिक संघटनांची निर्मिती करण्यात आली. पैकी मध्यवर्ती जलमार्ग, जलसिंचन आणि नौकानयन आयोगाची स्थापना करण्यास ५ एप्रिल १९४५ रोजी तर केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळ स्थापनेला ८ नोव्हेंबर १९४४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्यता प्रदान केली.

सध्या या आयोगांना केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण या नावाने संबोधले जाते. ओडिशातील महानदीवरील हिराकुंड धरण निर्मितीलाही डॉ. आंबेडकरांच्या काळात मान्यता देण्यात येऊन १५ मार्च १९४६ रोजी या धरणाची पायाभरणी करण्यात आली. अशा रितीने कृषी आणि उद्योगाच्या वाढीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा वाढविण्यावर महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय मोलाची कामगिरी बजावली आहे. देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी केवळ शेती पुरेशी नसून शेतीवरील मजुरांचा अतिरिक्त भार उद्योगाकडे वळविल्यास शेती फायदेशीर ठरेल व उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे रोजगार निर्मितीसह आर्थिक विकासाला गती मिळेल, अशी त्यांची ठाम धारणा होती. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकार 'मेक इन इंडिया' धोरण राबवत आहेत. ही खरोखर बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रउभारणीच्या कार्याला महत्त्वाची श्रद्धांजली ठरावी.

**भी. म. कौसल**

(लेखक हे आंबेडकरी विचारधारेचे अभ्यासक असून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक आहेत.)
**संपर्क :** ०९४२२१०५११३८

महामानव



# घटनेचे शिल्पकार

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एक श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ होते. त्यांनी जगातील अनेक देशांच्या संविधानांचा अभ्यास केला होता. त्यांचा कायदा आणि संविधानाबाबत सूक्ष्म आणि सखोल अभ्यास होता. अप्रतिम आणि अद्वितीय असे भारतीय संविधान लिहिल्याबद्दल अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने त्यांना मानद पदवी देऊन त्यांचा उचित गौरव केला.**

डॉ. प्रदीप आगलावे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहिले. तसेच संविधान सभेत संविधानातील कलमांवर अभ्यासपूर्ण भाष्य केले. संविधान सभेतील सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची समाधानकारक आणि विचारप्रवृत्त करणारी उत्तरे त्यांनी दिली. याची प्रचिती संविधान सभेतील चर्चा वाचल्यानंतर येते. त्यांनी भारतीय संविधानातील विविध कलमांच्या संदर्भात केलेले भाष्य हे आजदेखील उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकरिता मार्गदर्शक आहे. न्यायमूर्ती डॉ. आंबेडकरांच्या विधानांचा आधार घेऊन निर्णय घेतात. डॉ. आंबेडकर हे जागतिक ख्यातीचे संविधानतज्ज्ञ होते. परंतु ते एका दिवसात संविधानतज्ज्ञ बनले नाहीत. त्याकरिता त्यांनी जगातील विविध कायद्यांचा आणि संविधानाचा अतिशय चिकाटीने अभ्यास केला, त्यासाठी खूप परिश्रम घेतले.

### संविधानाचा अभ्यास

डॉ. आंबेडकरांनी संविधानाचा अभ्यास कशा प्रकारे केला? या संदर्भातील एक घटना अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थी आणि अभ्यासकांना अभ्यास कसा करावा, या संदर्भात त्यांना मार्गदर्शन करणारी ही घटना आहे.

भारताला अधिक राजकीय अधिकार देण्याच्या संदर्भात विचारविमर्श करण्यासाठी एक आयोग नियुक्त करण्याची घोषणा इंग्लंडचे प्रधानमंत्री स्टेनले बाल्डविन यांनी केली. आणि २६ नोव्हेंबर १९२७ ला भारतीय संविधानिक आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन हे होते. म्हणून या आयोगाला 'सायमन कमिशन' असे संबोधले जाते. सायमन आयोगाशी विचारविमर्श करण्यासाठी राज्यस्तरावर विधिमंडळ सदस्यांच्या एका समितीची निवड करण्यात आली. या सात सदस्यांच्या समितीवर डॉ. आंबेडकर यांची सदस्य म्हणून ५ ऑगस्ट १९२८ ला मुंबई विधिमंडळातून निवड झाली.



**भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना संविधानाची प्रत देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. आंबेडकरांचा अर्थशास्त्र आणि कायदा या विषयांचा सखोल व सूक्ष्म अभ्यास होता. त्यांनी राजकारणावरील काही पुस्तके वाचली होती. डॉ. आंबेडकरांना जाणीव झाली की, आता भारतीय राजकारणात संविधानाचा विषय फार मोठ्या प्रमाणात चर्चेत येईल. अशा वेळी मौन राहणे, अत्यंत धोक्याचे आहे. ते विचार करू लागले की सायमन आयोगाशी विचारविमर्श करण्याची संधी मला मिळाली आहे. म्हणून अस्पृश्यांच्या राजकीय हितांची सुरक्षा करण्यासाठी आणि देशाच्या राजकीय अधिकारांकरिता आपण काही भरीव कार्य केलेच पाहिजे.

प्रदेश समितीवर निवडून आल्याचे जाहीर झाल्याबरोबर बाबासाहेबांनी ६ आणि ७ ऑगस्टला आपल्या काही मित्रांकडून ४०० रुपये उधार घेतले. ८ ऑगस्टला तारापूरवाला बुकसेलर्सच्या दुकानातून ८५० रुपयांची संविधानाशी संबंधित पुस्तके विकत घेतली. ९ ऑगस्टपासून सकाळी आपल्या कार्यालयाच्या खिडक्या आणि दरवाजा बंद करून विकत घेतलेल्या १५-२० ग्रंथांच्या अभ्यासाला ते बसले.

काही लोक यायचे आणि दरवाजा ठोठावत. डॉ. आंबेडकर आपल्या त्रासिक मुद्रेने त्यांना परत जायला सांगत. काही वेळानंतर आणखी दुसरे लोक यायचे. ते देखील दरवाजा ठोठावत. त्यांना देखील ते परत जायला सांगत. त्यामुळे संविधानाशी संबंधित ग्रंथाचा अभ्यास करण्यामध्ये अडथळा व्हायचा.


आपल्या अभ्यासात लोकांचा त्रास होतो. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी त्यांचे कार्यकर्ते मडकेबुवा यांना सांगितले की, 'मडकेबुवा, दरवाज्याला बाहेरून कुलूप लावा. सकाळी, दुपारी आणि सायंकाळी इराण्याकडून मला खिडकीतूनच चहा देण्याची व्यवस्था करा आणि दुपारचे व संध्याकाळचे जेवणदेखील खिडकीतूनच द्या.'

डॉ. आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे मडकेबुवांनी व्यवस्था केली. तसेच त्यांनी डॉ. आंबेडकरांना सांगितले की, 'जर तुम्हाला काही कामासाठी माझी आवश्यकता वाटली तर मला बोलावून घ्या, मी कार्यालयाच्या बाहेरच्या बाकावर झोपून राहीन.' अशाप्रकारे कार्यालयाच्या दरवाज्याला बाहेरून कुलूप लावून डॉ. आंबेडकरांनी

सतत दोन आठवडे अभ्यास केला. संविधानाच्या अभ्यासाची सुरुवात त्यांनी अशा प्रकारे केली. तारापूरवाला बुकसेलर्सकडून नंतरदेखील नवीन पुस्तके खरेदी केली. पुढे या दुकानाची पुस्तके खरेदीची इतकी उधारी झाली की, त्यांना उधारीचे पैसे परत करण्यासाठी १९३६ मध्ये 'चारमिनार' ही इमारत विकावी लागली.

### पहिली गोलमेज परिषद

भारताच्या भावी संविधानाच्या संदर्भात भारतीय प्रतिनिधींशी चर्चा करण्याचे ब्रिटिशांनी मान्य केले. त्याकरिता इंग्लंडमध्ये १२ नोव्हेंबर १९३० पासून पहिली गोलमेज परिषद आयोजित केली. डॉ. आंबेडकर यांना गोलमेज परिषदेत आमंत्रित केले गेले.



संविधान सभेतील सदस्यांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकरांची सायमन-कमिशनपुढे साक्ष झाली. त्यांनी सायमन आयोगाला प्रदेश समितीचे एक सदस्य या नात्याने १८० पृष्ठांचा 'मुंबई प्रेसिडेन्सी सरकारच्या संविधानावरील अहवाल' सादर केला. या अहवालात त्यांनी मताधिकार, निर्वाचन क्षेत्र, जागांचे वितरण, विधिमंडळाचे अधिकार, प्रांतीय सरकार आणि भारत सरकारचे संबंध, प्रांतीय सरकार आणि सम्राटाशी संबंध इत्यादी बाबत सविस्तर विवेचन केले. हा अहवाल म्हणजे कायदा आणि संविधानाच्या सखोल अभ्यासाचे द्योतक असलेला प्रबंधच होता.**

पहिल्या गोलमेज परिषदेत प्रारंभिक सत्रानंतर एकूण ९ उपसमित्या बनवण्यात आल्या. संयुक्त संविधान समितीचा अपवाद वगळता बाकी सर्व समित्यांचे डॉ. आंबेडकर हे सदस्य होते. दुसऱ्या आणि तिसऱ्या गोलमेज परिषदेतदेखील ते हजर होते. गोलमेज परिषदेत संघीय संरचना, प्रांतीय संविधान, अल्पसंख्याक, मताधिकार, संरक्षण, सेवा इत्यादी समित्यांमध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. या सर्व समित्यांच्या अहवालामध्ये त्यांच्या विचारांचा प्रभाव आढळून येतो.

विशेष महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय संवैधानिक सुधारणांबाबत संयुक्त समितीच्या पुढे सर पॅट्रीक जेम्स फॅगन, सर जॉन थॉम्पसन, कर्नल बूरस, जेम्स व हटन, सर विन्स्टन चर्चिल, गिडने, सर सॅम्युअल होअर इत्यादी जवळपास २० व्यक्तींच्या साक्षी डॉ. आंबेडकर यांनी घेतल्या. डॉ. आंबेडकरांनी भारतीय संवैधानिक सुधारणांच्या संदर्भात विन्स्टन चर्चिलसारख्या मुत्सदी व्यक्तींना कोंडीत पकडले होते.

डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेतील उपसमितींच्या बैठकीत जे विचार मांडले होते, त्याचेच प्रतिबिंब १९३५ च्या भारत कायद्यामध्ये आढळून येते. डॉ. आंबेडकरांनी १९४७ ते १९४९ च्या दरम्यान भारतीय संविधान लिहिले असले तरी त्यापूर्वीच्या १९३५ च्या भारत कायद्यावर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव आढळतो.

१९ जुलै १९४६ रोजी बंगाल प्रांतातील जस्सौर आणि खुलना या मतदारसंघातून डॉ. आंबेडकर संविधान सभेचे सदस्य म्हणून निवडून आलेत. ९ डिसेंबर १९४६ पासून संविधान सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

१७ डिसेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरू यांनी मांडलेल्या उद्देश प्रस्तावावर डॉ. आंबेडकरांचे पहिले भाषण झाले.
डॉ. आंबेडकरांचे कायद्याबाबतचे ज्ञान आणि त्यांच्या विश्लेषणाच्या तर्कसंगत पद्धतीमुळे संविधान सभा भारावून गेली. त्यांचे विरोधक असलेल्या सदस्यांनीदेखील त्यांची स्तुती केली. डॉ. आंबेडकर यांनी भारतीय संविधानाचे प्रारूप तयार करून ते संविधान सभेला २४ मार्च १९४७ रोजी सादर केले. डॉ. आंबेडकर हे अजून मसुदा समितीचे सदस्य आणि अध्यक्ष बनायचेच होते. त्यापूर्वीच त्यांनी संविधानाच्या विविध समित्या आणि उपसमित्यांवर काम करून संविधानाच्या कार्याला योग्य दिशा दिली. भारताच्या संघटीत राज्याचे संविधान लिहून ते घटना समितीला सादर केले. त्यांनी आपले नियोजित संविधान मार्च १९४७ मध्ये प्रकाशित केले होते. यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकरांनी ऑगस्ट १९२८ पासूनच संविधानाच्या सखोल आणि सूक्ष्म अध्ययनाचा प्रारंभ केला होता. त्यांनी संविधानाच्या अभ्यासासाठी अतिशय कठोर परिश्रम घेतले. त्यांच्यासारखा श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ भारतात कुणीही नव्हता.

(प्रोफेसर व प्रमुख डॉ. आंबेडकर अध्यासन, प्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर)
**संपर्क :** ०९८८१२६२६६०



महामानव

# नवे प्रेरणास्थान

महाराष्ट्र राज्य सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रेट ब्रिटनस्थित निवासस्थानासंदर्भात महत्त्वाची भूमिका आणि संस्मरणीय स्मृती जपण्याचा संकल्प केला आहे. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ही वास्तू शोभेची वास्तू न राहता ती अखिल जगतासाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरणार आहे.

**लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वास्तव्यास असलेले घर घरमालकाने सप्टेंबर २०१४ मध्ये ४० कोटी रुपयात विक्रीस काढले होते. महाराष्ट्र सरकारने ३५ कोटी रुपये किंमत मोजून हे निवास खरेदी केले. नजीकच्या काळात ते खुले करण्यात येऊन तेथे भव्य स्मारक उभारणार असल्याचे**



**सरकारने जाहीर केले आहे. ही वास्तू तीन मजली असून २०५० चौरस फूट आहे. वास्तूवर 'सामाजिक न्यायाचे भारतीय शिलेदार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, (१८९१-१९५६), यांनी येथे १९२१-२२ मध्ये वास्तव्य केले' असे शब्द कोरले आहेत.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लंडन येथील निवासस्थान राज्य सरकार खरेदी करणार ही वार्ता ज्या दिवशी वृत्तपत्रातून झळकली त्या दिवशी बाबासाहेबांच्या लंडनमधील अनेक संस्मरणीय स्मृती जागृत झाल्या. विद्वत्ताप्रचुर वाणीने गोलमेज परिषद गाजविणारे, तिथल्या बी.बी.सी. रेडिओवरून ऐतिहासिक मुलाखती देणारे बाबासाहेब, आंबेडकर जयंतीचा दिमाखदार सोहळा, 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'च्या दालनातील पुतळ्याचे अनावरण, 'डॉ. आंबेडकर मेमोरिअल कम्युनिटी सेंटर'ला नानकचंद रत्तू यांनी दिलेल्या बाबासाहेबांच्या अविस्मरणीय वस्तू, दर्शनीय बुद्धविहारे आणि बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लंडनमध्ये चळवळीला वाहून श्रेष्ठ प्रचारक व त्यांच्या कार्याची प्रकर्षाने आठवण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९२१-२२ अशी दोन वर्षे 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये शिक्षण घेत असताना किंग हेन्री मार्गावरील या घरात राहत होते. येथेच त्यांनी अस्पृश्यता व ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढ्याचा निश्चय केल्याचे सांगितले जाते. 'रिस्पॉन्सीबिलिटीज ऑफ रिस्पॉन्सीबल गव्हर्नमेंट इन ब्रिटिश इंडिया' या शीर्षकाखाली लिहिलेला लेख आंबेडकरांनी लंडन विश्वविद्यालयाच्या सभेत वाचून दाखविला. प्रस्तुत लेखात त्यांनी ब्रिटिश सरकारवर इतकी जोरदार टीका केली होती की, त्यामुळे त्यांचे ब्रिटिश विद्यार्थीमित्र त्यांच्यावर क्षुब्ध झालेत. 'विद्यार्थी आंबेडकर यांनी आपल्या लेखात व्यक्त केलेली मते, अगदी स्पष्टपणे एका क्रांतिकारकाची आहेत' असे उद्‌गार लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे जगविख्यात विद्वान प्रोफेसर हॅराल्ड जे. लॉस्की यांनी त्यावेळी काढले होते. ब्रिटिश लायब्ररीत सर्वप्रथम प्रवेश करणारे आणि शेवटून निघणारे विद्यार्थी फक्त बाबासाहेबच होते. लंडनच्या वास्तव्यात दरदिवशी अठरा-अठरा तास विद्येची अखंड साधना करून जागृतीचा अग्नी लंडनच्या थंडीतही त्यांनी प्रज्वलित ठेवला.


१९३० मध्ये लंडन येथे भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत भारताच्या स्वातंत्र्याची बाजू डॉ. आंबेडकरांनी इतक्या प्रभावीपणे व मुद्देसूदपणे मांडली की, भारताच्या स्वातंत्र्याचे खरे कैवारी कोण ? अशी चर्चा इंग्लंडमध्ये त्यावेळी बराच काळ चालली होती. याविषयी महात्मा गांधी म्हणाले होते, 'डॉक्टर आंबेडकर, गोलमेज परिषदेमध्ये तुम्ही भारताच्या स्वातंत्र्याची बाजू अगदी सडेतोडपणे मांडली. तुम्ही उत्तम प्रतीचे देशभक्त आहात.'

### डॉ. आंबेडकर जयंती

लंडन येथे इंडियन बुद्धिस्ट सोसायटीद्वारे डॉ. आंबेडकर जयंतीचा अपूर्व सोहळा २८ एप्रिल १९६३ रोजी प्रथमच पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीलंकेचे लंडनमधील राजदूत एस.एस.आर. गुणवर्धने होते. जिनेव्हा येथे परिषदेच्या कार्यात गुणवर्धने व्यस्त होते. तरीही त्यांनी कार्यक्रमाचे आमंत्रण स्वीकारले. पूज्य भदन्त आनंद बोधी यांनी कार्यक्रमासाठी सभागृह, बौद्धपूजा विहार व इतर दालने वापरण्यास परवानगी दिली. राजदूत गुणवर्धने डॉ. बाबासाहेबांबरोबर १९५० साली श्रीलंकेत झालेल्या भेटीविषयी आठवण सांगतांना म्हणाले, ''काठमांडू येथील बाबासाहेबांचे बुद्ध आणि कार्ल मार्क्सवर केलेले भाषण म्हणजे आधुनिक बौद्ध जनतेला मार्गदर्शक ठरणारे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण होय.

डॉ. आंबेडकर हे फक्त भारतीय बौद्धांचेच पुढारी नव्हते तर ते जागतिक बौद्धांचे पुढारी होते. म्हणून आज लंडनमध्ये इतर देशातील बौद्धांकडून त्यांच्या कार्याचा गौरव होत आहे. जगातील सारे बौद्ध लोक भारतीय बौद्धांचे कल्याण इच्छित आहे.'' 'इंडिया हाऊस' येथे बाबासाहेबांच्या ग्रंथाचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. प्रदर्शनात बाबासाहेबांच्या जीवनावर इतरांनी लिहिलेले ग्रंथही ठेवले होते. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. संस्थेतर्फे 'मार्गदाता' नावाच्या ग्रंथाने ब्रिटिश लोक फारच प्रभावित झाले होते.

**मिलिंद मानकर**



**अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने भारतीय संविधान लिहिल्याबद्दल 'डी. लिट'ने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सन्मानित केले.**

विकास करणे हा प्रत्येकाचा मुलभूत हक्क आहे.शिक्षणामुळे तो विकास साधता येतो ,म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर देशातील शूद्र अतिशूद्रांच्या शिक्षणासाठी लढा दिला. शिक्षणामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल, त्यांच्या मनासिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल. प्रस्थापित विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास ते समर्थ होतील. प्रथम सूत्राचा शोध घेऊन ते आवश्यक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या मनात कोणत्याही विषयाची जिज्ञासा निर्माण होईल, असे डॉ. आंबेडकर म्हणत असत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१३ ला कोलंबिया विद्यापीठात शिक्षणासाठी गेले होते. भारतातील सामाजिक परिस्थिती आणि अमेरिकेतील असामाजिक परिस्थितीमधील फरक पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतातील वंचित आणि पीडितांच्या आयुष्यात शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे कळले म्हणून त्यांनी आपल्या वडलांच्या मित्राला लिहिलेल्या पत्रात असा उल्लेख केला की,' पालक मुलांच्या

# परिवर्तनाचा मंत्र

**शिक्षणातूनच सर्वांगीण परिवर्तन होऊ शकते, यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता. समाजाचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन नाही, कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे यावर त्यांची गाढ श्रद्धा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही त्यांना होती.'**

**उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम होतो, असे गुलामीचे कारण डॉ. आंबेडकर यांनी सांगितले आहे. शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभिमानाने, स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे.**

ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया होय, म्हणून प्रत्येकाने बुद्धीचा विकास करण्यासाठी हालअपेष्टा सहन करून शिक्षण मिळवले पाहिजे आणि ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. बुद्धीचा

जन्माचे साथी आहेत कर्माचे नव्हे ,या संकल्पनेचा आता त्याग केला पाहिजे 'अशी जाणीव करून देताना पुढे,'पालक मनात आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारू शकतात. मुलांच्या शिक्षणाबरोबर आपल्या मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्याच गंभीरतेने विचार करावा आणि त्यानुसार कृती करावी.' अशी गरज असल्याची जाणीवसुद्धा करून देतात. पुढे याच पत्रात शेक्सपियरच्या एका इंग्रजी नाटकातील वाक्य उद्धृत करतात की, 'प्रत्येक माणसाच्या जीवनात जेव्हा संधीची लाट येते, जर माणूस त्यावर आरूढ झाला तर तो समृद्धीच्या मार्गावर जातो. परंतु त्याने जीवनाचा मार्ग त्यागला तर माणसाच्या वाट्याला दु:खच येणार. वंचितांच्या आणि पीडितांच्या जीवनात आलेली शिक्षणाची संधी न गमावता शिक्षण घेऊन ज्ञानी झाले पाहिजे. त्यासाठी येईल ते दु:ख सहन करावयास पाहिजे, असाही सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर देतात.

शिक्षणाविना माणूस विकासाच्या प्रत्येक आघाडीवर मागेच राहिला आहे. परंतु शिक्षणामुळे त्यांच्याही आयुष्यात क्रांती होईल आणि प्रस्थापित समाजात मान उंचावून तो स्वाभिमानाने जगू शकेल अशी आशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. त्यामुळे त्यांच्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली होती.

मागासवर्गीयांच्या जीवनात शिक्षणाचे किती महत्त्व आहे याची जाणीव करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,'शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे . त्याकरिता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही कोणत्याही भौतिक लाभाचा त्याग करू शकतो. या संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या





प्रत्येक लाभाचा त्याग करण्याची आमची तयारी आहे. पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करण्यास तयार नाही. आता मागासवर्गीयांना जाणवले आहे की शिक्षणाशिवाय त्यांचे अस्तित्वच सुरक्षित नाही.'

### शिक्षणामुळे परिवर्तन

शिक्षणामुळे परिवर्तन होते हे डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही, कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. यावर डॉ. आंबेडकर यांची गाढ श्रद्धा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही डॉ. आंबेडकर याना आहे. 'व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या करीत डॉ. आंबेडकर गुलामाला त्याच्या गुलामीचे गुपित सांगताना म्हणतात की,' उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम होतो.' शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभिमानाने, स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे .

> **"शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शास्त्र आहे. व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विद्येची चोवीस तास साधना करावी लागेल कारण विद्या ही एखाद्या महासागरासारखी आहे. विद्येची ही साधना यशस्वी झाली तर माणूस जगाच्या पाठीवर आपली कीर्ती पसरवू शकतो.**
>
> **- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

### उच्च शिक्षणाचे महत्त्व

उच्च शिक्षणाचे मानवी आयुष्यात अत्यंत महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वानुभवाने उच्च शिक्षणाचे किती महत्त्व आहे ते मिलिंद महाविद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी केलेल्या भाषणातून सांगतात ,' हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे सांगण्यात येते, पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांची मुले प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्यांचे गुलाम व्हावे लागते तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन निर्दयीपणे लुबाडण्यात आले आहे, त्याचे त्यांच्या स्वत:च्या दृष्टीने काय महत्त्व आहे, याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज कशानेच हे साध्य होणार नाही.'

**प्रा. शैलेश धोंगडे**

प्रस्थापित समाज व्यवस्थेमुळे विकृतपणे लुबाडण्यात आलेल्यांच्या जीवनात उच्च शिक्षणाचे महत्त्व, तसेच राष्ट्राच्या उभारणीसाठी त्याची आवश्यकता काय, हे डॉ. आंबेडकर यांच्यावरील विधानातून स्पष्ट होते. डॉ. आंबेडकरांच्या मते,' शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शास्त्र आहे.' व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विद्येची चोवीस तास साधना करावी लागेल कारण विद्या ही एखाद्या महासागरासारखी आहे. विद्येची ही साधना यशस्वी झाली तर माणूस जगाच्या पाठीवर आपली कीर्ती पसरवू शकतो. डॉ. आंबेडकर विद्येची चोवीस तास पूजा करीत असत. त्यामुळेच त्यांना जेथे कार्ल मार्क्स, मॅझिनी, लेनिन, सावरकर यांनी संशोधनाचे कार्य केले त्या लंडन म्युझियम मध्ये खुल्या वातावरणात ,खुल्या श्वासाने शिक्षण घेता आले. असेच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात घडावे, विद्या सर्वांना अवगत व्हावी, अशी अपेक्षा डॉ. आंबेडकर मनोमनी बाळगत होते. शिक्षणानेच सामाजिक परिवर्तन घडून येते यावर त्यांचा विश्वास होता.

### लोकशाहीच्या संवर्धनासाठी

राष्ट्र निर्माणाच्या प्रक्रियेत तसेच लोकशाहीच्या संवर्धनासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे. डॉ. आंबेडकर या संदर्भात म्हणतात,' लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता, समाज, नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारित असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वात यशस्वी किवा हमखास यशस्वी ठरू शकेल.' राष्ट्रनिर्माण हा डॉ. आंबेडकर यांच्या आंदोलनाचा मुख्य हेतू होता. त्या हेतूचा मुख्य आधार शिक्षण आहे.' शिक्षण ही एक पवित्र संस्था आहे. शाळेत मने सुसंस्कृत होतात.

शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र होय. ते एक राष्ट्रीयतेचे, मानवतेचे व अज्ञान दूर करण्याचे उदात्त कार्य आहे.' असे डॉ. आंबेडकर समाजमने सुसंस्कृत करण्यासाठी, मानवतेचे संरक्षण करण्यासाठी, शिक्षणाचे विशेष महत्त्व प्रतिपादन करतात. शिक्षणाचे पावित्र्य व समाजाचे भवितव्य विद्यार्थ्यांच्या हातात आहे, असेही ते सांगतात. ते म्हणतात,' विद्यार्थी आपले कर्तव्य नि जबाबदाऱ्या कशा पार पाडतात यावरच समाजाचे भवितव्य अवलंबून आहे.' शिक्षणाबरोबर शिलाची व सदाचरणाची आवश्यकता आहे. त्याशिवाय शिक्षणाला महत्त्व नाही, असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते.

(लेखक हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागात कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९२०९०५७५८६

# कर विकासोन्मुख हवेत...

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फार मोठे अर्थशास्त्रज्ञ होते. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स' येथून अर्थशास्त्रामध्ये 'डी.एससी.' पदवी मिळविणारे ते पहिले भारतीय होते. त्यांनी 'डी.एससी.'करिता 'रुपयाचा प्रश्न: उगम आणि उपाय (The Problem of the Rupee : Its Origin and Solution) हा संशोधनपर ग्रंथ लिहिला होता. याशिवाय त्यांचे अर्थशास्त्राच्या संदर्भात अनेक मौलिक ग्रंथ आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांनी भारतातील आर्थिक प्रश्नांबाबत मौलिक विचार मांडले आहे. त्यांची मुंबई विधान परिषदेवर डिसेंबर १९२६ मध्ये सदस्य म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर १९३७ मध्ये मुंबईच्या विधीमंडळावर ते मजूर पक्षाचे आमदार म्हणून निवडून गेले. त्यावेळी ते मुंबई विधान मंडळाचे विरोधी पक्षनेते होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मोठे अर्थतज्ज्ञ होते. त्यांचे अर्थविषयक विचार हे मूलगामी आहेत. त्यांनी अर्थकारणावर प्रचंड लेखन केले. विधिमंडळावर निवडून गेल्यावर त्यांनी वेळोवेळी शासकीय अर्थसंकल्पावर अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन केले. अर्थसंकल्पाचे कठोर विश्लेषण करण्यात त्यांचा हातखंडा होता. अर्थसंकल्पातील आकडेवारी आणि सामान्य जनतेचे हित यामध्ये कशी मोठी तफावत असते, ही बाब ते प्रभावीपणे आपल्या भाषणातून मांडत असत. त्यांची अर्थसंकल्प भाषणे आजही तितकीच सुसंगत असून अर्थसंकल्पाला दिशा देण्यासाठी उपयुक्त ठरणारी आहेत.**

डॉ. आंबेडकरांनी मुंबई विधान मंडळात शिक्षण, मुंबई विद्यापीठ कायदा संशोधन बिल, मुंबई वंशपंरपरा कार्य कायदा संशोधन बिल, खोती पद्धत, वित्त कायदा संशोधन बिल, ग्रामपंचायत बिल, मुंबई पोलीस कायदा संशोधन बिल, मुंबई नगरपालिका कायदा संशोधन बिल, प्रसूती लाभ बिल, औद्योगिक विवाद बिल, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य इत्यादी विविध बिलांच्या संदर्भात अभ्यासपूर्ण विचार मांडले आहेत.

मुंबई विधान परिषदेचे सदस्य असताना डॉ. आंबेडकरांनी २४ फेब्रुवारी १९२७ आणि २१ फेब्रुवारी १९२८ रोजी अर्थसंकल्पावर विचार मांडले आहे. त्यानंतर मुंबई विधानसभेचे सदस्य





# महामानव

असतांना त्यांनी विधानसभेत २ मार्च १९३८ आणि २१ फेब्रुवारी १९३९ ला अर्थसंकल्पावर आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले. मुंबई विधिमंडळात त्यांनी अर्थसंकल्पावर चार वेळा आणि राज्यसभेचे सदस्य असताना त्यांनी २७ मे १९५२ रोजी १९५२-५३ च्या अर्थसंकल्पाबाबत विचार मांडले आहेत.

मुंबई विधान परिषदेचे सदस्य म्हणून १८ फेब्रुवारी १९२७ ला डॉ. आंबेडकरांनी शपथ घेतली. त्यानंतर लगेच २४ फेब्रुवारी १९२७ रोजी अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेतला. त्यावेळी ते म्हणाले, माननीय वित्त सदस्याने अर्थसंकल्पामध्ये दिलेली महसूल पद्धती ही अयोग्य आणि असमर्थनीय आहे. भूमी महसूल आणि उत्पन्न महसूल या दोन्हीवर कर लावण्याची पद्धत भेदभावपूर्ण आहे. प्रत्येक शेतकऱ्यांचे उत्पन्न काहीही असो त्यांच्याकडून जमीन महसूल वसूल केला जातो. उत्पन्नकरांच्या अंतर्गत जर कोण्या व्यक्तीचे वर्षभर कोणते उत्पन्न नसेल तर त्यात कर देण्याची आवश्यकता नाही. परंतु ही करपद्धत भूमी महसुलाच्या संदर्भात लागू नाही. शेतीचे उत्पन्न कमी अथवा जास्त असो, गरीब शेतकऱ्यास भूमी महसूल द्यावाच लागतो. उत्पन्नकराची वसुली कायद्याच्या क्षमतेनुसार मान्यताप्राप्त सिद्धांताच्या आधारावर केली जाते. परंतु भूमी महसूल पद्धती अंतर्गत व्यक्ती एक एकराचा मालक असो, जहागीरदार असो किंवा इनामदार असो त्यांच्यावर एकाच दराने कर लावला जातो. हा आनुपातिक कर आहे. हा विकासोन्मुख कर नाही. जसे की तो असायला पाहिजे. उत्पन्नकरांतर्गत उत्पन्नाच्या निश्चित केलेल्या सीमेच्या खालील लोकांना उत्पन्नकर द्यावा लागत नाही. परंतु भूमी महसूलांतर्गत व्यक्ती गरीब असो वा श्रीमंत त्यांना महसूल द्यावाच लागतो.' असे विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले.

> **एका चांगल्या महसूल पद्धतीची पहिली आणि सर्वात अनिवार्य आवश्यकता म्हणजे ती विश्वसनीय असली पाहिजे. त्या महसूल पद्धतीमुळे कमी अथवा अधिक महसूल मिळतो, ही गोष्ट महत्त्वाची नाही. महत्त्वाची गोष्ट ही की महसुलातून जे काही प्राप्त होते ते निश्चित असले पाहिजे.'**
>
> **- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

१९२७-२८ चा मुंबई सरकारचा अर्थसंकल्प तुटीचा होता. त्यामुळे विधान मंडळाचे सदस्य चिंतित होते. म्हणून त्या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'घाटा ही अशी कोणती वस्तू नाही की, ज्यामुळे माननीय सदस्यांनी भयभीत व्हावे. मला वाईट याचे वाटते की अर्थसंकल्पात घाटा कोणत्या सामाजिक विकासाच्या मोठ्या धोरणाचा स्वीकार केल्यामुळे झाला नाही तर हा घाटा पूर्णत: प्रशासनाच्या अनुत्पादक खर्चात वाढ झाल्यामुळे झाला आहे.'

डॉ. सरोज आगलावे

मुंबई प्रांताच्या १९२८-२९ या वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात २१ फेब्रुवारी, १९२७ रोजी विधान परिषदेत आपले विचार व्यक्त करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'अर्थसंकल्प केवळ घाटयामुळे निराशाजनक असता तर त्यास गांभीर्याने घेणे माझ्याकरिता बिलकूल आवश्यक नसते. अर्थसंकल्प केवळ निराशाजनकच नाही तर माझ्यामते निंदनीयदेखील आहे आणि अशी स्थिती फार गंभीर आहे.'

डॉ. आंबेडकरांनी १९२१-२२ आणि १९२५-२६ मधील विविध प्रांताच्या हस्तांतरित आणि आरक्षित विभागाच्या खर्चामध्ये झालेल्या टक्केवारीमध्ये कमी वा वृद्धीच्या संदर्भात आकडेवारी सादर करून या दोन्ही विभागाच्या आनुपातिक खर्चाच्या बाबतीत मुंबईसारख्या प्रांताचे स्थान फार खालचे असल्याचे स्पष्ट केले.

मुंबई विधानसभेत १९३८-३९ च्या अर्थसंकल्पावर आपले मत व्यक्त करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'हा अर्थसंकल्प आतापर्यंतच्या मी पाहिलेल्या अर्थसंकल्पामध्ये सर्वात क्षुल्लकच नाही तर पोकळ आणि तकलादू अर्थसंकल्प आहे. यामध्ये भविष्याच्या संदर्भात कोणतेही धोरण नाही आणि प्रांताला भेडसावणाऱ्या समस्यांना ओळखण्याचा प्रयत्नदेखील नाही.'

अर्थसंकल्पात कोणताही नवीन कर लावला नाही. म्हणून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. परंतु अर्थसंकल्पात कोणताही नवीन कर लावण्यात आला नाही म्हणून मी अर्थसंकल्पाचा सर्वात मोठा विरोधक आहे. कारण हा अर्थसंकल्प श्रीमंत लोकांकरिता आहे. हा गरीब लोकांचा अर्थसंकल्प नसल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

*'कोणतेही सरकार जे आपल्या जबाबदाऱ्यांबाबत गंभीर आहे ते गरिबांना असे म्हणू शकत नाही की, ते त्यांना सोयी पुरवू शकत नाही. कारण त्यांच्यात कर लावण्याचे धैर्य नाही. असे सरकार जितक्या लवकर सत्ता सोडेल, तितके चांगले.* असे मत व्यक्त करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, हा अर्थसंकल्प सर्वात निराशाजनक आहे. 'हा अर्थसंकल्प श्रीमंताना सोयी देण्यासाठी आणि लोकांना उपाशी ठेवण्यासाठी तयार करण्यात आला आहे.'

सरकारच्या १९३९-४० वर्षाच्या अर्थसंकल्पावर डॉ. आंबेडकरांनी मुंबई विधानसभेत अतिशय अभ्यासपूर्ण भाष्य २१ फेब्रुवारी, १९३९ रोजी केले. ते म्हणतात की, 'मी अर्थसंकल्पावरील महसूल आणि खर्च लक्षात घेतला. तेव्हा माझे असे मत बनले की, महसुलाच्या बाबतीत हा अर्थसंकल्प निष्काळजीपणाचा आहे तर खर्चाच्या दृष्टीने हा अर्थहीन अर्थसंकल्प आहे.'

प्रस्तुत अर्थसंकल्पात शिक्षणाच्या संदर्भात विशेष तरतूद केली नाही. परंतु मद्यपान निषेधाकरिता विशेष तरतूद करण्यात आली होती. शिक्षणाचा प्रश्न गौण माणून मद्यपान निषेध महत्त्वाचे मानले होते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी या अर्थसंकल्पाच्यावर तीव्र टीका केली. भारत सरकारच्या १९५२-५३ च्या अर्थसंकल्पाबाबत डॉ. आंबेडकरांनी २७ मे १९५२ रोजी आपले विचार मांडले होते. ब्रिटिश सरकार महसूल आणि कर गोळा करायचे आणि देशातील कायदा आणि व्यवस्था ठेवण्याचे कार्य करायचे. परंतु आपल्या स्वतंत्र भारताच्या सरकारने देशातील गरीब आणि दुर्बल लोकांच्या उत्थानाकरिता त्यांना सामाजिक लाभ देण्याकरिता अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली पाहिजे, असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले.

(लेखिका या नागपूर येथील महिला महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाच्या सहयोगी प्राध्यापिका आहेत.)
**संपर्क :** ०९६०४३४६९८९

❑ ❑

# महिलांचे कैवारी

**डॉ. रुपा कुळकर्णी बोधी**

**भारतात महिलांचे उद्धारक अनेक झाले. परंतु कैवारी मात्र एकच झाला, बोधिसत्त्व प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. मातोश्री रमाईंना पाठविलेल्या एका पत्रात त्यांनी 'स्त्रियांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी एक योद्धा आहे,' असे म्हटले; ते सर्वार्थाने खरे आहे. दोन्ही हाती शस्त्र घेऊन, स्त्रियांच्या हक्कासाठी लढणारा असा वीर योद्धा पुन्हा होणे नाही. एका हाती कायद्याचे शस्त्र, तर दुसऱ्या हाती चळवळीचे. सर्व भारतीय स्त्रियांनी या एका कारणासाठी त्यांना प्रातःस्मरणीय मानले पाहिजे. आपल्या उण्यापुऱ्या ६५ वर्षांच्या आयुष्यात या विग्रही योद्ध्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अशी चारही क्षेत्रे पादाक्रांत केली. परंतु या पराक्रमाला जोड होती, करूणेची. स्त्रिया आणि शूद्रादी प्रजेवर जातीव्यवस्थेने केलेल्या पराकोटीच्या अन्याय-अत्याचाराची चीड व त्या शोषणाला बळी पडलेल्यांविषयी करुणा यातून बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली. बुद्धानंतरची ही दुसरी क्रांती.**

हिंदू समाजातील सगळ्या प्रकारच्या विषमतांपैकी एक, म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. तिच्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वापरलेले महत्त्वाचे अस्त्र म्हणजे कायदा. स्वतःचे सारे पांडित्य त्यांनी हिंदू कोड बिलासाठी पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्यांची संहिता आधी बदलली पाहिजे व स्त्री-केंद्री बनविली पाहिजे, हा त्यामागील हेतू होता.



### महिलांसाठी सुरक्षाकवच

हिंदू कोड बिलाच्या संबंधात आपली भूमिका स्पष्ट करताना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात- 'समाजातील वर्गावर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे होय, आणि शेणाच्या ढिगाऱ्यावर राजप्रसाद बांधण्यासारखे होय. हिंदू संहितेला मी हे महत्त्व देतो.'

बाबासाहेबांनी हे उद्गार हिंदू कोड बिलाच्या मसुद्यावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी काढलेले आहेत. हिंदू कायद्याच्या संहितीकरणाविषयीच्या विधेयकाला बाबासाहेबांच्या लेखी अनन्यसाधारण महत्त्व होते. कारण पूर्वी म्हटल्याप्रमाणे त्यायोगे स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावाला आळा बसून, त्या अधिक सक्षम बनतील, हा त्यांना विश्वास होता. हा काळ होता १९४७ ते १९५०. (Writings and Speeches part one, Dr. Ambedkar Hindu, 17th Nov.1947 to 14th Dec. 1950)

हा तीन वर्षांचा काळ सर्वार्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील अत्यंत यशस्वी व कृतकृत्यतेचा कालखंड म्हणावा लागतो. या सगळ्या कामगिरीचा आवाका प्रचंड होता. एवढ्यानेही बाबासाहेब अमर झाले असते. परंतु संपूर्ण सम्यक क्रांतीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग असल्याशिवाय ती यशस्वी होऊ शकणार नाही, हे जाणून त्यांच्या प्रगतीची वाट मोकळी करण्यासाठी त्यांनी या काळात प्राधान्य दिले ते स्त्रियांशी संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करण्याला ! हे एक प्रकारे सुरक्षाकवच होते स्त्रियांसाठी.

या विधेयकाचा प्रस्ताव मांडत असताना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, 'महोदय, हे विधेयक सात भिन्न बाबींशी कायद्याचे संहितीकरण करू पाहते. सर्वप्रथम हे विधेयक अशा मृत हिंदू व्यक्तींच्या, म्हणजे स्त्री व पुरुष दोघांच्याही, मालमत्तेच्या हक्कांशी संबंधित नियमांचे संहितीकरण करू इच्छिते, जी व्यक्ती इच्छापत्र न करता मेलेली असते. दुसरे म्हणजे भिन्न भिन्न वारसदारांमध्ये वारशाच्या क्रमाच्या स्वरूपात काही बदल विहित करते. या विधेयकाद्वारे हाताळले गेलेले पुढचे विषय म्हणजे पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तकविधान, अज्ञानत्व व पालकत्व यांचे कायदे हे आहेत.'

**त्यातील महत्त्वपूर्ण अशा प्रस्तावित तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.**

बाबासाहेबांनी सर्वप्रथम वारशाचाच प्रश्न घेतला. त्यासंबंधात विधेयकातील महत्त्वाचा बदल म्हणजे मृत व्यक्तीची विधवा, त्याची मुलगी व पूर्वी मृत झालेल्या त्याच्या मुलाची विधवा यांना वारशाच्या बाबतीत मुलाच्या बरोबरीची श्रेणी देण्यात आली. त्याच्या जोडीला, मुलीलाही वडलांच्या मालमत्तेत मुलाच्या अर्धा हिस्सा देण्यात आला. या विधेयकात मान्यता देण्यात आलेल्या स्त्री-वारसदारांची संख्या मित्ताक्षरा किंवा दायभागाखालील संख्येपेक्षा कितीतरी जास्त होती. तिसरा बदल म्हणजे जुन्या कायद्यात स्त्री-वारसदारांमध्येच त्यांची आर्थिक परिस्थिती, वैवाहिक दर्जा, सापत्यव्य-विनापत्यव्य अशा कारणांवरून भेदभाव केला जात असे. स्त्रिया-स्त्रियांमध्येच भेदभाव करणारे वरील




सर्व मुद्दे नव्या विधेयकात काढून टाकण्यात आले. ती स्त्री एकदा वारसदार म्हणून घोषित झाली आहे, याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टी विचारात घेण्याची गरज नाही, असे बाबासाहेब म्हणतात आणि चौथा बदल म्हणजे दायभाग पद्धतीत आईच्या तुलनेत वडील आधी उत्तराधिकारी ठरत. बाबासाहेबांनी आईला वडलांच्या आधी उत्तराधिकारी बनविले. या विधेयकाने स्त्री-धनाचे अनेक प्रकार काढून टाकून सर्व स्त्री-धन एकच आहे व त्याला वारशाचा नियमही एकच लागतो, अशी तरतूद केली. स्त्री-धनाच्या बाबतीत, मुलीच्या हिश्श्याच्या अर्धा हिस्सा वारशाने मुलालाही मिळावा ही तरतूद करून बाबासाहेबांनी वडलांच्या मालमत्तेत जसा मुलीला मुलाच्या अर्धा हिस्सा मिळतो, तसा आईच्या मालमत्तेत मुलालाही मुलीच्या अर्धा वाटा दिला. 'हे विधेयक, मुलगा व मुलगी यांच्या सामाजिक दर्जामध्ये समानता राखण्याचा प्रयत्न करते,' असे उद्गार त्यांनी या प्रसंगी काढले आहेत. याखेरीज धार्मिक संस्कारयुक्त विवाह व विवाह नोंदणी, घटस्फोट, दत्तक विधान या संबंधात स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून बाबासाहेबांनी नव्या तरतुदी केल्या. हुंड्याच्या बाबतीत, विवाहात मुलीने माहेरून हुंड्याच्या रूपात आणलेली संपत्ती न्यास-मालमत्ता मानली जाईल, तिचा उपयोग त्या स्त्रीच्या कामी येईल आणि १८ वर्षांनंतर त्या मालमत्तेवरील हक्कास ती पात्र होईल. ती संपत्ती तिच्या पतीला किंवा त्याच्या नातेवाइकांना उडविता येणार नाही, अशी तरतूद केली. एक आणखी महत्त्वाचा बदल बाबासाहेबांनी केला, तो म्हणजे स्त्रियांच्या मर्यादित इस्टेटीचे अबाधित इस्टेटीत रूपांतर, याशिवाय विवाह व दत्तक विधानातून जातीचे उच्चाटन, एकपत्नीकत्व तत्त्व आणि विवाहातून बाहेर पडण्यासाठी घटस्फोटाचे तत्त्व यांची तरतूद विधेयकात करून स्त्रियांना फार मोठा दिलासा दिला.

हिंदू कोड बिल हे बाबासाहेबांच्या जीवनाचेच ध्येय झाले होते. १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस त्यांनी अथक परिश्रम घेतले, त्याचे अंतिम उद्दिष्ट आम्हा स्त्रियांना कायद्याचे हक्क, दर्जा, आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, हेच होते. परंतु एवढ्या कष्टांनी स्त्री-स्वातंत्र्याचा जाहीरनामा असलेले हे हिंदू संहिता विधेयक, संविधान सभेत मंजूर होऊ शकले नाही. त्यातली घटस्फोट, द्विभार्या प्रतिबंध यासारखी कलमे विरोधकांकडून विवाद्य बनविण्यात आली. बिलाच्या विरोधकांना बाबासाहेबांनी २० सप्टेंबर १९५१ रोजी अत्यंत जोरदार, मार्मिक उत्तर दिले. 'आज सुधारणेच्या युगात स्त्रियांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध का करता ? स्त्रियांना इस्टेटीत वाटा देण्यास मनूनेही नकार दिला नाही, मग तुम्ही का देता ?' असा सवाल त्यांनी सनातन्यांना केला. एकटे बाबासाहेब लढत राहिले. पण सत्र संपले तेव्हा हिंदू कोड बिलाची फक्त ४ कलमे मंजूर झाली. त्यामुळे अत्यंत दु:खी व निराश होऊन डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कायदेमंत्रिपदाचा २७ सप्टेंबर १९५१ रोजी राजीनामा दिला. केवढा प्रचंड त्याग बाबासाहेबांनी आम्हा स्त्रियांच्या हक्कांसाठी केला ! पुढे १९५२ नंतर केंद्र सरकारने बाबासाहेबांच्याच मसुद्यातून ४ स्वतंत्र कायदे बनविले, ते म्हणजे १) दि हिंदू मॅरेज ॲक्ट, १९५५, २) दि हिंदू सक्सेशन ॲक्ट, १९५६ (जून), ३) दि हिंदू मायनॉरिटी अँड गार्डियनशिप ॲक्ट, १९५६ (ऑगस्ट), ४) दि हिंदू ॲडॉप्शन अँड मेन्टेनन्स ॲक्ट, १९५६ (डिसेंबर).

### चळवळीतील सहभागाचे जनक

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळेच मोठ्या प्रमाणावर स्त्रिया चळवळीत सक्रिय झाल्या. १९२७ च्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागाला सुरुवातच मुळी फार मोठ्या प्रमाणावर झाली. १९३० च्या काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी स्त्रियांचीच होती. १९४२ च्या नागपुरात आयोजित अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत हा सहभाग इतका वाढला की महिलांचे स्वतंत्र अधिवेशन घेण्यात आले. 'चले जाव' चळवळीच्या तोडीचा हा स्त्री-सहभाग होता. सार्वजनिक क्षेत्र आजदेखील पुरुषप्रधान आहे, मग तेव्हा ते किती असेल? अशा परिस्थितीत गावखेड्यातील सर्वसामान्य बाईला, दलित शोषित वर्गातील स्त्रीला घराचा उंबरठा ओलांडावयास लावून प्रत्यक्ष लढ्यात सक्रिय करणे ही गोष्ट अभूतपूर्व होती. आजही अनेक स्त्री-संघटनांना त्यांच्या मोर्चातील किंवा धरणे आंदोलनातील स्त्रियांच्या अल्प उपस्थितीचा प्रश्न डोकेदुखी निर्माण करतो. म्हणून डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीतील स्त्रियांचे हे संख्याबळ, लक्षणीय ठरते.

### बाबासाहेबांचा महिलांना उपदेश

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड संग्राम परिषदेत महिलांना उद्देशून जो उपदेश केला तो अतिशय सोपा, साधा परंतु सारगर्भ होता. एक महापंडित आणि विद्वान सोपे बोलू शकत नाही, हा समज बाबासाहेबांनी खोटा ठरविला. येथे मला भगवान बुद्धाच्या संदर्भात वापरण्यात आलेला एक शब्द आठवतो. तो म्हणजे, उपायकौशल्य! भगवान बुद्धांजवळ अनेक स्तरांमधून लोक येत असत. सर्वांची समजण्याची पातळी एकसारखी नसते, हे जाणून तथागत वेगवेगळ्या समूहांसाठी वेगवेगळे उपाय योजत आणि उपदेश करीत. संविधानसभेत अस्खलित इंग्रजीत केलेल्या भाषणांनी, युक्तिवादांनी भल्याभल्यांना निरुत्तर करणारे बाबासाहेब साध्याभोळ्या गरीब कष्टकरी भगिनींसाठी मात्र छोटी छोटी सोपी वाक्ये योजतात, तेव्हा बुद्धांच्या उपायकौशल्याची आठवण येते. मला वाटते, जगातले हे सर्वात सोपे भाषण असावे. बाबासाहेब म्हणाले, 'तुम्ही स्वत:स अस्पृश्य मानू नका. घरी स्वच्छता ठेवा. स्पृश्य हिंदू नेसतात, त्या पद्धतीने नेसा. फाटके का लुगडे असेना, ते स्वच्छ पाहिजे. भाराभर गळसऱ्या व हातात कोपरभर चांदीच्या गोट-पाटल्या ही तुम्हास ओळखण्याची खूण आहे. दागिना घालायचा तर सोन्याचा घाला. कोणतीही अमंगल गोष्ट होऊ देऊ नका. मेलेल्या जनावराचे मांस खाणे बंद करा. दारूबाज नवऱ्यांना, भावांना अगर मुलांना जेवायला घालू नका. मुलींना शिक्षण द्या. ज्ञान व विद्या या गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहेत. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा!' अशी महत्त्वाकांक्षा ठेवून जगा.'**

(लोकराज्य ऑक्टोबर २००६च्या अंकातील लेखाचे संपादित संस्करण)

(लेखिका सामाजिक कार्यकर्त्या आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका आहेत.)
**संपर्क:** ०९८९०३६६२८५



# युगपुरुषाच्या आठवणी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर पुरुष होते. समाजातील उपेक्षितांच्या जीवनात नवा सूर्य उगवण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. बाबासाहेबांच्या श्रेष्ठत्व आणि महानतेच्या अनेक आठवणी त्यांच्या संपर्कात आलेल्या महनीय व्यक्तींनी नोंदवून ठेवल्या आहेत. या आठवणी प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायी आहेत.**

### उद्धारकर्ते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक लोकोत्तर पुरुष होते यात शंका नाही. त्याचा आत्मविश्वास दांडगा होता.त्यांच्या मोठेपणाची इमारत त्यांनीच रचली. त्यांच्या जीवनाचा मार्ग त्यांनी आपल्या आत्मप्रकाशाने प्रकाशित केला होता. अस्पृश्यांत त्यांनी आत्मविश्वास उत्पन्न केला. रंजल्या-गांजल्यांसाठी त्यांची करुणा पाझरत असे. दुर्बलांना जगात भवितव्य नाही म्हणून पददलित समाजाने सबळ झाले पाहिजे. समर्थ झाले पाहिजे व या दोन गोष्टी झाल्यानंतर तो समाज संपन्न होणे अपरिहार्य होते.

१९५६ मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर आंबेडकर यांनी आपल्या लक्षावधी बांधवांसह बुद्ध धर्माची दीक्षा घेतली. 'हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' ही येवले मुक्कामी १३ ऑक्टोबर १९३५ साली घेतलेली प्रतिज्ञा नागपूर येथे पुरी केली.

शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य त्यांनी स्थापन केलेल्या विद्यालयात अमर झाले आहे. ज्ञानक्षेत्रात त्यांनी रचलेले ग्रंथ दीर्घकाळपर्यंत मार्गदर्शक राहतील. तथापि याही गोष्टी सर्वभक्षी काळ गिळंकृत करील,पण जे धर्म-परिवर्तनाचे कार्य त्यांनी आयुष्याच्या अखेरच्या पर्वात केले ते जोपर्यंत भारतात धर्मविषयक काही भावना राहील तोपर्यंत टिकणारे आहे.

बुद्ध धर्म त्यांनी स्वीकारला तो अंधतेने स्वीकारला नाही. इतिहासाचे मार्गदर्शन घेत घेत स्वीकारला आणि तो स्वीकारण्यापूर्वी जवळजवळ असिधारा व्रत त्यांना अनुभवावे लागले. हिंदू धर्मात होत असलेल्या अन्यायांमुळे मनाला आलेली चीड,शांततेसाठी बुद्धीला आढळून आलेल्या हिंदू समाजातील वैफल्य सांगतेसाठी ते बुद्ध धर्माला शरण गेले.

कोठल्याही ऐहिक फायद्यासाठी त्यांचे धर्मांतर नव्हते. अस्पृश्यांचे ऐहिक कल्याण संविधानाने होईल एवढी खात्री झाल्याने ते एक प्रकारे कर्तव्यपूर्तीच्या भावनेने वागत होते. आणि म्हणून विजयादशमी मुहूर्तावर त्यांनी सर्व ऐहिक व स्वार्थपूर्ण जीवनाची मर्यादा ओलांडून सीमोल्लंघन केले आणि गंभीरपणाने लक्षावधी बुद्ध होण्याच्या इच्छेने जमलेल्या लोकांसमोर

***बुद्धं सरणम् गच्छामि,***
***धम्मं सरणम् गच्छामि,***
***संघं सरणम् गच्छामि,***

ही पवित्र वाणी त्यांच्या मुखांतून निघाली व मानवजातीच्या इतिहासात व भारताच्या इतिहासात एक युगप्रवर्तक गोष्ट घडली. (काकासाहेब गाडगीळ माजी राज्यपाल पंजाब, शोभा विशेषांक १४ एप्रिल १९६३)

### ज्ञानाचे खरे डॉक्टर

बाबासाहेब आंबेडकर पीएच.डी. झाल्यापासून त्यांच्या नावाच्या अगोदर डॉक्टर ही पदवी आली. आमच्या समाजातील नावाच्या अगोदर 'डॉक्टर' ही पदवी लावणारे बाबासाहेब ही पहिलीच व्यक्ती. आमच्या समाजातील स्त्री-पुरुषांना औषधे देणाऱ्या डॉक्टरांचीच तेवढी माहिती होती. त्याशिवाय दुसरा कोणी 'डॉक्टर' असतो, याची त्यांना कल्पनाच नव्हती. त्यामुळे एक प्रसंग कसा घडला ते बाबासाहेब आम्हाला सांगत होते.

एके दिवशी सकाळीच एक बाई तापाने फणफणलेल्या आपल्या तान्ह्या बाळाला माझ्याकडे घेऊन आली आणि सांगू लागली की, डॉक्टरसाहेब रात्रीपासून माझे बाळ तापाने आजारी आहे. याला तपासा आणि औषध द्या. मी तिला काय सांगणार? मी तिला सांगितले की बाई, मी औषध देणारा डॉक्टर नाही. तू त्याला दुसऱ्या डॉक्टरकडे घेऊन जा.

बाबासाहेबांनी सांगितल्यावर ती बाई दुसऱ्या औषध देणाऱ्या डॉक्टरकडे गेली असेल. मात्र 'हे कसले डॉक्टर' हा प्रश्न तिच्या मनात राहिलाच, बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात जी चळवळ केली, अज्ञानी समाजाला जो माणुसकीचा मंत्र शिकविला, ज्ञान प्रसारासाठी जी महाविद्यालये काढली, त्यावरून विद्येचे ते खरे डॉक्टर होते हे सिद्ध झाले. (उपशाम गुरुजी, मिलिंद महाविद्यालय वार्षिकांक डिसेंबर १९६३)



## निवडणूक जिंकणे जीवनकार्य नव्हे

स्वतंत्र भारतातील पहिल्या निवडणुकीच्या वेळचा प्रसंग. बाबासाहेब लोकसभेच्या जागेसाठी मुंबईमधून उभे होते. परंतु या निवडणुकीत बाबासाहेबांना अपयश आले. ते या निवडणुकीत पडले म्हणून कार्यकर्त्यांना अत्यंत वाईट वाटले. त्यांचे चेहरे मलूल झाले. त्यांची अत्यंत निराशा झाली. निवडणुकीचा निकाल पाहिल्यानंतर काही कार्यकर्ते व पुढारी मंडळी त्यांना भेटावयास गेली. बाबासाहेबांच्या अपयशाबद्दल पुढाऱ्यांमध्ये चर्चा सुरू होती. त्यांचे चेहरे निस्तेज झाले होते. परंतु बाबासाहेब मात्र हिमालयाप्रमाणे अचल व आनंदी होते. पुढाऱ्यांच्या त्या मलूल चेहऱ्यांकडे बघून बाबासाहेब उद्‌गारले – 'निवडणूक म्हणजे काही सर्व काही नव्हे. माणसाने नेहमी आपले मन कार्यामध्ये मग्न ठेवावयास हवे. निराशेने खचून न जाता आपल्या हाती घेतलेल्या कार्यामध्ये खंडू पडू देता कामा नये. निवडणुकीशिवाय ज्यांना जगण्यास दुसरा मार्ग नाही त्यांना निवडणुकीतील अपयश मरणापेक्षाही अधिक दुःखदायक वाटते. राजकारण हे धीराचे असते. परिस्थिती व देशाचे प्रश्न योग्य माणसांना निवडून काढील.'

(मुकुंदराव आंबेडकर, प्रबुद्ध भारत)



## डॉ. आंबेडकरांची दिल्लीतील दिनचर्या

डॉ. बाबासाहेब दिल्लीला असताना त्यांची दिनचर्या अशी असायची. ते सकाळी ६ च्या सुमारास उठत. ६ ते ७.३० पर्यंत प्रातर्विधी स्नान न्याहारी वगैरे आटोपून त्यांना घटना समितीच्या कामाकरता सज्ज व्हावे लागे. 'हार्डिंग्ज ॲव्हेन्यू' या त्यांच्या निवासस्थानापासून ते घटना समितीच्या इमारतीत गेल्यावर ते प्रथम त्यांच्या सेक्रेटरीशी बातचीत करीत. ही वेळ १५ ते २० मिनिटांची. नंतर सकाळी ८ वाजेपासून घटना समितीचे काम सुरू होऊन ते दुपारी १२ ला संपत असे. १२ वाजेपासून 'कायदेमंत्री' या नात्याने त्यांच्याकडे जी कामे आहेत, त्याकडे लक्ष पुरवित असत. यासाठी त्यांना दुपारी १२ ते १.३० पर्यंत वेळ खर्च करावा लागे. नंतर दुपारी २ च्या सुमारास ते घरी जेवणासाठी येत. उन्हाळा असल्यामुळे दुपारी २ ला जेवण झाल्यावर ते थोडी विश्रांती घेत. अर्थात, वाचनाचे काम विश्रांतीतही चालू असे. दुपारी ४ नंतर ते परत घटना समितीतील सभासदांच्या पार्टी बैठकीला जात. पुष्कळ व्यक्तींना भारतीय राज्यघटनेचा पूर्ण अर्थ आणि त्यातील गुंतागुंती माहीत नसल्याने डॉ. बाबासाहेबांचा ७-८ पर्यंतचा वेळ जाई. ७ वाजता तर कधी ८ वाजता घरी परत येत. अशातऱ्हेची त्यांची दिनचर्या होती.

(के.एस. जाधव, प्रबुद्ध भारत)



## बाबासाहेबांची तपश्चर्या

बाबासाहेबांची व माझी पहिली दृष्टादृष्ट १९२४ साली झाली. मी नाशिकात प्रोबेशनर डेप्युटी कलेक्टर असताना त्यावेळचे कलेक्टर सी.ए. बेटस (आय.सी.एस.) हे व मी नाशिक स्टेशनवर सरकारी कामाकरिता गेलो असताना, नाशिक गावाकडे येताना नगरपालिकेच्या जकात नाक्याजवळ एक दांडगा, धडधाकट, सावळा, मध्यम उंचीचा रुबाबदार व नखशिखांत इंग्रजी पोशाख केलेला अनोळखी तरणाबांड गृहस्थ एकाएकी उभा असलेला मला दिसला. आमची मोटार त्या नाक्यावरून जाताना मला या इसमाचे दर्शन झाले.

हा कोणीतरी मोठा गृहस्थ असावा व कोणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत हा रस्त्याचे कडेला उभा राहिला असावा असा मी तर्क केला. सदर इसम हे दुसरे तिसरे नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचेशी माझी ओळख नसल्याने व त्यांना यापूर्वी कधीही पाहिलेले नसल्याने मी त्यांना ओळखले नाही. पण त्यांची कीर्ती व लौकिक माझ्या कानी ह्यापूर्वीच आला होता.

बाबासाहेब हे समाजसेवक व राजकीय पुढारी झाल्यावर समाजातील हजारो स्त्रिया, पुरुष व मुले १०-१२ मैलांची मजल मारून व दोन-तीन दिवसांची शिदोरी पाठीला अडकवून डॉ. बाबासाहेबांच्या दर्शनाचा नुसता दुरूनही लाभ व्हावा म्हणून त्यांच्याभोवती गोळा होत व इतर समाजातीलदेखील त्यांचे चाहते व मित्र यांचाही त्यांच्याभोवती गराडा पडे.

हे स्थित्यंतर होण्यास डॉ. बाबासाहेबांना महान तपश्चर्या करावी लागली. लोखंडाचे चणे खावे लागले. टाकीचे घाव सोसावे लागले तेव्हा त्यांना 'देवपण' किंवा 'बाबापण' प्राप्त झाले. त्यांनी अस्पृश्य समाजाचे पांग फेडले, त्यांना माणसाच्या कोटीत आणले. बाबासाहेबांच्या कर्तृत्वामुळे आज हा समाज जिवंत झाला असून त्याला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. (शं.बा. चव्हाण, प्रबुद्ध भारत).

❐ ❐

# बाबासाहेबांची तैलचित्रे : वैभवशाली वारसा

**भारतभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आकाशातील सूर्याप्रमाणे तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून नावारूपास आले. त्यांच्या प्रत्येक कार्यातून भारतीय समाजाला एक नवी प्रेरणा, नवा संदेश मिळतो. बाबासाहेबांच्या सुंदर निरागस व्यक्तिमत्त्वाने भल्याभल्यांना भुरळ पाडली. त्यांच्या महान कार्यासोबतच त्यांची सुंदर तैलचित्रे शिल्पकारांच्या कल्पक बुद्धिमत्तेतून साकारू लागली. भारतातील कोणत्याच महापुरुषाची नसतील एवढी बाबासाहेबांची छायाचित्रे भारतीय संसदेत, सरकारी कचेरीत, मोठमोठ्या प्रशस्त वास्तूत, विहारात, वाचनालयात, महाविद्यालयात आणि घरोघरी पाहावयास मिळतात. इतकेच नव्हे तर बाबासाहेबांच्या प्रतिमेला अनन्यभावे पुष्पहार अर्पण केल्यावाचून कोणताही कार्यक्रम पार पडू शकत नाही. त्यांचे छायाचित्र म्हणजे आपल्या अभिजात संस्कृतीचे सुंदर सुवासिक फुलझाडच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तैलचित्रांना वैभवशाली वारसा लाभला आहे.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे २० मार्च १९२७ रोजी ओंजळभर पाण्यासाठी सत्याग्रह केला. हा सत्याग्रह पाण्यासाठी नव्हे तर खऱ्या अर्थाने समतेसाठी होता. बाबासाहेबांच्या या महान क्रांतिकारी कार्याकडे प्रसिद्ध हिंदी साहित्यकार मुन्शी प्रेमचंद आकर्षित झाले. तेव्हा मुन्शी प्रेमचंद 'हंस' नावाची पत्रिका चालवित असत. त्यांनी 'हंस' पत्रिकेत बाबासाहेबांवर लेख लिहिला आणि मुखपृष्ठावर छायाचित्र प्रकाशित करून त्यांचा यथोचित गौरव केला. बाबासाहेबांचे 'हंस' पत्रिकेत प्रसिद्ध झालेले हे भारतातील पहिलेच छायाचित्र म्हणावे लागेल!

कालांतराने रघुवीर मुळगांवकर 'नवयुग' (१९४६), हळदणकर 'प्रभा' (१९५२), भालचंद्र धोत्रे 'प्रबुद्ध भारत' (१९५९), दिनकर रोकडे 'रिपब्लिकन' (१९६०), प्रमोदबाबू रामटेके 'जयभीम' (१९८४) या कलाकारांनी चितारलेली मुखपृष्ठावरील बाबासाहेबांची छायाचित्रे बरीच गाजली. तसेच १९५६ साली 'प्रबुद्ध भारत' साप्ताहिकाने प्रकाशित केलेला 'बौद्ध दीक्षा विशेषांक' आणि 'डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण विशेषांका'वरील बाबासाहेबांचे कारुणिक चित्र आजही बौद्धांच्या हृदयात कायम आहे.

जे.डी. वंजारी यांनी १९५७ च्या दशकात 'बौद्ध भारत' साप्ताहिकात काढलेली बाबासाहेबांची छायाचित्रे अविस्मरणीय अशीच होती. तसेच अमरावतीचे प्रसिद्ध छायाचित्रकार गुलाबराव नागदिवे यांनी काढलेली छायाचित्रे आंबेडकरी अनुयायांना फारच आवडली. नागदिवे यांनी काढलेली छायाचित्रे नागपूरच्या दीक्षाभूमीवर भिक्खू निवासात पाहावयास मिळतात. तथागत बुद्ध,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड यांच्या छायाचित्रांचे दर्शन होताच मन मोहरून जाते. शासकीय मुद्रणालयाने १९७५ साली प्रकाशित केलेले बाबासाहेबांचे 'कृष्णधवल' छायाचित्र खूप लोकप्रिय झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अस्पृश्य समाजातील सी.डी. सोनवणे हे 'जयभीम बटनवाले' म्हणून नावारूपास आले. सोनवणे यांनी तयार केलेल्या बटनसेट, मॅचिस कव्हर पॉकिट, अंगठ्या, पिशव्या आणि रांगोळी इत्यादी वस्तूंवर डॉ. बाबासाहेबांची सुंदर छायाचित्रे चितारली होती.

### राष्ट्रीय पुरुष

मॉरिस कॉलेज (२४ फेब्रुवारी १९५७), सिटी बेंझाणी कॉलेज नागपूर (२५ फेब्रुवारी १९५७), सिद्धार्थ कॉलेज मुंबई (१५ मार्च १९५८), डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी (१९६०) तसेच धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर (१८ डिसेंबर १९७४) येथे झालेल्या अनावरण समारंभांनी जणू इतिहासच घडविला ! मॉरिस कॉलेज आणि सिटी बिंझाणी कॉलेज येथे बाबासाहेबांच्या तैलचित्राचे अनावरण करताना प्रख्यात बौद्ध विद्वान डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांनी बाबासाहेबांचा उल्लेख 'राष्ट्रीय पुरुष' या नावाने केला. आनंदजीच्या रसाळ धम्म प्रवचनाने उपस्थितांचे डोळ्यांचे काठ अश्रूंनी डबडबलेले होते असे जुने आंबेडकरी कार्यकर्ते आजही मोठ्या अभिमानाने सांगतात. सिद्धार्थ कॉलेज मुंबई येथे





महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी बाबासाहेबांच्या तैलचित्राचे अनावरण केले. याप्रसंगी चव्हाण यांनी दिलखुलासपणे भाषण करून बाबासाहेबांच्या कर्तबगारीचे गोडवे गायले. चव्हाण यांनी याप्रसंगी *'करुणासागर व बुद्धिवादी द्रष्टा'* या शब्दात बाबासाहेबांचा गौरव केला.

### संसदेमध्ये डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र

भारतीय संसदेमध्ये डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र असावे असा प्रश्न १९५७ साली रिपब्लिकन पार्टीचे नेते खासदार बी.सी. कांबळे यांनी उचलून धरला होता. संसदेसोबतच राष्ट्रपती भवन आणि सुप्रिम कोर्टातही बाबासाहेबांचे तैलचित्र लावण्यात यावे असा प्रश्न कांबळे यांनी उपस्थित केला होता. कांबळे यांनी तत्कालीन राज्यसभेचे सेक्रेटरी श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्याबरोबर यासंदर्भात प्रदीर्घ चर्चा केली होती. श्यामाप्रसाद मुखर्जी हे डॉ. आंबेडकरांचे अत्यंत निकटवर्ती होते. कारण घटना समितीमध्ये घटना लिहिण्याचे काम चालू असताना आंबेडकरांच्या बरोबर त्यांनी सतत ड्राफ्टसमनचे काम केले होते. त्यांना आंबेडकरांच्या कार्याबद्दल नितांत आदर होता. त्यांनी स्वतः त्यावेळी सरकारी मताचा कानोसा त्यांच्या पद्धतीने घेतला होता.

मुखर्जी यांनी कांबळे यांना असे सुचविले की, ''सध्या सरकार तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र पार्लमेंट, राष्ट्रपती भवन, सुप्रिम कोर्टमध्ये लावण्यास उत्सुक दिसत नाही. तेव्हा हा प्रश्न तुम्ही तसाच खुला ठेवावा आणि वाचनालयासारख्या ठिकाणी तैलचित्र लावल्यास तो प्रश्न मिटल्याप्रमाणे होईल. आज ना उद्या ही गोष्ट सरकारला मान्यच करावी लागेल व त्यांची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होण्यास काही काळ जाऊ दिला पाहिजे एवढाच एक मार्ग आहे.''

भारतीय संसदेच्या पार्लमेंट हाऊसमध्ये तब्बल ३४ वर्षानंतर डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी लावले. तैलचित्र अनावरणाचा दिमाखदार सोहळा १४ एप्रिल १९९० रोजी माईसाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. बाबासाहेबांचे हे देखणे पूर्णाकृती तैलचित्र जेबा अमरोही या महिलेने अविश्रांत परिश्रम घेऊन चितारले आहे.

**मिलिंद मानकर**

### बंगलोर नगर भवनात बाबासाहेबांचे छायाचित्र

बंगलोर नगर भवनात बाबासाहेबांच्या छायाचित्राचे अनावरण बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या शुभहस्ते २६ ऑगस्ट १९५७ रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे वडील बंधू बाळाराम रामजी आंबेडकर यांचे १९५८ च्या दशकात प्रकाशित झालेले छायाचित्र बरेच गाजले. हे छायाचित्र 'बंधुद्वय १९२७' नावाने प्रसिद्ध झाले होते. या तीन रंगी चित्राचे प्रकाशन बुधवार दि. ९ एप्रिल १९५८ रोजी सायंकाळी ६.३० वा. बाबासाहेबांचे पुतणे मुकुंदराव आंबेडकर यांच्या शुभहस्ते व्ही.जे.टी. आय सर्व्हंट क्वार्टर्स, रूम क्रमांक १७, माटुंगा मुंबई येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाले हा विलक्षण योगायोग म्हणावा लागेल!

तळेगांव दाभाडे ता. मावळ येथील नगरपालिकेच्या सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे गुरुवर्य महात्मा फुले यांची छायाचित्रे लावण्याचा समारंभ १८ जुलै १९५८ रोजी बाळासाहेब बारमुख यांच्या हस्ते पार पडला. नगराध्यक्ष डॉ. शं.बा. परांजपे, उपाध्यक्ष रा.गो. दाभाडे, न.बा. भेगडे, सी.तु. डंबे आदी प्रतिष्ठित मंडळी यावेळी उपस्थित होती.

### मुंबई विधानसभेत छायाचित्र

डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र मुंबई विधानसभेत लावण्यात यावे अशी लेखी मागणी १९५९ साली गुजरातमधून अहमदाबाद शहरातील आंबेडकरी अनुयायांमार्फत सरकारकडे करण्यात आली. त्यावर सरकारने कोणताही निर्णय घेतला नाही. त्यानंतर रिपब्लिकन आमदार डॉ. एस.एम. बंदिसोडे यांनी प्रश्न विचारून सरकारकडे मागणीप्रमाणे बाबासाहेबांचे छायाचित्र का लावले नाही, त्याबाबतच्या कारणांची चौकशी केली. आमदार शिर्के यांनीही असाच प्रश्न विचारला. त्यानंतर दोन महिन्यांनी आमदार एस.एल. कांबळे, आमदार डॉ. एस.एस. बंदिसोडे आणि आमदार राम पवार यांनी डॉ. बाबासाहेबांचे छायाचित्र सभागृहात लावावे असा ठराव आणला. अधिवेशन संपल्यानंतर विरोधी पक्षाची बैठक झाली. बैठकीत भातनकर म्हणाले,

''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची घटना लिहून जे सभागृह उभे केले त्या सभागृहातच डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र लावले पाहिजे.''

कोणताही निर्णय न होता बैठक विसर्जित झाली. त्यानंतर अधिवेशनाच्या सुरुवातीस सरकारने जाहीर केले की शिवाजी महाराजांचे छायाचित्र सभागृहात तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र लॉबीतच लावण्यात येईल. निवेदन प्रसिद्ध होताच रिपब्लिकन विधानसभा ग्रुपची तातडीची बैठक घेण्यात आली व त्यात एकमताने ठराव करण्यात आला की सभागृहातच छायाचित्र लावले पाहिजे व सरकारने लॉबीत छायाचित्र लावण्याचा जो निर्णय घेतला त्याबद्दल सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. त्यानंतर एक महिन्याने या प्रकरणावर पडदा पडला. दरम्यान विरोधी पक्षाचे नेते व्ही.डी. देशपांडे यांनी ए.जी. पवार यांना सांगितले की, ''तुम्ही आता विरोध का करता ? तुमचे भंडारे यांनी या गोष्टीस स्टिअरिंग कमिटीत मान्यता दिलेली आहे'' आणि त्यांच्या मान्यतेमुळे शेवटी डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र लॉबीत लावले गेले. या छायाचित्राचे अनावरण १० सप्टेंबर १९५९ रोजी मुंबईचे तत्कालीन राज्यपाल श्रीप्रकाश यांच्या हस्ते झाले. (साप्ताहिक रिपब्लिकन १९५९) वंदनीय आणि गौरव प्राप्त झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्रांच्या देदीप्यमान संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करून त्याचा आदर्श नव्या पिढीसमोर ठेवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. जेथे जेथे बाबासाहेबांच्या पवित्र स्मृती छायाचित्र रूपाने तेवत आहेत त्या ऐतिहासिक छायाचित्रांचा संग्रह करून एक स्वतंत्र ग्रंथराज निकटच्या भविष्यात तयार व्हायला पाहिजे. बाबासाहेबांच्या छायाचित्रांपासून प्रेरणा घेऊन जिज्ञासू कलावंत, अभ्यासक आणि विचारवंत समोर आल्यास आंबेडकरी चळवळ विकासाच्या दिशेने अग्रेसर व्हायला वेळ लागणार नाही...!

(लेखक हे महाराष्ट्र टाइम्सच्या नागपूर आवृत्तीत कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९२२६०१२०६०

# सर्वसमावेशक आणि दिशादर्शक



**ग्रामीण महाराष्ट्र आणि दुष्काळ, अवकाळी पाऊस; तसेच गारपीट यांनी गांजलेला शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू आहे. 'जलयुक्त शिवार' योजनेसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद; तसेच सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती देण्याचा व्यक्त केलेला निर्धार या दोन गोष्टी त्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. यानिमित्ताने सरकारच्या प्राधान्यक्रमाचा पाया भक्कम आणि सुस्पष्ट आहे, असे म्हणता येईल. या अर्थसंकल्पातून समाजातील प्रत्येक घटकांसाठी प्रयत्न करताना सरकारने अनेक नवीन योजनांची घोषणा केली आहे. अशा सर्वसमावेशकतेतूनच 'मेक इन महाराष्ट्र'ची बीजेही रोवली गेली आहेत...**

## अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

### सरकारचे प्राधान्य :

- कोरडवाहू शेतीस स्थैर्य देणे, पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करणे, विषमता दूर करणे, वाढत्या शहरीकरणाच्या आव्हानास सामोरे जाणे व रोजगाराच्या संधी निर्माण करणे या गोष्टींवर भर.
- महसुली संकलन साधणे आणि भांडवली खर्च अधिक परिणामकारक व्हावा, यासाठी कठोर उपाययोजनांचे सूतोवाच.
- शेतीसाठी विविध योजना, उद्योग व व्यापारासाठी पोषक वातावरण, उत्तम पायाभूत सुविधा, निधीचा परिणामकारक विनियोग आणि चोख आर्थिक व्यवस्थापनामुळे दोन अंकी विकास दर गाठण्याचा विश्वास.

### सावकारी कर्जमुक्ती :

- मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी १७१ कोटी रुपयांची तरतूद.

### शेतीविषयक योजना :

- 'जलयुक्त शिवार' अभियानासाठी रु. १००० कोटी, सिमेंट नाला बांध कार्यक्रमासाठी रु. ५०० कोटी.
- मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी रु. १०० कोटींच्या निधीची तरतूद.
- सूक्ष्म सिंचनाच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी रु. ३३० कोटींची तरतूद.
- यवतमाळ जिल्ह्यासाठी मोतीरामजी लहाने कृषी समृद्धी योजना. त्यासाठी रु. ५० कोटी. याद्वारे कृषी यांत्रिकीकरण व कृषी क्षेत्रातील अन्य योजनांचे एकत्रीकरण
- राज्य रोजगार हमी योजनेसाठी रु. ७०० कोटी, तर मनरेगासाठी रु. १९४८.८० कोटी.
- राष्ट्रीय कृषी योजनेसाठी रु. ३३६ कोटी व राष्ट्रीय अन्न सुरक्षा, कृषी विस्तार व तंत्रज्ञान व फलोत्पादन अभियानासाठी रु. २५७ कोटी.
- पशुधन विकासासाठी रु. १४० कोटी.

### सिंचन :

- सिंचन प्रकल्पाचे अचूक तांत्रिक व वित्तीय नियोजन करून प्रकल्प अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम राबवण्यासाठी जलसंपदा विभागास रु. ७२७२ कोटींचा निधी.

## सर्वसमावेशक विकासाचा संकल्प : मुख्यमंत्री



राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चामध्ये भरघोस वाढ करतानाच कृषी आणि ग्रामविकासासाठी पायाभूत सुविधा तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यासोबत शेतकरी, महिला, उद्योजक, तरुण अशा सर्व घटकांचा विचार करतानाच ग्रामीण आणि शहरी भाग असा सुयोग्य समतोलही यातून साधण्यात आला आहे. यातून राज्याच्या अर्थव्यवस्थेला निश्चितपणे गती येईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. श्री. फडणवीस यांनी म्हटले की, सिंचनासाठी केलेली ७२७२ कोटींची भरीव तरतूद, ग्रामीण रस्ते विकासासाठी ३००० कोटी तसेच यासाठीच्या इतर तरतुदींसह एकूण रस्ते विकासासाठी ६००० कोटी, स्वच्छ भारत अभियानासाठी ८१० कोटी, उद्योग-पर्यटन सामूहिक प्रोत्साहन योजनेसाठी ३१५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून हा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे हित जोपासणारा असल्याचे दिसून आले आहे.

---

**मुकुंद लेले**

या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पाकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. राज्याची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसताना हे नवे सरकार कशाप्रकारचा अर्थसंकल्प सादर करणार, याची उत्सुकता होती. परंतु, अभ्यासू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी राज्यातील दीनदुर्बल, शोषित, पीडित, अंध, अपंग, निराधार, आदिवासी, दलित, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, महिला, अल्पसंख्याक आदी समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याची भूमिका घेतली. या सर्वसमावेशकतेतून 'मेक इन महाराष्ट्र'ची बीजेही रोवली गेली आहेत. या भूमिकेला जागताना अर्थसंकल्पात अनेक योजना जाहीर केल्या गेल्या आहेत. त्यामुळे अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेल्या या अर्थसंकल्पात राज्यातील तमाम जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंबच उमटल्याचे जाणवते.

ग्रामीण महाराष्ट्र, दुष्काळ आणि अवकाळी पाऊस तसेच गारपीट यांनी गांजलेला शेतकरी हा अर्थमंत्र्यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू होता. 'जलयुक्त शिवार' योजनेसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद; तसेच सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती देण्याचा व्यक्त केलेला निर्धार या दोन गोष्टी त्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. 'जलयुक्त शिवार'मधून दुष्काळमुक्तीच्या वाटा प्रशस्त होण्याची शक्यता आहे. अशा कल्पनांसाठी सरकार गंभीर आहे, हे सरकारने दाखवले आहे. यामुळे सरकारच्या प्राधान्यक्रमाचा पाया भक्कम आणि सुस्पष्ट आहे, असे म्हणता येईल.

वाढत्या नागरीकरणामुळे शहरे आणि महानगरे येथील जनतेलाही त्यांनी उपेक्षित न ठेवता त्यांच्यासाठीही योजनांची खैरात केली. त्यासाठी निधी कोठून आणि कसा आणायचा यात सरकारची कसोटी लागणार असली तरी या सरकारच्या धोरणांची भक्कम साथ त्याला लाभेल, याचा विश्वास वाटतो. कारण सध्या महसुली तूट तेरा हजार कोटींवर जाऊन पोचली आहे आणि हेच आपल्या राज्यापुढील मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्याबाबत भूमिका घेताना ३७५७ कोटी रुपये महसुली

### रस्ते विकास :

- ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना सुरू करण्याची घोषणा. त्यासाठी रु. ३०० कोटींचा नियतव्यय व योजनेची प्रगती पाहून दरवर्षी रु. १००० कोटी.
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत रु. ७९० कोटी; तसेच या योजनेंतर्गत प्रशासकीय खर्च व भाववाढीच्या निकषात न बसणाऱ्या कामांसाठी रु. ७१ कोटी असा एकूण रु. ८६१ कोटी नियतव्यय.
- पाच हजार किमी लांबीच्या रस्त्यांच्या सुधारण्यासाठी रु. ३२१३ कोटी
- सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर व मुंबई या ठिकाणी मासेमारीसाठी जेट्टी उभारण्यासाठी रु. २० कोटी
- कृषी व संलग्न क्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर ४ टक्क्यांनी वाढविण्याचे उद्दिष्ट
- गुणवत्तापूर्ण पारंपरिक देशी बीजांचे शास्त्रोक्त पद्धतीने जतन करण्यासाठी 'जनूक बँक', यासाठी रु. १० कोटी
- 'आमदार आदर्श गाव योजने'ची घोषणा.

### विद्युत :

- वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी रु. ५३५.३४ कोटी
- वीज वितरण प्रणालीची क्षमता वाढविण्यासाठी पायाभूत आराखडा-२ या योजनेसाठी रु. ५३८.८३ कोटी.
- जलविद्युत प्रकल्पांसाठी रु. ९०० कोटी

### घरकूल योजना :

- दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्वत:ची जागा खरेदीसाठी आर्थिक साह्याची 'पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाह्य योजना'. या योजनेखाली रु. ५०,००० पर्यंत अर्थसाह्य. योजनेसाठी रु. २०० कोटी नियतव्यय.
- घरकूल योजनेंतर्गत १,००,००० घरे बांधण्याचे सरकारचे लक्ष्य व त्यासाठी रु. ८८४.४६ कोटींची तरतूद.
- 'स्वच्छ भारत अभियाना'साठी रु. ८१० कोटी

### पायाभूत सुविधा :

- मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पासाठी रु. १०९.६० कोटी, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी रु. १९७.६५ कोटी व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी रु. १७४.९९ कोटींचा निधी.
- 'स्मार्ट सिटीज' योजनेसाठी रु. २६८ कोटींचा निधी

## संपूर्ण महाराष्ट्राला समान न्याय

चांदा ते बांदापर्यंत राज्याचा सर्वांगीण विकास करणारा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया अर्थराज्यमंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, अर्थसंकल्पात संपूर्ण महाराष्ट्राला समान न्याय देण्यात आला आहे. कोणावरही अन्याय करण्यात आलेला नाही.



शेती क्षेत्रावर सध्या आलेले संकट आणि या क्षेत्राची नकारात्मक वाढ थांबविण्यासाठी विकेंद्रित पाणीसाठे तयार करणे, सिंचनाच्या मोठ्या प्रमाणात सोयी तयार करणे, आपत्ती निवारण योजना, सूक्ष्म सिंचन योजना आदींमुळे शेती क्षेत्राच्या विकासाला मोठीच चालना मिळणार आहे.

तुटीचा २०१५-१६ वर्षासाठीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. बहूचर्चित 'एलबीटी' येत्या एक ऑगस्ट २०१५ पासून रद्द होणार आहे. त्याचबरोबर 'व्हॅट'च्या वाढीव करदराबाबत व्यापक विचारानंतर निर्णयाचे आश्वासन देण्यात आले आहे. मुंबई वगळता २५ महापालिकांमध्ये 'एलबीटी' लागू आहे. तो रद्द करून त्याऐवजी मूल्यवर्धित करात (व्हॅट) दोन टक्के वाढ करण्याचा अर्थमंत्र्यांचा प्रस्ताव आहे. त्याद्वारे मिळणाऱ्या जादा महसुलातून आता या महापालिकांना अनुदान दिले जाईल. यानिमित्ताने व्यापारीवर्गाच्या प्रलंबित मागणीची पूर्तता करून सरकार त्यांना दिलासा देणार आहे.

### प्रत्येक घटकांसाठी प्रयत्न

अल्पभूधारक शेतकऱ्यांपासून अंगणवाडी सेविकांपर्यंत आणि वाय-फाय सेवेसाठी उत्सुक असलेल्या तरुणांपासून राज्यातील विविध धर्मीयांच्या तीर्थस्थळी वारी करणाऱ्यांपर्यंत सर्वांनाच दिलासा देण्यात आला. थोडक्यात सांगायचे तर या अर्थसंकल्पातून समाजातील प्रत्येक स्तरातील घटकांसाठी प्रयत्न करताना सरकारने अनेक नवीन योजनांची घोषणा केली आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. या योजनांसाठी पैसा उभारण्यासाठी चटई क्षेत्राच्या अधिमूल्यात (एफएसआय) वाढ करणे, देशी मद्यावर कर वाढवणे आदींतून ६४३ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणार असल्याचे म्हटले आहे. या अर्थसंकल्पामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत महसुली तूट कमी करण्याचा प्रयत्न केला असून, यापुढे खर्चावर नियंत्रण, काटकसर करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे.

### कररचनेतील संदिग्धता दूर

अर्थमंत्र्यांनी कररचनेतील संदिग्धता दूर करण्याचा प्रयत्न केला, हे स्वागतार्ह आहे. करप्रणालीतील सुधारणांमुळे राज्याला अतिरिक्त ६४३ कोटी रुपयांचा महसूल मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त केला गेला आहे. करकपातीमुळे महिलावर्गाच्या पर्स, हँडबॅग तसेच एलईडी बल्ब स्वस्त होणार आहेत, तर चटईक्षेत्र अधिमूल्यातील वाढीमुळे घरांच्या किमती काही प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय कर्करोगावरील औषधे करमुक्त करण्यापासून महिलांवरील



व्यवसायकरासाठीच्या उत्पन्नाची मर्यादा १० हजारांपर्यंत वाढविण्याच्या अनेक घोषणा यावेळी केल्या आहेत. सावकारी कर्जमुक्तीसाठी रु. १७१ कोटी, तसेच गडचिरोली, गोंदिया, भंडारा परिसरांतील मालगुजारी तलावांच्या

- बसगाड्या, बस स्थानकांच्या दुरुस्तीसाठी रु. १४१ कोटी
- बांधकामाधीन रेल्वे प्रकल्पांसाठी रु. ६८.६० कोटी
- विमानतळ विकासासाठी रु. ९१ कोटी
- 'मिहान' प्रकल्पासाठी भूसंपादन व पुनर्वसन करण्यास रु. २०० कोटी

■ **उद्योग व पर्यटन :**
- सामूहिक प्रोत्साहन योजनेसाठी रु. ३१५० कोटी
- यंत्रमागधारकांना वीजदरात सवलतीसाठी रु. १२३२.५३ कोटी
- संरक्षित किल्ल्यांचे जतन व संरक्षणासाठी रु. ५० कोटी
- 'महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळा'ची स्थापना.
- देशी-विदेशी पर्यटकांसाठी मार्गस्थ सुविधा उपलब्ध करण्यासाठी रु. ५० कोटी
- ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, गोरेवाडा आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांच्या विकासासाठी रु. १०० कोटी
- प्रत्येक जिल्ह्यात 'उत्तमराव पाटील वन उद्यान' निर्मिती.

■ **वने :**
- महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळ स्थापण्याची घोषणा.
- अधिसूचित वन्यजीव अभयारण्याबाहेर लोकसहभागातून वन वृक्षाच्छादन वाढविणे व वृक्ष संपत्तीचे व्यवस्थापन करणे यासाठी 'श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना' या नवीन योजनेची घोषणा.

■ **कौशल्य विकास :**
- कौशल्य विकास व स्वयंरोजगार साह्यासाठी 'प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना' या नवीन योजनेची घोषणा.
- सेवाग्राम जिल्हा वर्धा येथे ग्रामोद्योग, कुटीरोद्योग व हस्तकला यांना प्रोत्साहन देण्यासाठी संसाधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना.

■ **शिक्षण, आरोग्य, महिला विकास :**
- मुलींच्या वसतिगृहासाठी रु. ११२.५० कोटींचा निधी
- मुलींच्या शासकीय वसतिगृहांना संरक्षित भिंती बांधण्याचा निर्धार.

संवर्धनासाठी गेल्या अर्थसंकल्पाच्या दसपट अधिक म्हणजे १०० कोटी रुपये, त्याशिवाय, मोतीराम लहाने कृषिसमृद्ध योजना, दारिद्र्यरेषेखालील पण जमिनी नसणाऱ्यांसाठी पंडित दीनदयाळ जागा खरेदी अर्थसाह्य, प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र अशा विविध योजनांच्या रूपाने गोरगरीब जनतेच्या आशाआकांक्षांची पूर्तता करण्यास सरकार खरोखरच वचनबद्ध असल्याचे दिसून येते.

### उद्योगाच्या विकासाला प्राधान्य

'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र'चा नारा देण्यात आला असून, राज्यात गुंतवणूक करणाऱ्यांना कमीतकमी वेळेत परवाने देण्याकडे सरकारचे विशेष लक्ष राहणार आहे. त्याचबरोबर राज्यात पर्यटनवाढीला असलेला वाव लक्षात घेऊन पर्यटन विकास व त्यातून रोजगारनिर्मितीवर भर देणार असल्याचे या अर्थसंकल्पाने अधोरेखित केले आहे.



केंद्र सरकारच्या 'खासदार आदर्श गाव योजने'च्या धर्तीवर राज्यात 'आमदार आदर्श गाव योजना' सुरू करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षांत या योजनेतून सुमारे एक हजार गावे विकसित होतील, अशी अपेक्षा आहे.

### जनतेच्या भावनांचा आदर

गेल्या अनेक वर्षापासून चर्चेत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील भव्य स्मारकासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. महाराष्ट्रातील जनतेचे आदरस्थान असलेल्या बाळासाहेब ठाकरे यांचे मुंबईत स्मारक आणि मुंबई विद्यापीठात त्यांच्याच नावाने अध्यासन सुरू करण्याचा; तसेच भाजपचे नेते गोपीनाथ मुंडे यांचे औरंगाबेदत स्मारक उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या सरकारने घेतला आहे.

### महिलावर्गाकडेही विशेष लक्ष

अर्थसंकल्प मांडताना राज्य सरकारने महिलावर्गाकडे विशेष लक्ष दिल्याचे जाणवते. त्यामुळेच या अर्थसंकल्पात दहा हजार रुपयांपर्यंत वेतन असणाऱ्या महिलांना व्यवसाय करमाफी देण्यात आली आहे. यापूर्वी साडेसात हजार रुपयांपर्यंत वेतन असणाऱ्यांनाच हा लाभ दिला जात होता.

मात्र, दहा हजार रुपयांपर्यंत ही मर्यादा वाढविल्याने दीड लाख महिलांना त्याचा फायदा होणार आहे. महिला बचत गटांना जिल्हास्तरावर कायमस्वरूपी 'पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर बाजारपेठ' निर्माण करण्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. यासाठी २०० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. महिलांच्या बचत गटांना एका छताखाली कायमस्वरूपी बाजारपेठेची मागणी केली जात होती. या बाजारपेठेच्या निमित्ताने त्या दिशेने सरकारने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची बाजारपेठ तयार केली जाणार आहे. याशिवाय राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेसाठी २०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, तर अंगणवाडी सेविकांना वेतनवाढ देण्याची घोषणा करण्यात आली. माध्यमिक शाळेत दाखल होणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहासाठी ११२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच येत्या तीन वर्षांत राज्यातील मुलींच्या सर्व शासकीय वसतिगृहांना संरक्षक भिंत बांधण्यात येणार आहे, त्यासाठी २५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुलींच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर सरकार गांभीर्याने पाहत असल्याचे जाणवते.



(लेखक हे दै. सकाळ वृत्तपत्र समूहात पुणे येथे सहसंपादक म्हणून कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९८८१०९८४५६

- 'सर्व शिक्षा अभियाना'साठी रु. १६९०.५६ कोटी
- राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी रु. १९९६.४८ कोटी
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी रु. ३०० कोटी
- महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी कायमस्वरूपी 'पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर बाजारपेठ' निर्माण करणार

**■ अल्पसंख्याक, विशेष साह्य व आदिवासी विकास :**

- मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाला रु. १५० कोटींचे भागभांडवली अंशदान.
- विशेष साह्य योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या योजनांसाठी रु. १४५१.५० कोटी
- अनुसूचित जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती उपयोजनेसाठी रु. ६४९० कोटी
- आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेसाठी रु. ५१७० कोटी

**■ पोलीस व न्यायालये :**

- अमरावती, औरंगाबाद, नाशिक व नागपूर शहरांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार
- प्रत्येक जिल्ह्यात 'सायबर क्राईम लॅब'ची स्थापना
- न्यायालयीन इमारती व न्यायाधीशांसाठी निवासस्थाने यासाठी रु. ४१३.६० कोटी

**■ प्रशासनाचे बळकटीकरण :**

- राज्याच्या उत्पन्नाचे नवीन स्रोत; तसेच खर्चामध्ये बचतीच्या अभिनव उपाययोजना सुचविणाऱ्या कल्पक सरकारी अधिकारी, कर्मचारी यांना प्रोत्साहन.

**■ इतर महत्त्वाचे प्रस्ताव :**

- स्थानिक संस्था कर (एलबीटी) एक ऑगस्ट २०१५ पासून रद्द करणार. महसुलाची भरपाई मूल्यवर्धित कराच्या (व्हॅट) दरात वाढ करून करणार.
- महिलांसाठी रु. १०,००० मासिक वेतनापर्यंत व्यवसायकर माफ.

**केंद्रीय रसायनेआणि खते राज्यमंत्री हंसराज अहिर हे अभ्यासू खासदार म्हणून सर्वपरिचित आहेत. कोणताही प्रश्न आणि समस्यांचा ते सखोल अभ्यास करतात आणि त्या प्रश्नांची तड लावतात. आपल्याकडे सोपवण्यात आलेल्या विभागांना अधिक सक्षम आणि आधुनिक करून त्याचा देशाला अधिकाधिक फायदा कसा होईल, यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे.**

# देशभरात उभारणार उद्योगाचे जाळे

**कोळसा विभागातील भ्रष्टाचार बाहेर काढणारे अभ्यासू खासदार म्हणून दिल्लीत नावलौकीक असताना कोळसा मंत्रालयाऐवजी रसायने आणि खते हे मंत्रालय आपल्याकडे आले. याबाबत काय वाटते?**

होय! विरोधी पक्षात असताना कोळसा खाणीच्या वाटपातील गैरव्यवहाराबाबत संसदेत रान उठविण्यात मला यश आले. कोळसा उत्पादक चंद्रपूर जिल्ह्याचे मी प्रतिनिधित्व करतो. या विषयाचा अनेक वर्षांचा अभ्यास आहे. त्यामुळे देशाला अधिक निधी मिळवून देणाऱ्या वितरणव्यवस्थेला मला पुढे आणता आले. याचा आनंद आहे. तथापि, माझ्या या धडपडया व चिकित्सक वृत्तीमुळेच आता मला नव्या जबाबदारीतून थेट शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणसाची सेवा रसायने आणि खते या मंत्रालयाच्या माध्यमातून करायला मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी माझ्यावर विश्वास टाकला आहे, याचा मला आनंद आहे. नव्या मंत्रालयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खते पुरवठा, खते निर्मिती, जनसामान्यासाठी औषध निर्मिती, मुबलक व स्वस्त औषध पुरवठा हे चांगले विषय हाताळायला मिळत असल्याचा आनंद आहे.



**हे मंत्रालय अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आपल्या काय योजना आहेत?**

खरे तर हा विभाग जनसामान्यांच्या अगदी जवळचा आहे, लोकाभिमुख आहे. देशातला सर्वात मोठा उद्योग असणाऱ्या शेतीशी आणि प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याशी या विभागाचा संबंध येतो. सामान्यातील सामान्य माणसाला प्रत्यक्ष मदत मिळण्यासाठी आपण माध्यम ठरू शकतो याचा आनंद आहे. विशेष औषधांची आयात कमी करणे, देशी औषधे व खते निर्मितीला आणखी बळकटी देणे, योग्य आणि जमिनीची पत पाहून खतांचा पुरवठा करणे, शेतकऱ्यांना खते नियमित व सुलभरीत्या मिळेल यासाठी प्रयत्न करणे, सोबतच अनावश्यक

## ॲक्शन प्लॅन

- औषधी निर्मिती क्षेत्रात जगातील आघाडीचा देश होण्यासाठी प्रयत्न सुरू.
- महाराष्ट्रातील पिंपरी येथील हिन्दुस्थान ॲन्टिबायोटिक्सचे पुनरुज्जीवन करणार
- शेतकऱ्यांना खते नियमित व सुलभरीत्या मिळतील यासाठी प्रयत्न
- विदर्भात कोल टू गॅस हा प्रकल्प विचाराधीन
- देशात युरिया उद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्न करणार
- कमी किंमतीच्या व दर्जेदार औषधी निर्मितीला चालना
- प्राथमिक आरोग्य केंद्रात सरकारी औषधी स्टोअर्स निर्माण करण्याचे लक्ष
- जमिनीची पत पाहून खतांचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन
- प्लास्टिक इंडस्ट्रीजचे जाळे देशभर वाढविण्यासाठी नव्या उद्योगाला चालना

**दिल्लीत महाराष्ट्राचे आपण गेली १४ वर्ष प्रतिनिधित्व केले आहे. मंत्री म्हणून राज्याच्या वैभवात काय भर पडणार आहे?**

निश्चितच. आपल्या राज्याचा विकास ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी ठरते. सुदैवाने राज्यात आणि केंद्रात एकाच पक्षाचे सरकार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अतिशय कार्यशील आणि उत्साही आहेत. मी आधी चर्चा केल्याप्रमाणे पेट्रोकेमिकल्सवर आधारित काही प्रकल्पांवर राज्य सरकारसोबत सकारात्मक चर्चा सुरू आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील पिंपरी येथील हिन्दुस्थान ॲन्टिबायोटीक्स, महाराष्ट्र ॲन्टिबायोटीक्स आदी कारखान्यांना उभारी देणे महत्त्वाचे आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेक इन इंडियाची घोषणा केली आहे. औषधी निर्माणात अग्रेसर होऊन चीनचे आव्हान स्वीकारण्याचे त्यांनी सांगितले आहे. यासाठी या कंपनीच्या पुनरुज्जीवनासाठी पाऊले उचलणार आहे या ठिकाणी उत्पादन सुरू झाले तर चीनकडून आयात कमी करता येईल. दुसरे म्हणजे विदर्भात कोल टू गॅस या प्रकल्पावर विचार सुरू आहे. यातून युरिया निर्मितीचा कारखाना उभारण्याचे विभागाचे प्रयत्न आहेत. आरसीएफचे अनेक प्लँट महाराष्ट्रात आहेत. आणखी एखादा प्लँट उभारण्याबाबत आम्ही प्रयत्न करणार आहोत. महाराष्ट्रातील बंद पडलेल्या खते निर्मिती कारखान्यालाही चालना देण्याचे आमचे प्रयत्न आहेत. याशिवाय राज्याला लाभलेला मोठा समुद्रकिनारा हा



पेट्रोकेमिकल्स उद्योगासाठी अत्यंत पोषक अशी जागा आहे. त्यामुळे नजीकच्या काळात महाराष्ट्रात माझ्या विभागाकडून अनेक महत्त्वाचे प्रकल्प सुरू होतील याबाबत मी आशावादी आहे.

रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी जनजागृती करणे, त्यासाठी कृषी मंत्रालयासोबत संयुक्तपणे प्रयत्न करणे यावर आगामी काळात आपला भर राहील.

**औषधी उत्पादनात वाढ, सुलभ वितरण, किंमतीवर नियंत्रण संदर्भात काय धोरण आहे?**

आरोग्य विभागाकडून मागणी झालेल्या जवळपास ५०० आजारांसंदर्भातील औषधी निर्मितीचे कार्य विभागाकडे सुरू असते. अनेक देशांत आपल्याकडील दर्जेदार औषधांची निर्यात होते. तथापि, अन्य प्रगत देशांच्या तुलनेत औषधी निर्मितीसाठी आवश्यक असणारे मुख्य मूळ घटक देशात कमी प्रमाणात उत्पादित होतात. त्याची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते. मूळ औषधी द्रव्याची निर्मिती जर देशात झाली तर किंमतीवर नियंत्रण आणता येते. या क्षेत्रात 'मेड इन इंडिया'चे पंतप्रधानांचे उद्दिष्ट असून त्यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. लवकरच सर्वसामान्यांना सरकारी यंत्रणेमार्फत सर्व जिल्हा सामान्य रुग्णालय ते प्राथमिक आरोग्य केंद्रातून औषधे मिळावी, यासाठीची उपाययोजना केली जाणार आहे.

**रासायनिक खते शेतकऱ्यांना अधिक स्वस्त, मुबलक प्रमाणात मिळावी यासाठी आपल्या विभागाकडून काय प्रयत्न होत आहेत ?**

रासायनिक खते शेतकऱ्यांना सबसिडीने अर्थात सवलतीच्या दरातच मिळतात. विदेशातून २० हजार प्रती टन युरीयाची आयात केली जाते. शेतकऱ्यांना पाच हजार प्रती टन सबसिडीच्या भावाने खते उपलब्ध केली जातात. मुळात रासायनिक खतांसाठी लागणारा गॅस, पोटॅश, फॉस्फाइट आदी रसायने भारतात तयार होत नाही. त्यासाठी आपल्याला अन्य देशांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे हजारो कोटीच्या विदेशी गंगाजळीला मुकावे लागते. या खताचे योग्य वितरण व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे ही फार मोठी मोहीम असून याबाबत अनेक सुधारणा मंत्रालयस्तरावर करण्यात

## विकास झाडे

आल्या आहेत. तुटवडा पडणार नाही व सुलभपणे वितरण होईल याबाबत आम्ही दक्ष आहोत. मात्र या ठिकाणी एक नमूद करायचे आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सॉइल हेल्थकार्ड' बनविण्याची योजना आखली आहे. या योजनेमुळे जमिनीला आवश्यकता काय हे बघून खतांचा पुरवठा करता येईल.

**सध्या पेट्रोकेमिकल्स उद्योगाची जगभरात चलती आहे. आपल्याकडे या विभागाचीही जबाबदारी आहे. नवे काय संकल्प आहेत?**

होय, रसायने मंत्रालयातील हा महत्त्वाचा कार्यभार आहे. आपल्या कारकिर्दीत देशात या उद्योगाचे जाळे ठिकठिकाणी उभे राहावे असा प्रयत्न राहणार आहे. एक ते दीड लाख लोकांना रोजगार देण्याची क्षमता असणारे प्लास्टिक उद्योग क्षेत्र मुंबईत उभारण्यासाठी माझे प्रयत्न असून राज्य सरकारसोबत याच महिन्यात बैठक होत आहे. नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना गुजरातमधील दहेज येथे या उद्योगासाठी मोठे क्षेत्र उपलब्ध करून दिले होते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात प्लास्टिक इंडस्ट्री उभारण्यासाठी केंद्रीय पेट्रोरसायन विभागाने प्रस्ताव तयार केला आहे.

तेल कंपन्यांच्या रिफायनरीजमधील टाकाऊ पदार्थापासून प्लास्टिकचे दाणे तयार करण्यात येतात. हे दाणे प्लास्टिक कंपन्यांना पुरविण्यात येतात. त्यापासून प्लास्टिकच्या वस्तू निर्माण केल्या जातात.

मात्र, अलीकडे प्लास्टिकच्या वस्तूंचे महत्त्व व गरज पाहता मुंबईच्या सागरी किनारपट्टीलगत दीडशे किलोमीटरचे प्लास्टिक उद्योगासाठीचे क्षेत्र विकसित करण्याचा आराखडा केंद्रीय पेट्रोरसायन विभागाने तयार केला आहे. या उद्योगाला जो कच्चा माल लागणार आहे, त्यासाठी सागरीमार्गाचा वापर करायचा असल्याने महाराष्ट्रात मुंबईची निवड करण्यावर भर दिला गेला आहे. देशात चार राज्यात या उद्योगाला मान्यता मिळाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून या उद्योगासाठी मुंबईत जागा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

(लेखक हे नवी दिल्लीतील दै. भास्कर समूहातील
विशेष प्रतिनिधी (राजकीय) म्हणून कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९७११११८५९८

विशेष मुलाखत

# पारदर्शकतेला महत्त्व



**संघटनात्मक कामाचा दीर्घ अनुभव असणारे चंद्रकांतदादा पाटील सलग दुसऱ्यांदा पुणे पदवीधर मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत. सहकार, वस्त्रोद्योग आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) अशी महत्त्वाची खाती सांभाळणाऱ्या चंद्रकांतदादांनी या सर्व विभागांना नवसंजीवनी देण्याचा निर्धार केला आहे. रोजगारनिर्मिती आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असणाऱ्या या विभागांना एक सक्षम आणि दिशादर्शक विभाग बनवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.**

राहुल जाधव

**नवीन सहकार कायद्याची अंमलबजावणी कशी सुरू आहे ?**

जुन्या सहकार कायद्यात बरीचशी कलमे अव्यवहार्य होती. त्यामुळे हा कायदा कालसुसंगत करणे गरजेचेच होते. नवा कायदादेखील तसा घाईघाईने संमत झाला आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी आम्ही पुण्यात सहकारातील तज्ज्ञांची कार्यशाळा घेतली. त्यांनी सुचविलेल्या अनेक सूचना आणि उपाययोजना सभागृहासमोर मांडण्यात येणार आहेत. त्याचा एक ड्राफ्ट बनवून तो सभागृहासमोर चर्चेसाठी ठेवण्यात येईल. या कायद्यानुसार सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका ३० जूनच्या आत घेण्यात येणार आहेत. राज्यातील सुमारे एक लाख संस्थांच्या निवडणुका या नव्या कायद्यानुसार होणार आहेत. या निवडणुकांमुळे सुधारणांच्या दृष्टिकोनातून अनेक गोष्टी कळून येतील. सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाकडून पायाभूत सुविधा राबवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**ग्रामीण जीवनाचा कणा असणाऱ्या सहकाराकडे आपण कसे पाहता ?**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकाराचा मोठा वाटा आहे. लाखो लोक ज्या सहकारावर अवलंबून आहेत, तो सहकार टिकावा इतकेच नव्हे तर तो वृद्धिंगत व्हावा, अशीच आमच्या सरकारची इच्छा आहे. परंतु अलीकडे सहकारात जी अपप्रवृत्ती शिरली आहे, त्यामुळे एकेकाळी ग्रामीण जीवनाचा, अर्थकारणाचा कणा असणारा सहकार मोडकळीस आला आहे. महाराष्ट्रातील सहकार चालेल हे डोळ्यासमोर ठेवूनच धोरणे आखली जातील. परंतु त्याचवेळी सामान्य सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल.

**साखरेचा दर आणि एफआरपीची अंमलबजावणी याबाबत काय सांगाल ?**

एफआरपी (किमान वाजवी दर)नुसार उसाचा दर दिला नाही, तर संबधित कारखान्यांची साखर जप्त करण्यात येईल, असा इशारा आम्ही दिला आहे. राज्यातल्या काही कारखान्यांनी एफआरपीनुसार दर दिला आहे. मात्र हा नियम न पाळलेल्या दीडशेहून अधिक साखर कारखान्यांना नोटीस देण्यात आली आहे. जगभरात तसेच देशात यावर्षी साखरेचे उत्पन्न वाढले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर पडले आहेत. पण याचा फटका शेतकरी आणि साखर उद्योगालाही बसू नये, यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. ऊसदर खरेदी करामध्ये सरकारने सवलत दिली आहे. यामुळे ८७० कोटी रुपयांचा निधी शेतकऱ्यांना ऊसदर वाढवून देण्यासाठी उपलब्ध झाला आहे. पुढेही केंद्र सरकारकडून भरीव मदत मिळावी यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. परंतु कारखान्यांनीही हालचाल केली पाहिजे. गेल्या वर्षी दिलेले २१०० कोटी रुपये कारखान्यांनी अद्याप परत केलेले नाहीत. कारखाने बंद पडावेत अशी सरकारची इच्छा नाही. परंतु एफआरपीनुसार कारखान्यांनी दर दिलाच पाहिजे. दर न देणाऱ्या कारखान्यांवर सरकार कारवाई करेल. कच्ची साखर निर्यात करण्यासाठी केंद्राने दिलेल्या प्रतिटन चार हजार रुपयांच्या अनुदानासह राज्य सरकारही यामध्ये एक हजार रुपयांची भर घालणार

आहे. त्यामुळे साखर निर्यातीसाठी प्रतिटन पाच हजार रुपये अनुदान मिळू शकेल.

**बाजार समित्यांना सक्षम बनविण्यासाठी काय करणार आहात ?**

बहुतांश बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांचा माल विकण्यासाठी पायाभूत सुविधाच नाहीत. एकूण प्रक्रियेमध्ये बाजार समित्यांना भूमिकाच नाही. समिती सदस्यांची भूमिका ॲक्टिव्ह कशी होईल हे आम्ही पाहणार आहोत. सध्या बाजार समित्यांची भूमिका केवळ सेस घेण्यापुरतीच मर्यादित आहे. शेतकऱ्यांच्या मालाला जादा भाव मिळावा यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच नाशवंत मालासाठी कोल्ड



**सहकारी साखर कारखानदारी टिकावी अशीच सरकारची प्रामाणिक भूमिका आहे. परंतु ऊस उत्पादक केंद्रस्थानी ठेवूनच या कारखान्यांचा कारभार चालला पाहिजे. गैरव्यवस्थापन, अनावश्यक नोकरभरती या गोष्टींना आळा बसलाच पाहिजे. सहकारी साखर कारखानदारी बंद पडून खासगी साखर कारखान्यांची मक्तेदारी निर्माण होईल, असे कोणतेही पाऊल सरकार उचलणार नाही.**

स्टोरेज उभारण्याची गरज आहे. त्या दृष्टीने प्रयत्न करणार आहोत. शेतीमाल प्रक्रिया केंद्रांसाठीही बाजार समितींच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील. अनेक बाजार समित्यांमध्ये स्वच्छतागृहे नाहीत, शेतमाल घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना जेवणासाठी हॉल अथवा योग्य जागा नसते. या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात येतील. त्याचबरोबर बाजार समित्यांचे संगणकीकरण करणे, त्या एकमेकांशी इंटरकनेक्ट करणे, नेटवरून शेतमालाचे दर कळावेत यासाठी उपाययोजना करत आहोत.

**बाजार समित्यांमधील व्यापारी, दलालांची मक्तेदारी मोडून काढून शेतकऱ्यांच्या मालाला जादा भाव कसा मिळेल, यासाठी ज्या उपाययोजना कराव्या लागतील त्या प्राधान्याने केल्या जातील.**

**वस्त्रोद्योगाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारने योजना जाहीर केली आहे. राज्य सरकार या संदर्भात काय पावले उचलणार आहे?**

वस्त्रोद्योगाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्राने टेक्सटाइल अपग्रेडेशन फंड (टफ्स) योजना जाहीर केली आहे. या माध्यमातून वर्षभरात अनुदान मिळालेले नाही. यासाठी राज्य सरकार पाठपुरावा करत आहे. राज्यात सुमारे १५ ते २० लाख कामगार या उद्योगावर अवलंबून आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने रोजगार देणाऱ्या या उद्योगासाठी आम्ही सर्वोतोपरी मदत करणार आहोत. यंत्रमाग कल्याणकारी योजनेंतर्गत आरोग्य, घरकूल, निवृत्तीवेतनासाठीही प्राधान्याने पाठपुरावा करणार आहोत. वस्त्रोद्योगाबाबत नवे धोरणही आम्ही जाहीर करणार आहोत. राज्यात कापूस पिकतो विदर्भात आणि सूतगिरण्या मात्र आहेत पश्चिम महाराष्ट्रात. वाहतुकीमध्ये होणारा खर्च टाळण्यासाठी कापूस ते कापड अशी संकल्पना राबवणार आहोत. ७५ टक्के कापूस बाहेर जातो. त्याला इथेच उठाव देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. मराठवाडा, विदर्भासाठी असणारी सबसिडी वाढविण्याचा विचार आहे. जुन्या गिरण्या नुकसानीत आहेत. त्यांच्याकडील अतिरिक्त जमिनी विकून निधी उपलब्ध केला जाईल.

**यंत्रमागधारकांना सवलतीत वीज मिळावी अशी मागणी सातत्याने होत आहे. याबाबत सरकारचे धोरण काय आहे ?**

रोजगारक्षम असणाऱ्या या उद्योगाला सरकारचे पूर्ण सहकार्य राहणार आहे. यंत्रमागधारकांना वीजदरप्रश्नी सबसिडी द्यावीच लागेल. वीजदर कमी लावले नाहीत तर, कच्च्या मालावर मोठा खर्च करावा लागणारा हा उद्योग स्पर्धेत टिकणार नाही. त्यामुळे याबाबत सरकारचे धोरण सहानुभूतीचेच आहे.

**टोलमुक्तीसाठी कटिबद्ध**

**राज्यातील जनतेची टोलमुक्ती करणार या आश्वासनावर आम्ही ठाम आहोत. त्या दृष्टीने उपाययोजनाही सुरू केल्या आहेत. लवकरच लहान चारचाकी वाहनांना टोलमुक्ती असणारे धोरण आम्ही जाहीर करू.**

**राज्यात टोल हा सर्वाधिक चर्चेत असणारा विषय आहे. याबाबत सरकारची काय भूमिका आहे ?**

कोणत्याही परिस्थितीत आम्ही महाराष्ट्र टोलमुक्त करणारच. त्या दृष्टीने आम्ही पावले टाकण्यास सुरुवात केली असून राज्याचे नवीन टोल धोरण लवकरच जाहीर करणार आहोत.

नव्या धोरणानुसार चारचाकी लहान गाड्यांना टोलमधून पूर्ण सवलत देण्यात येणार आहे. त्याऐवजी मालवाहतूक करणाऱ्या, अवजड वाहनांच्या टोल आकारणीत वीस टक्के वाढ करण्याचा विचार आहे. यासाठी राज्यातील अनेक महामार्गांवर लहानमोठी किती वाहने ये-जा करतात आणि त्यांच्याकडून किती टोल वसूल केला जातो याची माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. राज्यात मोठ्या वाहनांच्या टोलआकारणीत थोडी वाढ केली तर टोलवसूलधारकांना आपण त्यांची रक्कम देऊ शकतो. शिवाय भविष्यात टोल नाके उभारताना लहान वाहनांना टोलवसुलीतून सवलत देण्याची अट घातली जाणार आहे. तर २०० कोटी रुपयांपर्यंत खर्चाच्या सध्याच्या टोल नाक्यांची वसुलीनंतरची रक्कम सरकार एकदम देणार आहे.

(लेखक हे महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्राचे कोल्हापूर आवृत्तीचे वरिष्ठ पत्रकार आहेत.)
**संपर्क: ०९६५७७१७४८९.**

# लोकहिताची ऊर्जा



**मंत्री म्हटले की लाल दिव्याची गाडी, कार्यकर्त्यांचा गराडा ठरलेला असतो. या स्थितीत मंत्री दिवसभरात काय व कसे काम करत असतील, ही सर्वसामान्य माणसाला उत्सुकता असते. त्या अनुषंगाने 'एक दिवस मंत्र्यांसोबत' या सदरासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या सोबत राहून त्यांचा दिनक्रम जाणून घेतला. त्यांच्यातला माणूस पाहण्याची संधी या निमित्ताने मिळाली. प्रचंड ऊर्जा आणि सामान्य माणसाच्या हिताची तळमळ ही बाब ठळकपणे त्यातून निदर्शनास आली.**

सकाळीच लांबच्या ठिकाणाहून निघून सांताक्रूझला पोहोचणे तसे जिकिरीचे आहे. रात्र असो की दिवस माणसाचा अविरत लोंढा मध्य आणि पश्चिम रेल्वेतून कायमच वाहत असतो. तरीही मंत्रिमहोदयांची दिनचर्या समजून घेण्यासाठीचा प्रवास सुखमय वाटत होता. मी डॉ. सावंत यांच्या सांताक्रूझ येथील 'पुष्पवाटिका' या बंगल्यावर साडे आठला पाहोचलो. त्या अगोदरच माझे सहकारी संजय ओरके हातात डायरी घेऊन उभे होते. बरोबर ९ वाजता मंत्रिमहोदय बाहेर पडले. दहा मिनिटाच्या अंतरावर म्हणजे कोल डोंगरी (अंधेरी) येथे त्यांचं 'मधुगोविंद निवास' हे दुमजली कार्यालय आहे. कार्यालयात शिरता शिरता समोरच्या एका मोठ्या तसबिरीने लक्ष वेधले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना मंत्रिमहोदय पुष्पगुच्छ देत आहेत, असा फोटो होता. चौकशी केली असता मंत्रिमहोदय पहिल्यांदाच मुंबई पदवीधर मतदारसंघातून निवडून आले होते, त्या काळातील ती आठवण आहे. कार्यालयात सेनेचे कार्यकर्ते, शाखाप्रमुख यांची गर्दी होती. डॉक्टर दीपक सावंत हे विदर्भातील संपर्क नेते असल्याने विदर्भातील कार्यकर्तेही दिसत होते. प्रत्येकाच्या हातात निवेदनाचा कागद होता. बहुतेक निवेदने आरोग्य सुविधांच्या बाबत होती. कार्यकर्ते निवेदन देत होते. प्रत्येक निवेदन शांतपणे वाचून ते प्रत्येकाच्या समस्येचे निराकरण करत होते. निवेदनावर स्वाक्षरी व शेरे

लिहीत होते. मध्येच पी.ए.ला फोन लावायला सांगत होते. 'मला या समस्येची माहिती आहे', 'हे आपण नक्कीच सोडवू', 'मला हे काम करायचेच आहे', 'संपूर्ण राज्यातील आरोग्य यंत्रणा मला अद्ययावत करून सामान्य माणसाच्या आरोग्याच्या समस्या सोडवायच्या आहेत', 'ग्रामीण रूग्णालये, जिल्हा उप रूग्णालये आणि जिल्हा रूग्णालये येथेच रूग्णांच्या आजाराचे निदान होऊन उपचार होतील, अशी अद्ययावत आरोग्ययंत्रणा करावयाची आहे', असे ते निवेदनकर्त्यांना सांगत होते.

प्रत्येक मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक असते. सकाळी दहा सव्वा दहाला डॉ.सावंत यांनी आपले कार्यालय सोडले आणि ११ वाजायच्या आत ते मंत्रालयात पोहोचले. आम्ही त्यांच्या दालनात मंत्रिमहोदयांची वाट पाहत बसलो. कॅबिनेट संपवून ते १२.३० वाजताच्या सुमारास आपल्या दालनात दाखल झाले. आपल्या खुर्चीत विराजमान होताच राज्य कामगार विमा योजनेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना ३५ टक्के नॉन प्रॅक्टिसिंग अलाऊंस कॅबिनेट बैठकीत मंजूर केल्याची बातमी त्यांनी उपस्थितांना दिली. त्यानंतर शिवसेनेचे आमदार डॉ.रायमुणकर, डॉ. शशिकांत खेडेकर यांचे आगमन झाले. स्थानिक प्रश्नांवर त्यांची मंत्रिमहोदयांसमवेत चर्चा झाली. लागलीच आमदार सुभाष साबणे यांचे आगमन झाले. आमदार ॲड. रामचंद्र पुनाजी अवसरे हेही दाखल झाले. प्रत्येकजण आपल्या मतदार संघात अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी मंत्रीमहोदयांसोबत चर्चा करीत होते. आपण आता सत्तेवर आहोत, त्यामुळे आपले सर्व प्रश्न मार्गी लागतील अशी ग्वाही आरोगयमंत्र्याकडून मिळत होती.

देवगडच्या ग्रामीण रूग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.एक.के.भिसे यांचेही



**डॉक्टर सावंत अजिबात थकलेले, वैतागलेले पाहायला मिळाले नाहीत. त्यांच्यातील काम करण्याचा उत्साह, प्रश्न सोडविण्याची तळमळ क्षणोक्षणी जाणवत होती. सत्ता मिळाल्यानंतरही त्यांचे पाय जमिनीवरच आहेत, याची प्रचिती येत होती. अत्यंत मनमोकळेपणाने प्रत्येकाशी ते बोलत होते, त्यांचे म्हणणे ऐकून घेत होते. आपण जनतेच्या सेवेसाठी आहोत असा भाव त्यांच्या वागण्याबोलण्यातून स्पष्टपणे जाणवत होता. सामान्य माणूस आणि जनहितार्थ झपाटलेला माणूस यात हाच फरक असल्याची प्रचिती त्यांच्या सान्निध्यात आम्हाला अनुभवायास मिळाली.**



निवेदन मंत्रिमहोदयांनी स्वीकारले.

त्यांनतर सलाम मुंबई फाऊंडेशनचे लोक, टाटा मेमोरिअल हॉस्पिटलच्या मुखरोग विभागाचे प्रमुख डॉ.पंकज चतुर्वेदी, हेलिक्स सक्सेरिया फाऊंडेशनच्या पद्मजा सेनानी यांचे आगमन मंत्रीमहोदयांच्या दालनात झाले. राज्यातील मौखिक कर्करोगाने ग्रस्त रूग्णांची संख्या वाढत जात असल्याची चिंता मंत्रीमहोदयांनी व्यक्त केली. 'लोकांची सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याची सवय योग्य नाही. याबाबत लवकरात लवकर कडक कायदा करण्याचा विचार माझ्या डोक्यात पहिल्यापासूनच आहे. यासाठी विधेयकाचा मसुदा बनविण्यापूर्वी तज्ज्ञ व्यक्तींशी विचारविनिमय करण्याच्या हेतूने आपणास पाचारण केले आहे', असे मंत्रिमहोदयांनी सांगितले.

मंत्रिमहोदयांच्या कक्षात नागरिकांचा ओघ चालूच होता. निवेदन स्वीकारून त्यावर शेरा मारणे, खाजगी सचिवांना सूचना देणे यात खंड पडत नव्हता. आरोग्य संचालक डॉ.सतीश पवार यांचे आगमन झाले. त्यांच्या हातात अनेक प्रकारची कागदपत्रे होती. राज्यातील अनेक रुग्णालयासंबंधी एकेक प्रश्न ते सांगत होते. मंत्रिमहोदय ती प्रत्येक बाब शांतपणे ऐकून सूचना देत होते. इतक्यात चार-पाच पत्रकारांचा जत्था मंत्रिमहोदयांसह राज्यातील स्वाईन फ्लूबाबत स्थितीचा आढावा घेण्यासाठी दाखल झाला. त्यांच्याशी संवाद झाल्यानंतर मंत्रिमहोदय राज्य कामगार विमा योजनेच्या सर्वसाधारण सभेस परळ येथे जाण्यास निघाले. दोन तास ही बैठक सुरू होती. नंतर ते अंधेरी येथील आपल्या कार्यालयाकडे रवाना झाले. ९ वाजेपर्यंत ते कार्यालयात बसून जनतेच्या समस्यांची दखल घेत होते.

**आकाश जगधने**
**संजय ओरके**

❒ ❒



# निर्मळ आपुलकी, आस्था आणि आभाळाएवढा दिवस

**अभूतपूर्व असेच वर्णन करावे लागेल या घटनेचं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री रात्रीचा मुक्काम एका छोट्या आडोशाला असलेल्या गावात करण्याचा निर्णय घेतात. कारण त्यांना जाणून घ्यायचे असते, आपण ज्यांच्यासाठी दिवसरात्र अथक परिश्रम करतोय ते आपले ग्रामस्थ कसे जीवन जगतात. त्यांच्या समस्या नेमक्या कोणत्या आहेत. आपण जो विचार करतो तो सुयोग्य आहे की नाही.**



# शेतकऱ्याच्या घरी मुख्यमंत्र्यांची एक रात्र

खरा देश समजायचा असेल तर खेड्याकडे चला असे महात्मा गांधी म्हणत. मात्र गावातल्या माणसांचे जीवन जवळून ओळखायचे असेल तर त्याच्यासोबत रात्र काढणे अधिक सयुक्तिक असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३ मार्च रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पिंपरी (बुटी) या दीड हजार लोकसंख्या असलेल्या गावात राहण्याचा जो निर्णय घेतला तो अभूतपूर्व आणि ऐतिहासिकच ठरला. ऐतिहासिक यासाठी की बहुदा याआधी एकही मुख्यमंत्र्यांकडून असे घडलेले नाही.

३ मार्च रोजीच्या झंझावती दौऱ्यात शेवटची सभा मुख्यमंत्र्यांनी पिंपरी (बुटी) येथे घेतली. रात्रीचे दहा वाजत असल्याचे त्यांच्या लक्षात येताच, उपस्थितांना ते म्हणाले, आता माझे भाषण संपवावे लागेल. दहानंतर भाषण करता येत नाही. गृहखातेही मीच सांभाळतोय म्हणून. नियम सर्वांना सारखेच. जबाबदारीचे भान सर्वांनाच ठेवावे लागते. माझ्यासह सर्वांसाठी कायदा समान.

## मोहन राठोड

पण मी आज रात्री गावातच थांबणार, असे सांगून त्यांनी भाषण संपवले. उपस्थितांना आर्श्चयाचा धक्काही बसला आणि ते आपल्या गावीच थांबणार याचा त्यांना मनस्वी आनंदही झाला.

गावकऱ्यांशी मनमोकळ्या चर्चा केल्यावर मुख्यमंत्री चालतच विष्णू रंगराव ढुमणे या शेतकऱ्याच्या घरी आले. पडवीतल्या पलंगावर बसले. सर्वांना नमस्कार केला. सोबत पालकमंत्री संजय राठोड व आमदार मदन येरावार होते. ढुमणे यांचे घर कौलारू आणि साधे. मुख्यमंत्र्यांनी इथेच रात्रीचा मुक्काम करण्याचे ठरवल्यावर टीव्ही, कॅमेरामन आणि फोटोग्राफर यांनी मोर्चा ढुमणे यांच्या घराकडे वळवला.

विष्णू ढुमणेची लगबग सुरू झाली. काय करावे अन् काय नाही, अशी अवस्था त्यांची झाली होती. आपणच का विष्णू ढुमणे, मी त्यांना विचारले, 'होय. मुख्यमंत्री माझ्याघरी मुक्काम करणार आहेत याचा विश्वासच बसत नाही..' मुख्यमंत्र्यांच्या जेवणासाठी काही विशेष केले का? नाही हो, वरण-भात, भाजी, भाकरी, ठेचा. असा आपला खास वऱ्हाडी बेत आहे. किती मोठ्या मनाचा आणि दिलाचा माणूस. त्यांनी जेवणाच्या पंगतीला मला बसवून घेतले, मी नंतर जेवतो असे म्हणालो पण त्यांच्या आग्रहाखातर मला बसावेच लागले. पहिल्या दोनतीन घासानंतर ते म्हणाले, एकदम चविष्ट जेवण झाले आहे, बरे का ढुमणेजी! मला किती आनंद झाला, हे ऐकून. याचे वर्णन करता येत नाही. मुख्यमंत्र्यांसोबत जेवायला बसल्याचा आनंद एकीकडे होता तर दुसरीकडे दडपणही होते. पण फडणवीससाहेब माझ्याशी बोलून ते दडपण दूर करत होते.

त्यांनी विचारले, ढुमणेजी, किती एकर



शेती आहे, कोणते पीक घेता. शेतकऱ्याची अवस्था बिकट का आहे?'

साहेब, माझ्याकडे १३ एकर शेती आहे. सोयाबीन व कापूस घेतो. कोरडवाहू शेतीचा काही भरवसा नसतो. निसर्गाचा लहरीपणा खूप वाढला आहे. पाण्याची सोय झाली तर खरीप बुडाले तरी रब्बी घेता येते. पावसाने ओढ दिली तर पिकाला पाणी देता येते. पण सिंचनाची सुविधा नाही. बंधारे नाही. आमच्या गावाजवळच कोळंबी प्रकल्प आहे. धरण झाले, परंतु कॅनलचे काम पूर्ण झाले नाही. अर्धवट कामे झाली आहेत. शेतात कॅनल आले, जमीन कॅनलखाली गेली; परंतु शेतात पाणी आले नाही. धरण कागदावरच पूर्ण झाले, साहेब. शेतीस पाणी मिळते, असे दाखवले जाते. शेतकरी पेरणी करतो. वेळेवर पाऊस येत नाही. दुबार-तिबार पेरणी करावी लागते. कर्ज काढून बियाणे आणावे लागते. नंतर थोडासा पाऊस येतो. पुन्हा गायब होतो.

गावात २०३ खातेदार आहेत. मुख्य व्यवसाय शेती व शेतमजुरी आहे. शेती किफायती नसेल तर मजुराला काम मिळत नाही. शेतकऱ्याबरोबर शेतमजुरांवरही परिणाम होतो. पाऊस कमी झाला तर विहिरीला पाणी येत नाही. त्यामुळे सिंचनाचे क्षेत्र घटते. कागदावरचे सिंचन वाढलेले दिसते.

जेवणाचा आस्वाद घेताना मुख्यमंत्री व ढुमणे यांच्यातील संवाद चांगलाच रंगला होता. ढुमणे यांच्यावरील दडपण दूर झाल्याचे दिसत होते. मुख्यमंत्री एकाग्रतेने त्यांचे म्हणणे ऐकत होते. मध्येच, संजयभाऊ, जेवण फारच रुचकर आहे; असे पालकमंत्री संजय राठोड यांच्याशी बोलत जेवणाचे कौतुक करीत होते.'

बोला ढुमणेजी. खऱ्या अर्थव्यवस्थेचे गणित तुम्ही आमच्यासमोर मांडत आहात. ढुमणे सांगू लागले, 'साहेब, सिंचनाशिवाय पर्याय नाही. पूर्वीसारखा पाऊस पडत नाही. पांढरे सोने म्हणून या भागात कापसाची ओळख आहे. पण कमी उत्पादन, कर्जबाजारी, पावसाचा लहरीपणा, मुलींचे लग्न. आजारपण अशा विवंचनेत शेतकरी सापडतो अन् नाईलाज म्हणून त्यांना आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागतो. एकेकाळी या भागातला शेतकरी समृद्ध होता. आता



कोणाची तरी नजर लागल्यासारखी वाटते साहेब. हा संवाद सुरू असतानाच मुख्यमंत्र्यांनी त्यांना कौटुंबिक माहिती विचारली. आपणास चार मुली अन् एक मुलगा असून चारही मुलींची लग्ने झाली आहेत. मुलाचेही लग्न झाले आहे. एक नातू आणि नात आहे, ढुमणेंनी सांगितले. जेवण आटोपले. धन्यवाद ढुमणेजी. मुख्यमंत्र्यांनी आभार मानले. काय साहेब? आपण माझ्या घरी आलात. जेवलात, यापेक्षा दुसरा कोणता आनंद नाही. आपण माझ्या घरी याल, असे वाटले नव्हते. गावात पाच-सहा ठिकाणी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. मुख्यमंत्री कोणाकडेही थांबू शकतात. असे आम्हाला सांगण्यात आले. शाळेत झालेल्या सभेत मी होतो. आपण छान मार्गदर्शन केले. आम्हाला विश्वास दिला. शेतकऱ्यासाठी आत्मीयता दाखविली. सभा संपल्याबरोबर तुम्ही पायी चालू लागले आणि माझ्या घराकडे वळले. माझ्यासाठी हे सगळे अविस्मरणीय आहे.

जेवण झाल्यावर मुख्यमंत्री पलंगावर बसले. पालकमंत्री संजय राठोड यांच्यासोबत त्यांनी काहीवेळ बातचीत केली. रात्री बाराच्या सुमारास विश्रांतीसाठी ते बिछान्यावर पडले. ढुमणे मला सांगत होते, फडणवीससाहेब सकाळी साडेसहाच्या आसपास उठले. त्यांनी मला नमस्कार केला. अंघोळ करून अर्ध्यातासात ते तयार झाले. सकाळच्या नाष्ट्यासाठी वासुदेव कमळे यांच्याकडे निघाले. निघण्यापूर्वी ते मला आपुलकीने म्हणाले, ढुमणेजी, काल रात्री तुमच्याशी फारच चांगला संवाद झाला. खूप बरे वाटले मला. शेतकऱ्यांचे प्रश्न, दु:ख आणि अडचणी काय असते हे कळले.

ढुमणे यांच्या घरी मुक्कामाला जाण्यापूर्वी,




शाळेच्या खोलीत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या विधवा पत्नीची मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. त्यांना दिलासा दिला. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

विमलबाई श्रीराम देहारकर, जयश्री संजय गोंडे, सविता भारत जोगी, शांता प्रल्हाद ताजणे, इंदूबाई भाऊराव देठे, सुभद्रा रामचंद्र काळे, सयाबाई माणिकराव नेवारे, वंदना अरुण आडे, पार्वती माणिक कुडमते, कांता सुरेश नेताम, अनिता सदू जुमनाके आदींशी चर्चा केली. आस्थेने चौकशी करून योग्य ती मदत करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले. या गावांचा दौरा करण्यापूर्वी ३ मार्च रोजी मुख्यमंत्री विमानतळावरून दुपारी साडेचारच्या सुमारास सरळ जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहात आढावा बैठकीसाठी उपस्थित झाले.

जोपर्यंत आपण शेतकऱ्यांना सिंचनाची हमी देणार नाही, तोपर्यंत मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष होईल. शेतकऱ्यांना आपण आतापर्यंत विहिरी का देऊ शकलो नाही? या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून येत्या जून १५ अखेर ३१ हजार विहिरी खोदून पूर्ण झाल्या पाहिजेत. केवळ विहिरी पूर्ण करून चालणार नाही, तर लगेच त्यांना वीज जोडून दिली पाहिजे. आपण किती दिवस शेतकऱ्यांना आशेवर ठेवणार आहोत. जलयुक्त शिवार कार्यक्रम यशस्वी करा, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

बैठक आटोपून ते रातचांदणा या आदिवासीबहुल गावात गेले. तत्पूर्वी अरविंद बेंडे यांच्या शेतावर गेले. २००६ मध्ये बेंडे यांना पंतप्रधान पॅकेज अंतर्गत दोन म्हशी मिळाल्या होत्या, त्यांनी आता दोनवरून ३५ वर ही संख्या नेली. त्यांनी मेहनतीने ही किमया केली. बेंडेसारखे प्रयोग इतर शेतकऱ्यांनीही करावेत, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

रातचांदण्यानंतर ते घोडखिंडी या आदिवासी गावात आले. आदिवासी मुलींनी केलेल्या स्वागताने मुख्यमंत्री भारावून गेले. ४ मार्चच्या सकाळी पिंपरी (बुटी) हे गाव सोडण्यापूर्वी त्यांच्याहस्ते एका शौचालयाचे भूमिपूजन करण्यात आले.

रात्रभराची अनुभवाची शिदोरी घेऊन आम्ही इथून जात आहोत. शासन भक्कमपणे तुमच्या पाठीशी आहे. निराश होऊ नका, असा विश्वास देऊन सकाळी साडेआठच्या सुमारास मुख्यमंत्री पुढील दौऱ्यासाठी निघाले. एका अविस्मरणीय अनुभवाला मागे ठेऊन आणि निर्मळ आपुलकी आणि आस्थेने गावकऱ्यांना आभाळाएवढा दिलासा देऊन...

**संपर्क: ०९४२३८४८५४५**

# अद्‌भूत जलसृष्टी



मुंबईच्या चर्नीरोड येथील जुन्या तारापोरवाला मत्स्यालयाचे नुकतेच नूतनीकरण करण्यात आले. त्याचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी व पदुम मंत्री एकनाथ खडसे, मुंबईचे पालकमंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत पार पडला. या मत्स्यालयात अतिशय दुर्मीळ असलेले डॅम्सेल, बटरफ्लाय, एंजल, ट्रिगर वाम, स्किरल यासारखे मासे प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहेत. जेली फिशची एक आकर्षक टाकी या ठिकाणी आहे. मत्स्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ भव्य भुयारी मत्स्यालय आहे. मासे, मत्स्य व्यवसाय, सागरी मासेमारी इत्यादीबाबत वैज्ञानिक तसेच उद्‌बोधक माहितीपट प्रेक्षकांना पाहण्यासाठी ५० आसनव्यवस्था असलेल्या वातानुकुलित प्रेक्षागृहाची व्यवस्था या ठिकाणी आहे.


1


2



3



4














१ आणि २ नूतनीकरण झालेले तारापोरवाला मत्स्यालय; ३ आणि ४ नूतनीकरण झालेल्या मत्स्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री, कृषीमंत्री आणि उद्योगमंत्री; ५ प्रवेशानंतरची दर्शनी सजावट; ६ रिबन ईल मासा; ७ तारा मासा; ८ फ्लॉवर हॉर्न; ९ कासव; १० कौतुकाने बघणारी बालिका; ११ कार्प फिश; १२ गोल्ड फिश























१ कोंबडा मासा; २ समुद्री घोडा; ३ टायगर बर्ब; ४ सिंगापुरीयन कासव; ५ दमसेल फिश; ६ कौतुकाने माशांना न्याहळताना बालिका; ७ पोपट मासा; ८ दक्षिण अमेरिकन मासा; ९ ट्रिगर; १० कोई मासा; ११ एंजल मासा; १२ पिराना; १३ जायंट फिश







































छायाचित्र : राजू डोंगरे व सूर्यकांत कासार

# गिरगाव चौपाटी आता स्वराज्य भूमी

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी गर्जना करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीत लोकमान्य टिळकांनी प्रचंड मोठे योगदान दिले.

भारतीय असंतोषाचे जनक म्हणून गौरविण्यात आलेल्या लोकमान्य टिळकांवर मुंबईच्या गिरगाव चौपाटी येथे अंत्यसंस्कार झाले. या परिसराने स्वातंत्र्य संग्रामात हजारो नागरिकांना लढण्याची उर्जा आणि प्रेरणा दिली आहे.



अशा या भूमीचे महत्त्व लक्षात घेऊन त्या स्वराज्य भूमी, असे नाव देण्याचा ठराव मुंबई महापालिकेने करून राज्य सरकारकडे पाठवला होता. हा प्रस्ताव राज्यशासनाने आता मान्य केला आहे. त्यामुळे यापुढे गिरगाव चौपाटी ही स्वराज्य भूमी म्हणून ओळखली जाईल.

नव्या पिढीला देशप्रेमाची आणि कर्तव्याची जाणीव ही भूमी सातत्याने देत राहील. या निर्णयाचे स्वागत सर्वत्र झाले आहे.

# चंद्रप्रभा बोके यांना माता जिजाबाई पुरस्कार



महाराष्ट्रातील अमरावती येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या चंद्रप्रभा बोके यांना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते 'माता जिजाबाई पुरस्कार' देऊन ८ मार्च महिला दिनाला सन्मानित करण्यात आले. गेल्या चार दशकापासून सुरू असलेल्या त्यांच्या समाजसेवेचा हा सन्मान असल्याबाबत सामाजिक क्षेत्रात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. राष्ट्रपती भवनात महिला दिनानिमित्त महिलांच्या सशक्तीकरणात मोलाचे योगदान देणाऱ्या सहा महिलांना स्त्री शक्ती पुरस्कार २०१४' तर आठ महिलांना राष्ट्रपतींच्या हस्ते 'नारीशक्ती पुरस्कार २०१४' प्रदान करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही चंद्रप्रभा बोके यांच्यासह पुरस्कारप्राप्त महिलांचे अभिनंदन केले.

श्रीमती चंद्रप्रभा बोके यांनी १९६० पासून विदर्भात महिला सशक्तीकरणाचे कार्य आरंभले. रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत त्यांनी २५०० महिलांना प्रशिक्षण दिले. महिलांच्या उत्थानासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत.

## तारांकित

### धडाडीची विद्युल्लता...!

गुणवत्तेवर कुणाची मक्तेदारी नाही... आणि गुणवान असेल तर कार्य करायला आकाशही ठेंगणे आहे, याची प्रचिती नुकतीच एका मोठ्या नियुक्तीच्या घोषणेनी आली आहे. राज्याच्या वीज मंडळात वितरण विभागातील मुख्य अभियंता हे पद पुष्पा चव्हाण या महिला अभियंता सांभाळणार आहेत. २३ मार्चला त्या या पदावर रूजू झाल्या आहेत... पुष्पा चव्हाण यांच्या निवडीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष



वेधण्यामागे त्यांच्या धडाडीचा मोठा हातभार आहे. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा साऱ्याच क्षेत्रात मागासलेल्या पारधी समाजातून आलेल्या पुष्पाताई यांना हे पद त्यांच्या कर्तृत्वाच्या चढत्या आलेखाने मिळाले आहे. त्यांच्या माहेरी असलेल्या शैक्षणिक पार्श्वभूमीने त्यांनी हा प्रवास सुरू केला. आज महाराष्ट्रातील तमाम महिला विश्व त्यांच्याकडे आदर्श म्हणून पाहते.

विदर्भातील अमरावतीच्या असणाऱ्या पुष्पाताईंनी १९९० च्या दशकात अभियंता बनण्याचा निर्धार केला. १९८९ मध्ये राज्य विद्युत मंडळात त्या अचलपूर येथे कनिष्ठ अभियंता म्हणून रूजू झाल्या. तिथून अकोला, अमरावती, वाशिम येथे अधीक्षक अभियंता, मुंबई मुख्यालयात अधीक्षक अभियंता आणि आता महत्त्वाच्या वितरण विभागाचे मुख्य अभियंतापद त्या सांभाळणार आहेत. भारनियमन आणि महिला कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना यशस्वीपणे हाताळण्याचा त्यांचा गौरवशाली इतिहास आहे.

# डॉ. आंबेडकरांच्या स्मारकाचा मार्ग मोकळा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकासाठी इंदू मिलची जागा राज्य सरकारला हस्तांतरित करण्यासंबंधी एका महत्त्वपूर्ण त्रिपक्षीय करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यामुळे डॉ. आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विनंतीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला. केंद्र सरकारच्या मान्यतेने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ ही जागा राज्य सरकारला हस्तांतरित करणार आहे. या बदल्यात राज्य सरकार या जागेचा मोबदला वस्त्रोद्योग महामंडळाला देईल. केंद्र सरकारच्या सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली एक त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमार्फत तातडीने पुढील कार्यवाही करण्यात येईल. या करारावर वस्त्रोद्योग महामंडळाच्या वतीने अध्यक्ष-प्रबंध संचालक पी. सी. वैश, महाराष्ट्राच्या वतीने निवासी आयुक्त आभा शुक्ला यांनी स्वाक्षरी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि या स्मारकाच्या भूमिपूजन कार्यक्रमाला येण्याची विनंती केली. जर्मनीचा दौरा आटोपल्यानंतर योग्य तारीख निश्चित करून या कार्यक्रमाला आपण नक्की येऊ, असे आश्वासन पंतप्रधानांनी यावेळी दिले.

# चैत्यभूमीच्या सुरक्षेचा आढावा



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमी येथे येत असतात. त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा तसेच त्यांच्या सुरक्षिततेबाबत करावयाच्या उपाययोजनांच्या पूर्व तयारीचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. नागरिकांची असुविधा होऊ नये तसेच त्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व त्या उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

या बैठकीला सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, वरिष्ठ अधिकारी आणि भन्ते राहुल मित्र, नागसेन कांबळे, महेंद्र साबळे, शिरीष चिखलकर आदी उपस्थित होते.

# तारांकित

## नवे 'अँकर'

सुयोग्य व्यक्ती योग्य ठिकाणी प्रतिनिधित्व करायला लागल्या की, बदल लगेच लक्षात येतात! राज्याचे शालेय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी आपल्या पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य आदी विभागातील अनेक बदल सकृतदर्शनी लक्षात येत आहेत. मुलांच्या दप्तराचे ओझे कमी करतानाच एका नव्या निर्णयाने विनोद तावडे चर्चेत आले आहेत. साधारणत: कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन असले की, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना या क्षेत्रातील नामांकित लोकांची कायम



उपस्थिती असते. मात्र नाशिक येथील सांस्कृतिक विभागाच्या कार्यक्रमात श्री. तावडे यांनी स्थानिक आयोजकांपैकी एकाला या कार्यक्रमाचे संचालन करायला सांगितले. आता गेल्या दोन महिन्यांपासून श्री. तावडे यांच्याकडे असणाऱ्या सर्वच विभागाच्या कार्यक्रमात सूत्रसंचालक म्हणून नव्या व्यक्तींना संधी दिली जात आहे. त्यामुळे २५ हजार ते १ लाखापर्यंतच्या मानधनाचीही बचत झाली आहे. यापुढे विद्यार्थी आणि कार्यकर्ते यांना अशी संधी दिली जाणार आहे. त्यांना मानधन आणि प्रमाणपत्र देऊन या क्षेत्रात करिअर करायची संधी उपलब्ध करून देण्याची सूचना श्री. तावडे यांनी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रमुख कार्यक्रमातील हा बदल सगळ्यांच्याच कौतुकाचा विषय ठरला आहे.

# सिंचनातून टंचाईमुक्ती



गेल्या काही महिन्यात अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत. गेल्या तीन वर्षात अल्पवृष्टी, पाणीटंचाई या सर्व बाबींवर उपाय म्हणजे शाश्वत सिंचन क्षमता निर्माण करून राज्याला या समस्येतून कायमस्वरूपी टंचाईमुक्त करणे होय. त्यासाठी जलयुक्त शिवार योजना शासनाने आणली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.

विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र या साऱ्याच विभागात गेल्या काही दिवसात शेतकऱ्यांच्या आपण प्रत्यक्ष भेटी घेतल्या. राज्यातील सर्व भागात शेतकऱ्यांना सिंचन हवे आहे. राज्यातील ८२ टक्के शेती कोरडवाहू असून निसर्गावर पूर्णत: अवलंबून आहे. वारंवार निर्माण होणाऱ्या टंचाई परिस्थिती व दुष्काळावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी व शेतीमध्ये उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी पाण्याचे विकेंद्रीकरण करून या जमिनीत ओलावा निर्माण करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना हाती घेतली आहे. यामध्ये १४ वेगवेगळ्या योजना एकत्रित केल्या आहेत. यामुळे १४ लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येऊ शकते. जलसंधारणाच्या कामासाठी सर्वत्र मशिनरी पुरविली जात आहे. प्रत्येक गावाच्या पाण्याचा ताळेबंद बांधला आहे. किती पाणी कशा पद्धतीने साठविले जावे यासाठीचे स्ट्रक्चरही तयार केले आहे. या सर्व कामांचे नियंत्रण ग्रामसभेच्या स्तरावर केले जाईल. यामध्ये लोकसहभागाची आवश्यकता आहे. या सर्व कामांची स्थिती शासनाच्या वेबसाइटवर उपलब्ध केली जाईल. यामुळे पारदर्शकता राहील.

कृषीपंपाचा अनुशेष भरून काढण्यात येणार आहे. ५ लाख सौरपंप लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सुरुवातीला १० हजार सौरपंप लावण्यात येतील. विदर्भ, मराठवाडा व खान्देशात कृषीपंप देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. मागेल त्या शेतकऱ्यांना कृषी पंप देण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी २५ लाख शेतकऱ्यांना व्हॅल्यूचेन (मूल्यसाखळी)मध्ये आणण्यात येईल.

# सामाजिक बहिष्कारावर निर्बंधासाठी कायदा

गावकी बंदी, महिलांना वाळीत टाकण्याची प्रकरणे, जात पंचायतीमार्फत कुटुंबावर बहिष्कार टाकणे अशा प्रकरणांमध्ये वाढ होत आहे. असे प्रकार घडू नयेत यासाठी सामाजिक प्रबोधन आणि जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. तसेच या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार पोलीस अधिक्षकांना देण्यात येणार आहेत. सामाजिक बहिष्कार हा वाईट पायंडा असून अशा अन्यायकारक पायंड्यांना निर्बंध घालण्यासाठी राज्य शासनाने कायद्याचा आराखडा तयार केला असून त्यावर सर्वांच्या सूचना आणि हरकतींचा समावेश करण्यात येईल. समाजातील दीनदुबळ्या घटकांना सरकार पाठिशी असल्याचा विश्वास राज्य शासनाने करून दिला आहे. एका बाजूला कायदा करून ठोस कार्यवाही केली जात असून दुसऱ्या बाजूला प्रबोधनाचा मार्गही सरकारने स्वीकारला आहे.

## तारांकित

### किशोरांसाठी टोल फ्री हेल्पलाइन

किशोर मुलांच्या समस्यांसाठी टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्याचा क्रांतीकारी निर्णय राज्याच्या आरोग्य विभागाने घेतला आहे.

किशोर मुलांच्या कोणत्याही समस्या मोकळेपणे मांडण्यासाठी ही हेल्पलाइन महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या माध्यमातून योग्य सल्ला देण्याची यंत्रणा राज्य शासनाने निर्माण केली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या राष्ट्रीय



किशोर स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाने ही सेवा नुकतीच उपलब्ध केली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी या टोल फ्री हेल्पलाइनचे नुकतेच उद्‌घाटन केले.

किशोरवयीन हेल्पलाइनचा क्रमांक १८००२३३२६८८ असून सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत यावर किशोरवयीन मुले आपल्या समस्यांवर सल्ला घेऊ शकतात. उंची का वाढत नाही? कमी गुण मिळाले तर आई-बाबा रागावतात मग काय करू? शाळेतील दांडगट मुले त्रास देतात याची तक्रार कोणाकडे करू? अशा स्वरूपाचे प्रश्न मुले विचारत असून त्याला तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन मिळत आहे.

# ज्ञानदीप लावू जगी

‘नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी’ अशी प्रतिज्ञा करीत सबंध मानवजातीला अभ्युदयाचा सहजसोपा मार्ग दाखवणारे संतकवी म्हणजे श्रीनामदेव. नामदेव विठ्ठलभक्त होते. भागवतधर्माची पताका उत्तर हिंदुस्थानात - अगदी थेट पंजाबपर्यंत - फडकावण्याचे, भक्तिविचारांच्या प्रसाराचे, अखिल मानवजातीच्या कल्याणाचे, मिशनऱ्यांनाही मार्गदर्शक आणि आदर्शवत ठरावे असे अद्वितीय कार्य त्यांनी केले.

संत नामदेवांनी उत्तर हिंदुस्थानात तीर्थाटन केले. पुढे त्यांनी दक्षिणदेशीही भ्रमण केले. आयुष्यातील अर्धशतकाचा कालावधी त्यांनी उत्तर भारतात व्यतीत केला. त्यामागे ‘ज्ञानदीप लावू जगी’ ही आस प्रबळ होती.

संत नामदेव उत्तर हिंदुस्थानात गेले तेव्हाची सामाजिक स्थिती अनुकूल नव्हती. समाज मार्गभ्रष्ट झाला होता. अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत होता. रूढी आणि कर्मकांडाच्या अधीन झालेल्या समाजात भेदाभेदाच्या भिंती उभ्या राहिल्या होत्या. धर्मभावनेचा पुष्कळ प्रमाणात ऱ्हास झाला होता. अशा अंधकारमय काळात नामदेवांनी आपल्या भक्तिविचारांचा ज्ञानदीप लावला. दबलेल्या धर्मजाणिवेला आणि भक्तिभावनेला त्यांनी बळ दिले.

संत नामदेवांनी अभंग, चरित्र आत्मचरित्रपर अभंग, गौळणी, विराण्या, भारुडे, कूट, आरती आदी प्रकारात लेखन केले. भक्तिविचारांच्या प्रसारार्थ हिंदी पदे लिहिली आणि महाराष्ट्राप्रमाणेच उत्तर भारताच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक जीवनाच्या घडणीत महत्त्वाचे योगदान दिले. विठू नामाचा गजर करीत हिंदीला निर्गुण भक्तिपरंपरेचे वैभव त्यांनी प्राप्त करून दिले. मराठी संतकवितेच्या परंपरेत या भावशील कवीचे स्थान जसे अग्रगण्य आहे तसे ते हिंदी भक्तिकवितेच्या परंपरेतही आहे.

नामदेवांची हिंदी रचना ‘संत नामदेवांच्या गाथेत आणि ‘संत नामदेव की हिंदी पदावली’ मध्ये संग्रहित झाली आहे. तीत २३० पदे आहेत. शिखांच्या ‘गुरुग्रंथसाहेब’ या धर्मग्रंथात संत नामदेवांची एकूण ६१ पदे समाविष्ट आहेत.




**संतकवी नामदेवांची कर्मभूमी असलेल्या घुमान येथील ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त संत नामदेवांच्या उत्तर हिंदुस्थानातील कार्यावर टाकलेला दृष्टिक्षेप..**

नामदेवांची ही हिंदी पदे विविध प्रांतातील हस्तलिखितांतून उपलब्ध झाली आहेत. दादू दयाल, रज्जबदास, गरीबदास, खेमदास, पलूटदास, सहजोबाई या संतांच्या पदांसमवेत आणि कबीर, सेवादास, हरिदास, जगजीवन, रोहिदास, पीपा या संतांच्या रचनांच्या बाडांतूनही ती उपलब्ध झाली आहेत. भक्तिसाधनेला अखिल भारतीय पीठ प्राप्त करून देण्याचे अद्वितीय कार्य नामदेवांनी केले होते.

निर्गुणोपासनेचा पुरस्कार करणारे संतकवी म्हणून त्यांची प्रतिमा हिंदी प्रदेशात प्रभावी ठरली. हिंदी संतकाव्यवाटिकेत निर्गुणोपासनेचे बीजारोपण करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.

संत नामदेवांच्या पदांनी हिंदी संतपरंपरेला एक पृष्ठभूमी प्राप्त करून दिली. हिंदी काव्य परंपरेला आधारशीला दिली. उत्तर भारताच्या सामाजिक जीवनात त्यांच्या कार्याच्या प्रभावखुणा आजही स्पष्टपणे दिसतात. म्हणूनच गुजरात, माळवा संयुक्त प्रांत, राजपुताना व पंजाब या प्रांतातील आध्यात्मिक व सांस्कृतिक

## डॉ. सुहास पुजारी

जीवनावर नामदेवांचा अमिट प्रभाव आहे. सातशे वर्षांपूर्वी त्यांनी जे अध्यात्मबोधनाचे आणि लोकप्रबोधनाचे अमृतसिंचन उत्तर हिंदुस्थानच्या भूमीत केले, त्या अमृतसिंचनाची ओल अजूनही त्या भूमीने उरी जपली आहे. पंजाबात आणि उत्तर भारतात त्यांच्या नावाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था उभ्या राहिल्या आहेत. ते खऱ्या अर्थाने सार्वकालीन सांस्कृतिक दूत बनले आहेत. म्हणूनच बेदी, तिरखाण, बावा, सप्पय, छीणा असे विविध ज्ञातिसमूह त्यांना श्रद्धेने पूजतात. अनेक ठिकाणी नामदेव मंदिरे उभारलेली आहेत.

नामदेवांनी उत्तर भारतात अनेक ठिकाणी वारकऱ्यांच्या, भक्तभागवतांच्या वसाहती वसवल्या होत्या. त्यातीलच एक सर्वतोमुखी असलेली वसाहत म्हणजे पंजाबमधील गुरुदासपूर जिल्हयातील घुमान येथील वसाहत. येथेच ‘गुरुद्वारा बाबा नामदेवजी’ या नावाने ओळखले जाणारे नामदेवांचे स्मारक आहे. या स्मारकाच्या सेवेची व्यवस्था परंपरेने नामदेवांचे पंजाबातील एक शिष्य बहोरदास यांच्या वंशजांकडे आहे.

भक्ती, आत्मकल्याण आणि लोककल्याण यांची सांगड घालणाऱ्या संत नामदेवांना त्यांच्या उत्तरकालीन संतांनी आदराने नमिले आहे. प्रभुसंकीर्तन हे जीवितसर्वस्व मानणाऱ्या या संताने प्रपंचात राहून मोठ्या कुटुंबाची धुरा वाहिली. त्यांनाही परमार्ग दाखविला. उत्तरेत बहिष्कृत बहोरदास, केसो कलाधार, जाल्हो, लद्धा अशा विविध जातिधर्मातील आणि व्यवसायातील शिष्यांचा भक्तिमार्ग त्यांनी सुकर केला. संत नामदेवांनी भक्तिप्रसारासह लोकजागरणाचे मोठे कार्य केले. अनिष्ट रूढी, परंपरांना विरोध दर्शविला. नामदेवांनी आपल्या जीवनातून भक्तीचे मर्म तर पोचवलेच पण त्याबरोबरच कर्मयोगाचा वस्तुपाठही दिला. आहे. त्यामुळेच हिंदी भक्तिपरंपरा आणि आणि हिंदी साहित्याचा इतिहास नामदेवांना वगळून पुढे जाऊ शकत नाही.

(लेखक हे संगमेश्वर कॉलेज, सोलापूर येथे मराठी भाषा आणि साहित्याचे प्राध्यापक आहेत.)
**संपर्क :** ०९९६०२७२०३१


# प्रबोधनाचा दीपस्तंभ

**प्रबोधन हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या व्यक्तित्वाचा आणि वाणीचा प्रमुख पैलू आहे. तोच त्यांच्या संपूर्ण साहित्याचाही मूलाधार आहे. प्रबोधनाची प्राचीन परंपरा असलेल्या भारतीय संतसाहित्यात महाराजांचे संपूर्ण साहित्य खऱ्या अर्थाने आधुनिक काळातील प्रबोधनाचा दीपस्तंभ आहे. वर्तमान सामाजिक व सांस्कृतिक समस्यांच्या संदर्भात आशेचा किरण म्हणजे महाराजांचा 'ग्रामगीता' हाच ग्रंथ आहे. ३० एप्रिलला त्यांची जयंती आहे, त्या निमित्त विशेष लेख.**

साहित्याबद्दलची तुकडोजी महाराजांची धारणा स्पष्ट आहे. ते म्हणतात, 'मी साहित्य पुस्तकातून शिकलो नाही. अफाट जनसागरातून, हृदयाच्या गाभाऱ्यातून, आंतरिक उचंबळीतून मी साहित्य शिकलो. साहित्याची कल्पना मला जनसागरात मिळाली. साहित्य झब्बूशाहीसाठी, दीनदुबळ्यांच्या झोपड्या चिरडण्यासाठी नाही. जगाला जागवण्यासाठी, जगाच्या निरीक्षणासाठी, जगाच्या विशालतेत विलीन होण्याचे शिक्षण घेण्यासाठी आहे. साहित्याने भराभर उड्या मारत व अंतराळातून उडत जायला नको. अशा तकलादू क्षणजीवी साहित्याचे भवितव्य विनाशाकडे वळणारे असते.'

राष्ट्रसंतांच्या साहित्यविषयक आदर्श कल्पनेत साहित्यनिर्मितीसाठी लेखकाजवळ विश्वकरुणा आवश्यक असते. ती आपल्या हृदयात भरभरून आहे याची महाराजांना जाणीव होती. कर्दमात रुतत चाललेला सभोवतालच्या अज्ञ बहुजनसमाजापासून अत्यंत प्रगत, पण कधीकधी युद्धखोर बनणाऱ्या विश्वसमाजापर्यंत विचार करणारी त्यांच्या जाणिवेची कक्षा अतिशय व्यापक होती.

महाराजांच्या मनातील मूलभत सर्जनशील अशांती हा विश्वकरुणेचाच गोचर असा भाग होता. त्यांच्या साहित्याच्या निर्मितीच्या खोल बुडाशी त्यांना वेढून असणारी ही अशांतीच होती. आपल्या कवित्वापेक्षा आणि साधुत्वापेक्षा करुणेची आणि साधनेची महती त्यांना अधिक होती. 'माणूस द्या हो माणूस द्या मज' ही त्यांची आर्त याचना त्यांच्या जगण्याचा अर्थ समजावून सांगणारी आहे. महाराज म्हणतात,



मै कवि नही करुणा हूँ मै, उन दुखियों की दीन की।
मै साधू नही साधना हूँ, प्रेम की सत् नेम की।।
ना शान्ति है मुझमे, हूँ मै पिछडे जनों की भावना।
इन्सान बनने जो चले, मै उनकी हूँ शुभकामना।।

महाराजांचे व्यक्तिमत्त्वच असे लोकविलक्षण होते. अंतर्मुख अशा आत्मलीन भाववृत्तीतून निर्माण झालेला त्यांच्या अभंगवाणीचा जलप्रवाह कधी एखाद्या प्रपातासारखा कोसळताना, तर कधी शांत निरामय सरितेप्रमाणे वाहताना दिसतो. त्यांच्या अंत:करणातील सगळी करुणा त्यांच्या हिंदी-मराठी पदांमध्ये समरसून प्रकटली आहे. ग्रामगीतेचा प्रचंड प्रपंच करण्याआधीही प्रारंभापासूनच महाराजांच्या अभंगांत देशस्थितीची चिंता होतीच. प्रपंचाचे रहस्य उकलताना उत्तम व्यवहार करून आदर्श गृहस्थाश्रमाची, समाजसमतेची, कृषिउत्कर्षाची सूत्रे अतिशय खुबीने महाराजांनी स्पष्ट केली आहेत. त्यांच्या संतत्वाचे राष्ट्रीय वळण त्यांनी कधी झाकून ठेवले नाही. सुरुवातीपासूनच असणाऱ्या जाज्वल्य देशप्रेमाने त्यांना स्वातंत्र्ययुद्धाच्या रणभूमीत प्रत्यक्ष उतरण्यास भाग पाडले.

## डॉ. अक्षयकुमार काळे

'झाड झडले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना,
पत्थर सारे बम बनेंगे। नाव लगेगी किनारे।।,

अशा संदेशाबरोबरच 'क्रांती हुवी बडे जोरकी, आवाज मुझसेही चढा' अशा स्वाभिमानी उद्‌गारांतून त्यांच्या राष्ट्रवादी कृतिशील निर्णायक वृत्तीचे दर्शन घडते. एका चातुर्मास्य समारंभाच्या प्रसंगात त्यांनी काढलेल्या, 'अबतक के चातुर्मास्य भक्त उद्धव के हुवे थे, अब यह चातुर्मास्य होगा वीर अर्जुन का,' या उद्‌गारात रणशीलतेची

बारूद किती ठासून भरली आहे, हे लक्षात येते. स्वातंत्र्यानंतर दोन्ही परकीय आक्रमणांच्या वेळी त्यांची मृदू वाणी रणरागिणी होताना दिसते. त्यांच्या राष्ट्रवादी वृत्तीतील समर्पित संघर्षशील हौतात्म्यभावना आणि समाजाभिमुख वृत्तीतील प्रगमनशीलता अतिशय लक्षणीय आहे.

राष्ट्रसंतांची सामाजिक दृष्टी इतकी आधुनिक आणि प्रगत आहे की, तिच्यात भारतीय ग्रामव्यवस्थेपुढील एकविसाव्या शतकाची सर्व आव्हाने स्वीकारण्याचे सामर्थ्य आहे. महाराष्ट्राला महात्मा फुल्यांपासून डॉ. आंबेडकरांपर्यंत सामाजिक सुधारकांची थोर परंपरा लाभली आहे. त्या सगळ्याच महान सुधारकांच्या विचारांचे सार महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटले होते, म्हणूनच वर्णधर्म, स्पृश्यास्पृश्यता, महिलोन्नती, अनिष्ट रूढी, विवाहपद्धती, अंधश्रद्धा यासंबंधी महाराजांनी मांडलेले विचार अत्यंत आधुनिक होते आणि त्यानुसार केलेली प्रत्येक कृती प्रगमनशील आणि सामर्थ्यसंपन्न होती. परंपरेच्या दाबामुळे आणि लोकानुनयामुळे पुष्कळदा सुधारकांच्याही उक्तिकृतीत अंतर पडल्याचे दिसून येते. महाराजांच्या जीवनात अशी विसंगती कुठे आढळून येत नाही. स्वाभाविकच ती त्यांच्या वाङ्मयातदेखील नाही.

सततच्या लोकसंपर्कामुळे जी विचारबीजे पेरायची ती कशी आणि किती याचेही त्यांना जात्याच भान होते. कोणत्या उपायाने लोकांची मने न भडकता इच्छित ध्येयाप्रती लोक कृतिनिष्ठ होतील, याची त्यांना जाण असल्यामुळे जनतेच्या अंतरात्म्याला हाक घालून त्यांना ते जीवनाप्रती समर्पित होण्याचा आग्रह धरतात. म्हणूनच सामाजिक विकासाच्या संदर्भात ते उत्क्रांतिवादी वाटतात. एकातून दुसऱ्या गोष्टीची निर्मिती होत असताना त्यातील सत्त्वाचा स्वीकार हे त्यांच्या विचारांचे प्रमुख सूत्र आहे. त्यामुळेच त्यांच्या विचारांची दिशा नित्य सकारात्मक झाली. 'जुने जाऊ द्या मरणालागुनि', असे म्हणून ते जुन्याचा संपूर्णपणे निषेध करीत नाहीत, तर 'जुन्यातुनि जी निष्पत्ती नवी काय नव्हे ती श्रेयस्कारक,' असाच त्यांचा प्रश्न आहे. स्वाभाविक धर्म आणि धर्मप्राप्तीची साधने, पुरुषार्थ आणि पुरुषार्थप्राप्तीची साधने यांकडे पाहण्याचा महाराजांचा दृष्टिकोन सकारात्मक आणि आधुनिक



**अवघ्या समाजाला किंवा समाजाच्या कोणत्या घटकाला नेमका कुठे आजार झाला आहे, हे सूक्ष्मपणे ओळखण्याची शक्ती तुकडोजी महाराजांच्या प्रज्ञेत आहे. त्यामुळे तिथेच ते प्रहार करतात. कुजलेला भाग ते काढून टाकतात. सद्विचारांचे सिंचन करून नवी जाणीवकमळे फुलवतात**

झाला. अवघ्या समाजाला किंवा समाजाच्या कोणत्या घटकाला नेमका कुठे आजार झाला आहे, हे सूक्ष्मपणे ओळखण्याची शक्ती त्यांच्या प्रज्ञेत आहे. त्यामुळे तिथेच ते प्रहार करतात. कुजलेला भाग ते काढून टाकतात. सद्विचारांचे सिंचन करून नवी जाणीवकमळे फुलवतात. प्रगल्भता, सकारात्मकता आणि नवनिर्माणकता त्यांच्या एकूणच विचारकेंद्राच्या बुडाशी असते. विश्वव्यापी सत्धर्माचे पुनरुज्जीवन करणे यामुळेच त्यांना शक्य झाले.

महाराजांच्या अशा धर्मनिरपेक्ष वैश्विक वृत्तीचे आणि राष्ट्रीय सामाजिक विचारांचे उत्तरोत्तर परिष्करणच होत गेलेले दिसून येते. म्हणूनच स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय जनजीवनाच्या उत्कर्षात पायाभूत असणाऱ्या ग्रामजीवनाच्या विकासाचा महामंत्र सांगणारा ग्रामगीतेसारखा ग्रंथ महाराज लिहू शकले. एका विशाल आणि निकोप अशा ग्रामीण भारताचे भविष्यातील मानचित्र त्यांच्या डोळ्यासमोर होते. ते स्वप्न प्रत्यक्षात कसे साकार करता येईल, याचा त्यांना ध्यास लागला होता. संपूर्ण देशाचे भरणपोषण करणारी खेड्यांतून राहणारी बहुसंख्य जनता उपेक्षा, अज्ञान, उपासमार, गांजवणूक, अंधश्रद्धा यांमुळे जेरीस आलेल्या त्या सामान्य जनतेला स्वत:चा उद्धार स्वत:च करण्यासाठी प्रवृत्त करावे, यासाठी त्यांनी ग्रंथनिर्मिती केली. या ग्रंथातून ते आपला अनुभव आणि विचार स्वतंत्रपणे मांडत असले, तरी तो गुरू व शास्त्र त्यांना अनुसरूनच त्यांनी मांडला आहे. या ग्रंथाच्या निर्मितीकाळी त्यांच्या डोळ्यासमोर प्रामुख्याने ग्रामीण जनताच असली, तरी हा ग्रंथ एकूण मानवी जीवनाचे कल्याण लक्षात घेऊनच लिहिला आहे. त्यामुळे स्थल-काल व्यक्तिविशेषांची बंधने पार करून त्यातील आशय अखिल मानवजातीच्या उद्धाराकरिता उपयुक्त ठरला.

सुजलाम-सुफलाम नवभारताचे स्वप्न पाहणाऱ्या महाराजांनी ग्रामगीतेत अत्यंत तपशिलाने ग्रामजीवनाच्या पुनर्घटनेचा प्रपंच केला आहे. लोकसमाजाची परंपरागत धर्मदृष्टी आणि आधुनिक लोकशाहीचे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वत्रयीवर आधारलेले नवे तत्त्वज्ञान या दोहोंचा मेळ या ग्रंथात महाराजांनी कौशल्याने घातला. लोकशाहीतील आजचे ग्रामीण जीवन कसे असावे, आणि ग्रामस्थांच्या वाट्याला आलेल्या सत्त्वांशाचा उपयोग करून व्यक्तिविकास, समाजविकास, देशविकास आणि पर्यायाने विश्वविकास कसा साधावा, यांचा सोपपत्तिक आणि मूलगामी विचार या ग्रंथात केला आहे.

सहजता, सुबोधता व सुसंबद्धता यांचा संगम असणाऱ्या महाराजांच्या काव्याची शैली अत्यंत प्रासादिक, वात्सल्यपूर्ण आणि रोखठोक आहे. विचारातील स्पष्टता व सुसंगती या वैशिष्ट्यांमुळे ती आपल्या वैचारिक प्रवाहामध्ये वाचकाला ओढून घेते. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम यांच्या काव्यातील कितीतरी ओव्यांना ज्याप्रमाणे आज सुभाषितांचे मोल प्राप्त झाले, त्याचप्रमाणे तुकडोजींच्या काव्यातील कितीतरी ओव्यांना बहुजनसमाजाच्या जीवनात आज सुभाषितांचे मोल प्राप्त झाले आहे.

(लेखक हे नागपूर विद्यापीठातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनाचे प्रमुख आहेत.)



**महाराष्ट्रातील गडकिल्ले हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेचा अमूल्य ठेवा आहे. या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने एक समिती स्थापन केली आहे. या समितीचे प्रमुख मार्गदर्शक आणि इतिहासतज्ज्ञ निनाद बेडेकर यांचे गडकिल्ल्यांची ओळख करून देणारे सदर या अंकापासून सुरू करत आहोत.**

# समृद्ध वारसा

महाराष्ट्र ही दुर्गभूमी आहे. सह्याद्रीच्या शिखराशिखरांवर चढवलेली दुर्गांची शेलापागोटी पाहिली की या राकट, कणखर देशाचा गाभा या स्वातंत्र्यप्रेरकतेच्या प्रतीकांनी कसा व्यापून टाकलेला आहे त्याची प्रचिती येते. महाराष्ट्राला साडे सातशे किलोमीटर्सचा सागरकिनारा लाभला आहे आणि गुजरातच्या सीमेवरच्या दिंडपासून तेरेखोलपर्यंत लहानमोठे ८५ दुर्ग इथे एकेकाळी मौजूद होते, याची साक्ष त्या दुर्गांच्या अवशेषांवरून ध्यानी येते. पठारी प्रदेशावर स्थलदुर्ग आहेतच! महाराष्ट्रातील दुर्गांची मोजदाद अजूनही झालेली नाही परंतु किमान पाचशे दुर्ग तरी या देशी आहेत.

सातवाहन काळापासून ही दुर्गबांधणी सुरू आहे. ज्या लोकांनी येथे लेणी खोदली त्यांनी दुर्गांचेही खोदकाम केले. जीवधन-चावंड-हडसर-शिवनेरी हे दुर्ग त्यांच्या खोदीव कामामुळे प्रसिद्ध आहेतच. सातवाहनानंतर महाराष्ट्रात अनेक राजघराणी नांदली. वाकाटक, कलचुरी, चालुक्य, आभीर, सेंद्रक, गोंड, शिलाहार, यादव ते अगदी मराठी कालखंडापर्यंत या घराण्यातील राज्यकर्त्यांनी येथे आपापल्या कुवतीप्रमाणे दुर्ग उभारले. अर्थात या दुर्गांचा सर्वात उत्तम उपयोग शिवाजी महाराजांनी केला हे वेगळे सांगणे नकोच; पण महाराष्ट्रात बहमनी राज्यकर्त्यांनी दुर्ग उभारले. आदिलशाही, बरीदशाही, इमादशाही, निजामशाही, फरूखी सुलतानांनीही येथे गड-कोट उभारले. एवढेच नव्हे तर पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच, डच या युरोपीय सत्ताधाऱ्यांनी येथे कोट उभारले. आफ्रिकेतून आलेल्या सिद्दयांनी येथे मुरूडच्या जंजिऱ्यासारखे अतिबळकट दुर्ग बांधून एक वेगळीच दुर्गबांधणी येथे नावारूपास आणली. इतक्या वेगवेगळ्या प्रांतातील, धर्माच्या, देशाच्या लोकांनी या भूमीवर दुर्ग बांधले हे महाराष्ट्राचे मोठे वैभव आहे आणि वैशिष्ट्यही आहे. जगात हे असे उदाहरण पाहावयास मिळणार नाही!

दुर्गांच्या बांधणीची जशी वैशिष्ट्ये आहेत तसेच त्यांच्या परिसरात आणि दुर्गांवर घडलेल्या गोष्टीत निश्चितता आहे. तानाजी मालुसरे, मुरारबाजी देशपांडे, बाजीप्रभू देशपांडे अशा नररत्नांच्या कथा माहीत असतातच परंतु रामाजी पांगेरा, लायजी कोळी सरपाटील, कोंडाजी फर्जंद यांच्यासारख्या वीरांच्या पराक्रमाच्या कथा फारशा माहीत नसतात. मुरारजी अणजूरकर, बाजी भिवराव, येसजी कामथे यांचा पराक्रम माहिती असलेला माणूस विराळाच.

लायजी कोळ्याची कथा ही फारच वेगळी आहे. मुरूड जंजिरा हा दुर्ग अजिंक्य राहिला. निजामशाहीतर्फे सिद्दयांनी या दुर्गाचे काम १५६७ ते १५७१ पर्यंत केले. बेटावरचा हा दुर्ग पाण्याने वेढल्याने आणि त्याच्या २२ बुरूजांवर असलेल्या तोफांमुळे अभेद्य राहिला. शिवाजी महाराजांनी मात्र हा दुर्ग जिंकण्यासाठी एक वेगळा प्रयोग करून पाहिला. अलिबागेचा एक तरूण लायजी कोळी हा त्याच्या धाडसाबद्दल प्रसिद्ध होता. राजांनी त्याच्यावर एक आगळी कामगिरी सोपवली. 'जंजिऱ्यावर रात्री शिड्या लावायची कामगिरी अत्यंत अवघड होती. बिकट होती. जंजिऱ्यावरच्या बुरुजाबुरुजांवर हौशी सैनिकांचा जागता पहारा होता. हातात तेगा घेतलेले हे हौशी अत्यंत खुनशी होते. जंजिऱ्याला शिड्या लावणे म्हणजे वाघाच्या जबड्यात हात घालण्याइतकेच धाडसी काम होते. हे काम फत्ते झाले की मोरोपंत पिंगळे मराठी आरमार घेऊन जंजिऱ्यावर हल्ला करणार होते. मोठा धोक्याचा डाव होता.

लायजी शिड्या सोबत घेऊन निघाला. समुद्र त्याला माहिती होता. लाटांशी खेळत, गलबत झुलवत तो जंजिऱ्यावर अलगद पोहोचला. लायजी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी गलबतावरून शिड्या उतरवल्या आणि जंजिऱ्याच्या तटाला लावल्या. मराठी आरमाराची वाट पाहत तो बसला. पण सगळ्यांचेच दुर्दैव. आरमार पोहचलेच नाही. पहाट व्हावयास आली तशा शिड्या उतरवून लायजी परत आला.

शिवाजी राजांना हे कळले. सागरावरच्या ससाण्याने जंजिऱ्याच्या तटाला शिड्या लावायचे अवघड काम केल्याचे ऐकून राजांनी त्याला बोलावून घेतले. राजा म्हणाले, 'लायजी, मोठे काम केलेत! तुमचे काळीज वाघाचे! पंत, लायजींना पालखीचा मान द्या!' लायजी म्हणाला, 'महाराज! आम्ही दर्यावरची माणसं! आम्हाला त्या पालखीचा काय

**मराठी आरमाराचा इतिहास आपल्याला ध्वनीप्रकाश योजनेद्वारे उभा करता येईल. सिद्दी आणि इतर युरोपीय सत्तांच्या दर्यावरील अनिर्बंध संचारला पायबंद घालून मराठी किनारपट्टी सुरक्षित करणाऱ्या वीरांच्या पराक्रमाचा इतिहास आपल्याला उभा करता येईल. नवीन पिढीला त्यापासून प्रेरणा मिळेल, स्फूर्ती मिळेल, चेतना मिळेल.**










वैभव गडकिल्ल्यांचे



उपयोग?!'  राजे मोरोपंतांना म्हणाले, 'पंत! लायजींना एक गलबत बांधून द्या! नाव द्या 'पालखी'! पंतांकडून मात्र कोताई झाली. कार्य अर्धवट राहून गेले. जंजिरा अभेद्य राहिला. एक मराठी जवान मात्र मोठा पराक्रम करून गेला. इंग्रजांनी त्यांचा नाविक सेनानी होरॅशिओ व्हायकाऊंट नेल्सन याच्या पराक्रमाचा इतिहास मोठ्या हिमतीने जतन केला आहे.२१ ऑक्टोबर १८०५ रोजी स्पेन जवळील ट्रॅफलगर या बंदरानजीक इंग्रजी आरमाराने मोठा पराभव केला. 'HMS Victory' या फ्लॅगशिपवरून नेल्सनने आपल्या इतर जहाजावरच्या सेनानींना निशाणाद्वारे एक सूचना दिली. England expects that every man will do his duty!

ही आज्ञा पाहिल्यावर इंग्रजी आरमार शत्रूवर तुटून पडले आणि त्याने शत्रूचा सपशेल पराभव केला. या लढाईत एका फ्रेंच जहाजावरून आलेल्या बंदुकीच्या गोळीने नेल्सनचा वेध घेतला. इंग्लडचा सर्वश्रेष्ठ नाविक सेनानी त्या गोळीने मृत्यू पावला. पण मृत्यूच्या आधी नेल्सनच्या कानावर इंग्रजी विजयाची वार्ता पडली होती. नेल्सनचे शेवटचे शब्द आहेत.

I thank God! I have done my duty! आपले कर्तव्य करत करत असताना नेल्सन मृत्यू पावला. इंग्रजांनी मात्र 'पोर्टसमय' या बंदरात त्याचे 'HMS Victory' हे जहाज तसेच्या तसे ठेवले आहे. जहाजावरील तोफा, भांडी इतर सामानही जपले आहे. दर २१ ऑक्टोबरला सकाळी बिगुल वाजतो. नाविक जमतात. कवायत चालू होते. नेल्सनची शेवटची आज्ञा निशाणांद्वारे परत दाखविली जाते! इंग्रज तरुणांना यापासून स्फूर्ती मिळते. त्यांना देशभक्तीचे धडे मिळतात. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी, कल्याणासाठी, समृद्धीसाठी देहभान विसरून उदंड उदंड काम करण्यासाठी चेतना मिळते. आपल्यालाही हे उभे करता येईल. वसईच्या किल्ल्यातील चिमाजीअप्पांचा पराक्रम सांगता येईल. आंग्रे, धूळप, गुजर या सागरी सरखोलांच्या पराक्रमाचा डिंडिम वाजवता येतील. मराठी, गुराबा, गलबते, गॅलीज, बतेले, फत्तेमाऱ्या, महागिऱ्या, मंजा, तरांडी कोठे, पाल हे नौकांचे प्रकार प्रतिकृतीद्वारे दाखवता येतील. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे वज्रवाक्य सागरतीरावर गोंदवून ठेवता येईल. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी, अर्नाळा, अलिबाग, वसई अशा सागरी दुर्गांच्या सफरी आयोजित करता येतील.

हे नक्की करता येईल. यासाठी मात्र जबरदस्त आंतरिक ऊर्मीची आवश्यकता आहे. या ऊर्मीची झळ लवकरात लवकर जबाबदार मंडळीपर्यंत पोहोचवा, हाच आई तुळजाभवानीकडे जोगवा!

संपर्क: ०९८२२०३८३५५

❐ ❐









# आला उन्हाळा
## आरोग्य सांभाळा

**उन्हाळा सुरू झाल्यावर ऋतूतील झालेल्या बदलांमुळे विविध प्रकारचे आजार संभवतात. यात प्रामुख्याने त्वचाविकार, उष्माघात आणि नाकातून होणाऱ्या रक्तस्रावाचा समावेश होतो. या विकारांपासून वाचण्यासाठी थोडीशी दक्षता आणि खाण्यापिण्यावर बंधने ठेवली तर परिणाम खूपच सकारात्मक होतात. गोकुळदास तेजपाल रुग्णालयाच्या निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीषा महाजन सांगताहेत उन्हाळ्यात आरोग्य जपण्याचे उपाय.**



उन्हाळ्यात होणारे काही आजार व त्यांची कारणे खालीलपैकी सांगता येतील.

- **उष्णतेमुळे होणारे आजार–** उष्माघात, सतत होणाऱ्या उलट्या, नाकातून होणारा रक्तस्राव आणि सूर्यप्रकाशातील उष्णतेमुळे होणारी डोकेदुखी
- **त्वचेवरील परिणाम–** सूर्यप्रकाशामुळे होणारा त्वचेचा क्षोभ, त्वचा काळवंडणे, अकाली वृद्धत्व
- **डोळ्यांवरील परिणाम–** मोतीबिंदू, डोळ्यांचा दाह, रेटिनाला होणारे नुकसान
- **डासांमुळे होणारे आजार–** डेंग्यु, मलेरिया, चिकनगुनिया
- **पाण्यामुळे होणारे आजार–** अतिसार, आमांश, विषमज्वर, कॉलरा, कावीळ, यकृतावरील सूजण, जंताचा प्रादुर्भाव

**उष्माघात–** उन्हाळ्यामध्ये साधारणत: सर्वत्र उष्णतेमुळे जाणवणारा दाहक परिणाम म्हणजे 'उष्माघात' होय. यालाच उन्हामुळे येणारी तिरमिरीदेखील म्हणतात. यामध्ये शरीराचे तापमान अकस्मात उच्च पातळीवर जाते. योग्य ते उपचार वेळेवर न मिळाल्यास संबंधित व्यक्तीच्या मेंदूच्या उतींना नुकसान पोहोचून व्यक्ती कोमात जाण्याची व दगावण्याची देखील शक्यता असते.

### धोक्याचे घटक

- उष्माघात हा प्रामुख्याने वयोवृद्ध, पाणी कमी पिणारे लोक, दीर्घ आजारी किंवा मद्यप्राशन करण्याऱ्या लोकांमध्ये जास्त प्रादुर्भावाने आढळतो.
- अर्भके व चार वर्षापर्यंतची लहान मुले, पासष्टीच्या पुढील वृद्ध मंडळी यांना उष्माघाताचा त्रास अधिक सहजपणे होऊ शकतो.
- तसेच हृदयरोग, फुफ्फुसांचे आजार, मूत्रपिंडाचे आजार, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, मानसिक व्याधीसारख्या आजारांनी त्रस्त व्यक्तींना देखील उष्माघाताची लागण सहज होऊ शकते.

### काळजी कशी घ्याल?

उन्हाळ्यात होणारे वरील सर्व आजार आणि प्रामुख्याने होणारा उष्माघाताचा त्रास आपण टाळू शकतो मात्र त्यासाठी आपल्याला थोडी काळजी घ्यायला हवी.

जेव्हा वातावरणातील तापमान खूप वाढू लागते तेव्हा शक्यतोवर उन्हात बाहेर फिरणे टाळावे. विशेषत: सकाळी ६ ते दुपारी ४ वाजेपर्यंत जेव्हा उन्हाची तीव्रता जास्त असते. बाहेर जाण्याचे टाळणे शक्य नसल्यास मात्र



### उष्माघाताची कारणे

- उष्माघाताचा संबंध तापमानाबरोबरच वातावरणातील आर्द्रतेशी असतो. वातावरणात आर्द्रता जास्त असली तर उष्माघाताची शक्यता अधिक असते. सर्वात उच्च ताप (सामान्यत: उष्णतामान १०५ अंश फॅरनहाईट) मळमळ, डोकेदुखी, धाप लागणे, धडधड होणे, गोंधळ उडणे, मूर्च्छा येणे, शरीराची निश्चेष्टता.

**खालील बाबींवर लक्ष द्यावे:**

- **भरपूर प्रमाणात पाणी प्यावे–** उन्हाळ्यात तापमानवाढीबरोबरच पाणी पिण्याचे प्रमाण वाढवावे. तहान लागण्याची वाट न पाहता दररोज ८ ते १० ग्लासपेक्षा जास्त पाणी प्यावे. तसेच नारळपाणी, ताज्या फळांचा रस, ताक, लस्सी, कांजी, निंबूपाणी तसेच ओआरएस पावडर घ्यावी अथवा जवळ बाळगावीत. जास्त प्रमाणात साखरेचे वा अल्कोहोलचे प्रमाण जास्त असलेली पेये घेऊच नयेत त्यामुळे खरोखराच शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. तसेच बाहेरील थंड पेये घेणे टाळा ज्यामुळे पोटपेटके सुरू होतात. निरोगी शरीरासाठी नियमित व्यायाम आवश्यकच आहे. मात्र व्यायाम करताना थोडी जास्त काळजी घ्यावी त्यामध्ये सामान्यत: २४ औंसचे द्रवपदार्थ व्यायामाच्या दोन तास आधी घ्यावेत. व्यायाम सुरू करण्यापूर्वी ८ औंस द्रवपदार्थ प्यावे.

- **खाण्याच्या सवयी–** ताजी फळे तसेच फळभाज्यांचा वापर करावा. गरम तसेच जड अन्नपदार्थ टाळावेत. कारण ते शरीराचे तापमान वाढवतात. टरबूज, द्राक्षे, अननस, गाजर व काकडी खावी. कच्चा कांदा जेवणात असल्यास उत्तम. जेवणामध्ये गरम मसाले, लालपावडर व मिरची मसाले वापरणे शक्यतो टाळावे. कारण त्यामुळे शरीराची गरमी वाढण्यास हातभार लागतो. तसेच तेलकट व तिखट खाणे टाळावे.

- **घालावयाचा पेहराव–** शक्यतोवर हलके, फिकट रंगाचे सैल कपडे परिधान करावे. गडद रंगाचे कपडे घालू नये. जमल्यास पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत. कारण गडद रंग तुलनेने जास्त उष्णता शोषून घेतो. जमल्यास टोपी किंवा स्कार्फ वापरावा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगल्स वापरावेत.

- **त्वचेची घ्यावयाची काळजी–** त्वचा सजलित ठेवावी तसेच मॉइश्चराझरचा वापर करावा. जर बाहेर जावेच लागले तर स्कार्फ (मुली) तर टोपी (मुले) चा वापर करावा. छत्रीचा वापर करावा. सनस्क्रीन लोशन (Sun Protective Factor) बाहेर जाण्यापूर्वी तीस मिनिटे आधी लावावे. तसेच ते पॅकेटवरील दिलेल्या सूचनेबरहुकूम वापरत राहावे.

## अशी घ्या काळजी

- आपल्या आजूबाजूला जर कोणाला उष्माघाताचा झटका आला वा त्रास होऊ लागला तर त्वरित दवाखान्यात नेण्यासाठी ॲम्ब्युलन्सला (९११ ला) फोन करावा आणि मध्यंतरीच्या काळात पुढीलप्रमाणे प्रथमोपचार करावेत.
- सर्वप्रथम व्यक्तीला शक्य असल्यास वातानुकूलित जागेत अन्यथा सावलीत वा थंड ठिकाणी हलवावे आणि शरीरावरील जास्तीचे कपडे काढून टाकावेत. त्यामुळे शरीरातील उष्णतामान कमी होण्यास मदत होते.



- शरीराला ओल्या कपड्याने पुसून काढावे आणि व्यक्तीच्या आजूबाजूला हवा खेळती ठेवावी.
- जवळ बर्फ उपलब्ध असल्यास व्यक्तीच्या मानेवर, पाठीवर, काखेत आणि मांडीच्या सांध्यात बर्फाचा शेक द्यायला सुरुवात करावी. कारण वरील जागी रक्तप्रवाह संचय हा त्वचेच्या जवळच असतो व थंडतेमुळे शरीराचे उष्णतामान कमी व्हायला मदत होते.
- जर उन्हामुळे नाकातून रक्तस्राव (Epitaxis) सुरू झाला असेल तर नाकाच्या मांसल भागावर दहा मिनिटे प्रत्यक्ष दाब दिल्यास रक्तस्राव थांबतो.
- व्यक्तीवर पाण्याचा वर्षाव करावा किंवा त्याला बाथटबमध्ये बुडवावे वा बर्फ टाकावा.
- व्यक्तीला जर मूर्च्छा आलेली असेल तर श्वसनक्रियेची तपासणी करावी. (Airway & Breathing)
- व्यक्ती शुद्धीवर आल्यावर त्याला पाणी पिण्यास द्यावे.

- **वास्तुशास्त्रीय सावधगिरी–** दारे व खिडक्या बंद ठेवावीत. घरातील पडदे गडद रंगाचे नसावेत. खिडक्यांच्या काचा गडद रंगाच्या असाव्यात. म्हणजे सूर्यप्रकाश आतमध्ये येणार नाही. खिडक्या रात्री उघड्या ठेवाव्यात आणि घरात हवा खेळती ठेवावी. घराच्या आजूबाजूला झाडे असावीत, हिरवळ असावी जेणेकरून वातावरण थंड राहण्यास मदत होते.

- **डासांच्या उपद्रवासंबंधी घ्यावयाची काळजी–** डासांची प्रजनन ठिकाणे म्हणजे घरातील व बाहेरील सांडपाणी तुंबून राहिलेली ठिकाणे, घरातील कुंड्यांमधील पाणी यासारखी ठिकाणे स्वच्छ ठेवावीत. पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. डासांना दूर ठेवण्यासाठीच्या (Repellents) औषधांचा, स्प्रेचा वापर करावा. जेणेकरून डासांपासून प्रादुर्भाव होणारे आजार टाळता येतील.

**पाण्यात होणाऱ्या जंतूंचा प्रादुर्भाव आणि त्यापासून होणारे आजार टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी**

- पाश्चराइज्ड दूध आणि उकळलेले पाणी वापरावे. यामुळे पाण्यातील जंतू उष्णतेमुळे नष्ट होतात.
- हात स्वच्छ धुवावेत.
- घरात शिजवलेले अन्नपदार्थ खावेत.
- शिळे अन्न खाऊ नये.
- लहान मुलांना शक्यतोवर बाटलीमधून दूध देऊ नये.

❑ ❑

# एक गाव कासवांचे
# नयनरम्य वेळास



**रोजच्या धकाधकीच्या जीवनातून काहीशी उसंत मिळावी, मनाला तजेला मिळावा यासाठी पर्यटनाचा विचार करत असाल आणि गर्दीच्या पर्यटनस्थळांचा काहीसा वीट आला असेल तर आपणासाठी 'वेळास' हे उत्तम डेस्टिनेशन आहे. अंड्यातून बाहेर पडून समुद्राच्या दिशेने जाणारी इवली इवली ऑलिव्ह रिडले समुद्री कासवे, दाटगर्द झाडी आणि नयनरम्य समुद्रकिनारा तुम्हाला कमालीचा वेगळा अनुभव देऊन जाईल.**

राजाराम देवकर

अगदी अलीकडच्या काळात 'कासवांचे गाव' म्हणून नावारूपास येत असलेले छोटेसे गाव 'वेळास' (ता. मंडणगड, जि. रत्नागिरी) येथे भ्रमंतीसाठी जाण्याचे ठरले. परंतु केवळ कासव पाहण्यासाठी एवढ्या दूर जायचे का, असा प्रश्न मला पडला होता. मात्र मुंबईहून वेळासला जात असताना गाडी मंडणगडवरून निघाल्यानंतर माझ्या मनातील सर्व प्रश्न गळून पडले. रस्त्याच्या दुतर्फा असलेली वनराई मनाला साद घालू लागली. वेळास अगदी काही अंतरावर असताना गर्द झाडी, आमराई, खाडीची झलक आणि प्रफुल्लित वातावरण पुढे सुखद अनुभव मिळणार असल्याची चाहूल देऊन गेले. पुढे बाणकोटहून गाडी निघाली. टप्प्याटप्प्यावर नजरेत भरणारे निसर्गसौंदर्य साद घालत होते. गाडी वेळास गावात येऊन थांबली. येथील वातावरण एवढे प्रसन्न होते की २०० कि.मी.च्या प्रवासाचा थकवा क्षणभरही टिकला नाही.

डोंगराच्या कुशीत वसलेले आणि बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना फडणवीस यांचे जन्मगाव वेळास हे निसर्गसौंदर्याची खाणच आहे. कोकणात अनेक समुद्रकिनारे प्रसिद्ध आहेत, मात्र वेळासचा समुद्रकिनारा खास आहे. नयनरम्य तितकाच 'अनटच्ड'. तिन्ही बाजूंनी डोंगराने वेढलेल्या या गावात गेल्यावर समुद्र कोठे आहे असा प्रश्न पडतो. सायंकाळचे पाच वाजले होते. आम्ही फ्रेश होऊन समुद्रकिनारा आणि कासव बघण्यासाठी निघालो. पावलापावलावर गावातील निसर्गवैभवाचे दर्शन होत होते. गावाबाहेर आल्यावर समोरही डोंगर. मग समुद्र कोठे आहे बुवा हा प्रश्न मनात पुन्हा-पुन्हा उचल घेत होता.

गावाबाहेरील पुलाजवळ खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. येथून दाट झाडीतून पाऊलवाटेने पाच-सहा मिनिटे चालल्यानंतर वेळासच्या सुंदर समुद्र किनाऱ्याचे दर्शन घडते. या गावाने समुद्र जणू दडवूनच ठेवला आहे आणि हो खरेच दडवून ठेवला आहे. त्यामुळेच तो एवढा अनटच्ड राहिला आहे, पवित्र राहिला आहे. येथील वातावरणात वेगळेच चैतन्य संचारलेले जाणवते. अशा वातावरणात पर्यटनाचा अनुभव निराळाच.

गावात ठिकठिकाणी नारळ, सुपारी, अक्रोड आदींनी बहरलेली वाडी (मळा) मन प्रसन्न करते. सकाळी किंवा सायंकाळी या वाडीत फेरफटका मारायला विसरू नये. येथील अस्सल कोकणी उतरत्या छपराची घरे, जेवण आणि पाहुणचार अधिकाधिक पर्यटकांना येथे आकर्षित करतात. मुंबई, पुणे, गोवा आदी ठिकाणांहून येणाऱ्या पर्यटकांची संख्या येथे अधिक आहे.

### कासव पर्यटन

येथील समुद्रकिनाऱ्यावर थंडीच्या दिवसात 'ऑलिव्ह रिडले' जातीची कासवे अंडी घालतात. या कासवांची गणती लुप्त होणाऱ्या प्रजातींमध्ये होत आहे. त्यामुळे सह्याद्री निसर्ग मित्र मंडळाने ग्रामस्थांच्या मदतीने कासव संवर्धन प्रकल्प उभारला. त्यायोगे कासव संवर्धन तर होतच आहे. शिवाय अंड्यातून बाहेर पडून समुद्राच्या दिशेने जाणारी इवली इवली कासवे याची देही याची डोळा पाहण्याचे भाग्य पर्यटकांना लाभते. शिवाय निसर्गप्रेमी ग्रामस्थ कासव मित्र म्हणून कासव संवर्धनासाठी मोलाचा सहभाग देत आहेत.

ग्रामस्थांच्या प्रयत्नांमुळे हे गाव चांगले पर्यटन क्षेत्र म्हणून नावारूपास येऊ लागले आहे. त्यामुळे हे ठिकाण पर्यटकांच्या गर्दीने गजबजून जाण्यापूर्वी आपण भेट द्यायला हवी.

### पक्षी पर्यटन

वेळासचा स्वच्छ समुद्रकिनारा, उंच उंच गर्द झाडी आणि

भ्रमंती







डोंगररांगा यामुळे येथे पक्षांचा किलबिलाट असतो. विविध प्रकारचे पक्षी येथे पाहायला मिळतात. त्याचबरोबर समुद्री गरुडही (व्हाइट बिलाइड सी इगल) येथे पाहायला मिळतो.

गावातील एका झाडावरील त्याचे घरटेही बघायला मिळाले. एकंदरीत पक्षीप्रेमी व छायाचित्रणाची हौस असलेल्यांसाठी हे उत्तम ठिकाण आहे.

## जवळची पर्यटन स्थळे

वेळाससोबतच नजीकचे बाणकोट खाडीतील विहंगम दृश्य नजरेत भरणारे आहे. बाणकोट किल्ल्यावरून अथांग समुद्राचे दर्शन घडते. खाडी ओलांडण्यासाठी बोटीचा प्रवास आणि पुढे सुंदर समुद्रकिनारा लाभलेले श्रीक्षेत्र हरिहरेश्वर हे देवस्थान. स्वत:चे वाहन असेल तर मुरुड जंजिरा किल्लाही पाहता येणे शक्य होते.



### असे जाता येईल

- मुंबई ते वेळास (१६२ किमी), पुणे ते वेळास (२७७ किमी ताम्हिणी घाटमार्गे) बससेवा आहे. शिवाय मुंबईहून दापोलीला जाणाऱ्या एसटीतून मंडणगडपर्यंत व तेथून वेळासला जाता येते. रत्नागिरी व दापोलीहून बससेवाही उपलब्ध आहे.
- रेल्वेने जायचे झाल्यास वीर हे स्थानक ४० किमी अंतरावर आहे.
- जवळचे विमानतळ – मुंबई (१६२ किमी)

### येथे राहता येईल

– वेळास या गावात राहण्याची चांगली व्यवस्था आहे. एमटीडीसीने अधिकृत केलेल्या स्वतंत्र खोल्या आणि चविष्ट घरघुती जेवणाची सोय आहे. गावात निसर्गरम्य वातावरण असल्याने इतरत्र मुक्काम टाळून निसर्गसान्निध्याचा अनुभव घेता येतो.

### भेटीचा उत्तम काळ

फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येथे कासव महोत्सव आयोजित केला जातो. या महोत्सवादरम्यान भेट दिल्यास ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवांची पिले बाहेर पडण्याचा अपूर्व सोहळा पाहायला मिळतो. शिवाय हिवाळा असल्याने निसर्गरम्यतेचा सुखद अनुभव येतो.

### काय पाहाल?

कासवांसोबतच स्वच्छ समुद्रकिनारा, गावातील व्हाइट उदर असलेला समुद्री गरुडाचे (व्हाईट बिलाइड सी ईगलचे) घरटे, नारळ, सुपारी, अक्रोड, काळी मिरी, कैलाशपती इत्यादींनी बहरलेली ग्रामस्थांची वाडी (मळा) आणि कासवमित्र मंडळाकडून दाखवण्यात येणारा कासवांवरील माहितीपट.



# संघर्षातून यशाकडे

मित्रांनो, यूपीएससीची नागरी सेवा परीक्षा आपल्या क्षमतांचा कस लावणारी असल्याने येथे परिश्रमाला पर्याय नाही. ज्यांची परिश्रम घेण्याची तयारी आहे, त्यांनी अर्धे यश मिळवलेच समजा. योग्य मार्गदर्शन आणि प्रयत्नांची पराकाष्ठा असेल तर यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेत सहज यश मिळवता येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कसलाही न्यूनगंड न बाळगता शक्य असेल तेवढे मार्गदर्शन मिळवून 'सेल्फ स्टडी'वर अधिक भर द्यावा. यामुळे कोणत्या विषयाचा किती आणि कसा अभ्यास करायचा याचे तंत्र विकसित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जनसामान्यांच्या प्रश्नांची चांगली जाणीव असते. त्यामुळे त्यांनी या परीक्षेकडे अधिक संख्येने वळले पाहिजे. प्रशासकीय सेवेत येऊन ते आपल्या प्रगल्भ जाणिवांचा जनसामान्यांच्या सेवेसाठी अधिक चांगला उपयोग करू शकतात.



**निश्चित ध्येय आणि त्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची तयारी असेल तर तुम्हाला कसलीही बिकट परिस्थिती यशस्वी होण्यापासून रोखू शकत नाही. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सामोडे (जि.धुळे) गावातील आदिवासी भिल्ल समाजातील डॉ. राजेंद्र बंडू भारुड. कुणाच्या वाट्याल्या येऊ नये एवढा संघर्ष त्यांच्या वाट्याला आला. मात्र कलेक्टर होण्याचे स्वप्न त्यांच्या आईने बालपणीच दाखवल्याने असंख्य अडचणींवर मात करत २०१३ मध्ये त्यांनी हे स्वप्न सत्यात उतरवले. ते सध्या नांदेड येथे प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा संघर्ष आणि यशाचे गमक त्यांच्याच शब्दात...**



**डॉ. राजेंद्र भारुड**

प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी, नांदेड, भा.प्र.से.

### जिद्द

मी आयएएस होण्यापर्यंतच्या माझ्या यशात जेवढा परिश्रमाचा वाटा तेवढाच माझ्या आईच्या जिद्दीचा राहिला आहे. मला आजही चांगले आठवते की भिलाटीमध्ये आमच्या घरी घरखर्चाला हातभार लावण्यासाठी आम्ही आमचा दारू विकण्याचा पारंपरिक व्यवसाय करीत असू. गावातील लोक दारू पिण्यासाठी घरीच येत. बऱ्याच वेळेला आम्हा लहान मुलांना त्यांना चखणा वगैरे आणून द्यावे लागत असे. माझी परीक्षा असली की साहजिकच मी ही कामे करायला तयार होत नसे. दरम्यान एका गिऱ्हाइकाने, तोऱ्यात 'जाय थोडे काम करीये, शिकसीन मोठा डाक्टर-कलेक्टर व्हनार शे', असे हिणवून मला चखणा आणायला सांगितले. मी रडू लागलो, तेव्हा माझ्या आईने त्या गिऱ्हाइकाला ठणकावून सांगितले, 'मना बी पोऱ्या एक दिन डाक्टर-कलेक्टर हुई. तुम्ही चखणा आज दुसऱ्या कडतीनं मांगडा, आनी याले अभ्यास करू द्या!' हा तिचा माझ्यावरील विश्वास होता. जिद्दीची ज्योत तिने माझ्या मनात सदैव तेवत ठेवली आणि या ज्योतीच्या प्रकाशातच मी अनेक संकटांतून मार्ग काढत गेलो.

### संघर्ष

मी आईच्या पोटात असतानाच वडलांचे निधन झाले. त्यानंतर आईला सासरच्या मंडळीने घरात थारा दिला नाही. माझा मोठा भाऊ व बहिणीला घेऊन ती सामोडे येथे बहिणीकडे राहण्यासाठी आली. येथेच माझा जन्म झाला. घरामध्ये कर्ता पुरुष कोणीही नसला तरी दोन खमक्या बायका होत्या... माय, मोठमाय (मावशी), मोठा भाऊ, मोठी बहीण आणि एक म्हैस असा आमचा कुटुंबकबिला. आमच्या भिलाटीमध्ये शिक्षण, शाळा याच्याशी कित्येक वर्षे कुणाचाही दुरान्वये संबंध आला नव्हता. चुकून कधीतरी एखादा मुलगा फाटका सदरा आणि ठिगळ लावलेली चड्डी घालून मध्येच कळपातून चुकलेल्या वासरासारखा शाळेत जाताना दिसे. अशा परिस्थितीत मोठमाय आणि मायने शाळेत माझे नाव घातले. तिथेच माझ्या आयुष्याच्या बदलाला सुरुवात झाली. मावशी आणि आई निरक्षर असली तरीही शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळले होते. कदाचित त्याचमुळे मला शाळेत पाठवण्याचा अट्टाहास होता. मी अभ्यासात



हुशार असल्याचे शिक्षक आईला सांगायचे तेव्हा तिच्या चेहऱ्यावर झळकत असलेले समाधन मी पाहत आलो. चौथीत असताना नवोदय विद्यालयाच्या प्रवेशाची परीक्षा दिली. त्यात उत्तीर्ण झालो. लहान असल्याने बाहेरगावी शिक्षणासाठी पाठवताना आईला चिंता लागली होती. परंतु शाळेतील शिक्षकांनी समजविल्यानंतर अक्कलकुवा नवोदय विद्यालयात मला प्रवेश घेता आला. तेथे इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले.

जालना येथील नवोदय विद्यालयात इयत्ता अकरावी व बारावी सायन्सपर्यंतचे शिक्षण घेतले. जळगाव येथे वैद्यकीय सीईटीची परीक्षा दिली. त्यात १९४ गुण मिळविले. मुंबई येथील जी. एस. वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. आर्थिक चणचण पाचवीलाच पुजलेली होती. दरम्यान महाविद्यालयाची फी भरण्यासाठी आईला वेळोवेळी लोकांकडून कर्ज उचलावे लागले. मात्र मी खचलो नाही. जोमाने अभ्यास केला आणि उत्कृष्ट विद्यार्थी पारितोषिकाचा मानकरी ठरलो. दरम्यान, एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षाला वैद्यकीय महाविद्यालयात इंटर्नशिप करीत असताना वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय ओक यांनी प्रशासकीय सेवेकडे जाण्याचा सल्ला दिला. शिवाय बारावीनंतर इंजिनिअरिंगला प्रवेश घेण्यापेक्षा डॉक्टर झालास तर संपूर्ण समाजाला त्याचा फायदा होईल आणि डॉक्टर झाल्यानंतर प्रशासक झालास तर अधिक व्यापक प्रमाणात लोकसेवा करता येईल, हे देवरे सरांचे बोल सदैव स्मरणात होते. आईचे स्वप्न डोळ्यासमोर होते. त्यामुळे यूपीएससीची नागरी सेवा परीक्षा देण्याचा मी निर्णय घेतला. परीक्षेला अवघे सहा महिने असताना मित्रांकडून आणलेल्या पुस्तकातून दिवसरात्र एक करून अभ्यास केला. शेवटी या मेहनतीला यश लाभले. २०१२ च्या एमबीबीएसच्या परीक्षेसोबत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविले. त्यामुळे २४ व्या वर्षी अधिकारी होणारा सर्वांत तरुण डॉक्टरचा मानही मला मिळाला.

### श्रेय आईला

पहिल्या प्रयत्नात माझी 'इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस'साठी निवड झाली होती; परंतु 'आयएएस' बनण्याचे ध्येय पक्के असल्याने मी पुन्हा एकदा प्रयत्न करून २०१२मध्ये यूपीएससीची परीक्षा दिली आणि ५२७वी रँक मिळवून आयएएस झालो. एमबीबीएस त्यानंतर आयआरएस आणि आता आयएएस असा माझा यशाच्या दिशेने प्रवास झाला. माझ्या या यशाचे श्रेय माझ्या अशिक्षित पण जाणकार आईलाच आहे.

### यशाची सूत्रे

- कठोर परिश्रम घेण्याची तयारी ठेवा.
- आत्मपरीक्षण करून सेल्फ स्टडीवर भर द्या.
- परिस्थितीचे भांडवल न करता कमी सुविधांमध्येदेखील परीक्षेची तयारी करण्याचे तंत्र अवगत करा.
- स्वत:च्या नोट्स काढा. यामुळे परीक्षा जवळ आली असताना उजळणी करणे सोपे होईल.
- मुलाखतीच्या तयारीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व मॉक इंटरव्ह्यूमध्ये सहभागी व्हा.

### मुलाखतीची तयारी

मुलाखत आपल्या एकूण व्यक्तिमत्त्वाची चाचणी असते. त्यामुळे उत्तरे प्रामाणिकपणे द्यायला हवीत. सुमार अथवा भंपक उत्तरे दिल्यास पॅनलवर नकारात्मक प्रभाव पडतो. त्यामुळे प्रत्येक उत्तर एकनिष्ठ असावे. मुलाखतीची तयारी करताना तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि मॉक इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होणे कधीही चांगलेच. तब्बल पाऊण तास चाललेल्या माझ्या मुलाखत तथा व्यक्तिमत्त्व विकास चाचणीत मला पॅनलने धुळे शहर, जिल्ह्याचे प्रश्न, आरोग्य सेवा, आदिवासी समाजाच्या समस्या आदी विविध विषयांवर प्रश्न विचारले, माझी भूमिका जाणून घेतली. यावेळी मुलाखतीसाठी 'यशदा'त केलेला सराव मला उपयोगी पडला. तसेच नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात सहकाऱ्यांसमवेत केलेली गटचर्चा उपयोगी पडली.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

## मी एक स्वप्न पाहिलं!

**डॉ. राजेंद्र भारूड यांनी आयएएस होण्याच्या पाहिलेल्या स्वप्नावर आणि त्यासाठी केलेल्या संघर्षावर 'मी एक स्वप्न पाहिलं' हे १६६ पानी चरित्र पुस्तक लिहिले आहे. यातील प्रत्येक पृष्ठ त्यांचा आणि आई कमलाबाई यांच्या कष्टांचा, संघर्षाचा मागोवा घेणारे आहे. कष्टाची तयारी असेल, तर काहीही अशक्य नाही, हा मोठा धडा यातून मिळतो. त्यांचा संघर्ष ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर आदर्श म्हणून समोर आला आहे.**



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे इंडिया टुडे ग्रुपच्या वतीने आयोजित 'इंडिया टुडे कॉनक्लेव २०१५' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांच्यासमवेत इतर राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. इंडिया टुडे ग्रुपचे सल्लागार संपादक राजदीप सरदेसाई यांनी या मुख्यमंत्र्यांशी विविध राजकीय व विकासविषयक प्रश्नांवर संवाद साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात राज्याला विकासपथावर घेऊन जायचे असेल तर नव्या संकल्पनांचा स्वीकार केला पाहिजे व राज्यांमध्ये निकोप स्पर्धा असली पाहिजे असे स्पष्ट केले.**




# प्रगतीसाठी नव्या संकल्पना

**दयानंद कांबळे**

नवी दिल्ली येथे आयोजित इंडिया टुडे कॉनक्लेव हा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या खास शैलीत दिलेल्या उत्तरांमुळे रंगतदार झाला. राजदीप सरदेसाई यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांमधील नेमका अर्थ शोधून दिलेल्या उत्तरांमुळे कार्यक्रमात विशेष रंगत आली. पंतप्रधानांपेक्षा राज्याचे मुख्यमंत्री अधिक शक्तिशाली आहेत का? या राजदीप सरदेसाई यांनी विचारलेल्या पहिल्याच प्रश्नावर मुख्यमंत्री म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'टीम इंडिया' ही संकल्पना देशासमोर ठेवली. या संकल्पनेत केंद्र व राज्य सरकार एकत्रितरीत्या काम करू लागले तर राज्य विकासपथावर जाणार आहे. राज्ये विकसित झाली तरच देश विकसित होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी राज्य व केंद्र यांच्यात योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे पंतप्रधान शक्तिशाली की मुख्यमंत्री हा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. छत्तीसगडचे मुख्यमंत्री रमण सिंग यांनी मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचे समर्थन केले.

राज्य आपल्या निधीचा योग्य वापर करतात का? या दुसऱ्या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रत्येक राज्याच्या वेगवेगळ्या गरजा आहेत, यापूर्वी केंद्र शासन देईल तेवढ्या निधीत राज्य शासन विकास प्रकल्प राबवत असे, आता निती आयोगामुळे विकास प्रक्रियेत राज्यांची भागीदारी वाढली आहे, असे स्पष्ट करताना सरदेसाई यांनी अरबी समुद्रात कोट्यवधी रुपये खर्चून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कशासाठी उभारला जात आहे? असा प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाचा समाचार घेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शिवाजी महाराजांचा पुतळा हा पुढील शतकानुशतके नव्या पिढीला प्रेरणा देणारा ठरणार आहे, या प्रकल्पाकडे केवळ पुतळा उभारणीचा प्रकल्प म्हणून न पाहता याकडे पर्यटनाच्या दृष्टीने पाहावे. या प्रकल्पामुळे देशविदेशातील पर्यटक मुंबईत येतील. रोजगारनिर्मिती होईल, तसेच महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांना पर्यटकांच्या भेटी वाढतील व पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासात भर पडेल.

उत्तर भारत हा दक्षिण भारताला पुढे जाऊ देत नाही? या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रत्येक राज्याच्या मुख्यमंत्र्याला आपले राज्य पुढे जावे असे वाटत असते. देशातील राज्ये आता स्वत:चा विकास करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. एखाद्या राज्याने राबवलेला नावीन्यपूर्ण उपक्रम दुसरे राज्य स्वीकारू लागले आहे, यामुळे राजकारणातही सकारात्मक बदल होऊ लागला आहे. आपल्या राज्यात गुंतवणूक व्हावी, रोजगार वाढावा यासाठी प्रत्येक राज्य प्रयत्न करीत असते, राज्याराज्यांमध्ये स्पर्धा असली पाहिजे, परंतु ही स्पर्धा निकोप असली तरच चांगले वातावरण देशात तयार होणार आहे. उत्तर भारतातील राज्ये दक्षिण भारताला पुढे जाऊ देत नाहीत असे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही.

गुजरात हे क्रमांक १ चे राज्य आहे का किंवा निव्वळ प्रचार आहे? या प्रश्नांवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुजरात या राज्याने चांगल्या प्रशासनाचे एक मॉडेल देशासमोर ठेवले आहे. गुजरातमध्ये पाणी, सिंचन, उद्योग व गुंतवणूक या क्षेत्रात चांगले काम झाले आहे व त्याचा प्रचारही चांगल्या पद्धतीने झाला आहे. या प्रश्नावर कार्यक्रमात उपस्थित असलेल्या जनसमुदायाकडून जनमत







चाचणी घेतली गेली. या चाचणीत ५४ टक्के लोकांनी गुजरात क्रमांक १ चे राज्य नाही असे उत्तर नोंदविले. जनमत चाचणीचा कौल पाहून मुख्यमंत्री फडणवीस यांनी इंडिया टुडे कॉनक्लेव कार्यक्रमात गुजरातच्या मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत अशी चाचणी घेणे समर्पक वाटत नाही, त्यांनाही आपले मत नोंदविण्यासाठी व्यासपीठावर निमंत्रित करायला हवे होते असे सांगितले.

### 'शासनातील जनसंपर्क' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्यावतीने 'शासनातील जनसंपर्क' या कार्यशाळेचे उदघाटन केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक, उपसंचालक दयानंद कांबळे, पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. अजित पाठक यावेळी उपस्थित होते. यावेळी जावडेकर म्हणाले, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव हे आव्हान न मानता त्याला संधी मानून शासनाचा प्रभावी जनसंपर्क करावा. वर्तमान काळात उपलब्ध सर्वच प्रसार माध्यमांचा वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे. कल्पक व कार्यक्षमपणे शासनाचा संदेश पोहोचवण्यासाठी कार्यशाळा उपयोगी ठरणारी असल्याचे स्पष्ट करून जावडेकर म्हणाले, जनसंपर्क विभागात काम करणारे कर्मचारी हे शासनाची शान व मान राखणारे सैनिक असतात. म्हणून या यंत्रणेत कार्य करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारी व कल्पकतेने कार्य करण्याची गरज आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक या वेळी म्हणाले, या कार्यशाळेद्वारे राज्याराज्यातील जनसंपर्क कार्यपद्धतीची ओळख व नव्या संकल्पनांची देवाणघेवाण होणार आहे. या उपक्रमातून शासनाचा प्रभावी जनसंपर्क होण्यास मदत होणार आहे. नव्या माध्यमांचा योग्य वापर करावा व नवे तंत्रज्ञान आत्मसात करून जनसंपर्क क्षेत्रात प्रभावी काम करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सतत जागरूक राहावे.

दिनांक २ ते ४ मार्च या तीन दिवसीय कार्यशाळेत आपत्ती व्यवस्थापन व जनसंपर्क, शासकीय जाहिरात मोहीम, सोशल मीडिया आणि प्रशासन, माध्यम व्यवस्थापन, विपणन संवाद व ब्रँडिंग अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेस पत्र सूचना कार्यालयाचे संचालक चैतन्य प्रसाद, डी.ए.व्ही.पी.चे संचालक रवी रामकृष्ण, पत्र सूचना कार्यालयाचे उपसंचालक संतोष अजमेरा, त्याच बरोबर जनसंपर्क क्षेत्रातील डॉ. सुरेश गौर, फ्रीडा स्वामिनाथन, डॉ. सुनील कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

**संपर्क :** ०९५८२२८२५४१

## स्वाइन फ्लूच्या नियंत्रणासाठी केंद्र सरकारकडे १०० कोटींची मागणी

स्वाइन फ्लूचा मुकाबला करण्यासाठी केंद्र शासनाकडे १०० कोटी रूपयांची मागणी करण्यात आल्याची माहिती राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.



राज्यातील स्वाइन फ्लू संदर्भात डॉ. सावंत यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी खासदार राहूल शेवाळे, डॉ. श्रीकांत शिंदे, डॉ. प्रितम मुंडे, डॉ. हिना गावीत, श्रीरंग बारणे, अरविंद सावंत व कृपाल तुमाने उपस्थित होते.

डॉ. सावंत यावेळी म्हणाले, स्वाइन फ्लूचा मुकाबला करण्यासाठी औषधांचा साठा कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी दिली आहे. मास्क वापराबाबत केंद्र शासनाच्या सूचना राज्यात अमलात आणण्यात येत आहेत. एन-९५ याप्रकारचा मास्क फक्त रूग्णांसाठी वापरण्यात यावा. स्वाइन फ्लूची लस ही फक्त आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी देण्यात यावी. सर्वसामान्य जनतेसाठी लस देण्याबाबतचा निर्णय अभ्यासाअंती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.




# विस्तारलेले आभाळ

**'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' असे म्हटले जाते. चूल आणि मूल सांभाळणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा परीघ आता विस्तारला आहे. पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या अभियांत्रिकी, वैमानिक, संरक्षण दल यासारख्या क्षेत्रातही महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. खऱ्या अर्थाने आजच्या माहिती-तंत्रज्ञान तसेच सोशल नेटवर्किंगच्या युगात महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा प्रत्येकच क्षेत्रात उमटविला आहे. याच कर्तृत्वाची दखल घेत ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आले होते, महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांना.**

आपल्या अत्यंत व्यस्त अशा कार्यक्रमातून वेळात वेळ काढून महिला व बालविकास विभागाची तसेच महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयीची विस्तृत व नेमकी माहिती त्यांनी दिली. लातूर येथील एक कार्यक्रम आटोपून पंकजाताईंनी गाठले थेट मुंबई येथील दूरदर्शन केंद्र. अगदी नियोजित वेळेपेक्षा अगोदर येत त्यांनी निवेदक प्रदीप भिडे यांच्यासोबतच महिला व बालविकास विभागाच्या विविध योजना तसेच विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांविषयी चर्चा केली.

शासनाचा एक महत्त्वपूर्ण विभाग म्हणून महिला व बालकल्याण विभागाची ओळख आहे. समाजातील महिला, निराधार, निराश्रित, पीडित महिला, बालकांसाठी कल्याणकारी योजना तयार करणे व त्या राबवणे व महिलांच्या विकासासाठी कार्य करणे हा विभागाचा प्रमुख उद्देश आहे. अशा या विभागाकडून राबवण्यात येणाऱ्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या केंद्र सरकारच्या योजनेची अंमलबजावणी, मनोधैर्य योजना, जिजाऊ वसतीगृह योजना, देवदासी प्रथेला आळा घालण्यासाठी शासनस्तरावरील प्रयत्न, राज्य महिला आयोग, या आयोगाचे नेमके काम आदी प्रमुख विषयांवर त्यांनी अत्यंत समर्पक माहिती दिली.

सुकन्या योजनेचे नाव बदलून त्यात काही बदल करीत 'माझी कन्या भाग्यश्री' या नावाने नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. मुलींच्या जन्माचे स्वागत करीत स्त्री भ्रूणहत्या रोखणे आणि मुलींचा जन्मदर वाढविणे हा योजनेमागचा प्रमुख उद्देश आहे. यासोबतच बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेची अंमलबजावणीही या योजनेच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे मुंडे यांनी कार्यक्रमादरम्यान

## सात शतके लोकप्रियतेची...




सांगितले.

जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश हा ग्रामीण भागातील पाण्याची पातळी उंचावणे हा आहे. विशेषत: पाण्याची टंचाई असलेल्या गावांमध्ये पाण्याची पातळी वाढविण्यासाठी हे अभियान राबवण्यात येणार आहे. महिलांच्या डोक्यावरील हंडा खाली उतरविण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान हे प्रामुख्याने राबवण्यात येत असल्याचे पंकजाताईंनी सांगितले.

महिला आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यामुळे महिला ही आज अबला राहिलेली नाही. ती सबला झाली आहे. महिला व बालविकास विभागाकडून महिला सक्षमीकरणावर अधिक भर देणार असल्याची ग्वाही कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी दिली.

### राज्यातील पहिल्या महिला ग्रामविकास मंत्री

पंकजाताई मुंडे यांच्याकडे महिला व बालविकास खात्याबरोबरच ग्रामीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाणारे ग्रामविकास हे खातेही आहे. ग्रामीण विकासाच्या विविध योजना आणि ध्येयधोरण ठरविणारा हा एक विभाग आहे. अशा या ग्रामविकास विभागाचे काम पाहणाऱ्या पंकजाताई ह्या पहिल्या महिला मंत्री ठरल्या आहेत. जय महाराष्ट्र कार्यक्रमादरम्यान खुद्द त्यांनी ही माहिती दिली.

### ...अन कतारमधील मुलीची सुटका झाली !

मंत्रालयात एके दिवशी एक महिला आली आणि तिने आपल्या मुलीला परदेशात कतारमध्ये बंदिस्त करून छळ करण्यात येत असल्याचे सांगितले. खुद्द मुलीने एके दिवशी लपून आईला दूरध्वनी करून ही माहिती दिली.

सलग तीन-चार दिवस ती मंत्रालयात येऊन आपल्या मुलीची सुटका करण्यासाठी धाय मोकलून रडायची. या घटनेची गंभीर दखल घेऊन मी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्याशी यासंदर्भात संपर्क साधला. त्यानंतर तातडीने सूत्रे हलविण्यात आली व तेथील भारतीय दूतावास कार्यालयामार्फत संबंधित मुलीची सुटका करण्यात आली. त्यानंतर एके दिवशी सुटका झालेली मुलगी व तिची आई दोघीही मंत्रालयात आल्या. माझे मनापासून आभार मानले व माझ्याबरोबर फोटोही काढला. हा आनंद वर्णनातीत असल्याचा अनुभव पंकजाताईंनी मुलाखतीदरम्यान सांगितला.

## पर्यावरण संवर्धन काळाची गरज : रामदास कदम

पर्यावरण आपल्या सर्वांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे ही समस्या आपल्यापुढे अधिक तीव्रपणे पुढे उभी ठाकली आहे. होळीच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यासाठी तसेच एकूण पर्यावरण संरक्षणासाठी असणाऱ्या शासनाच्या भूमिकेविषयी रामदास कदम यांनी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात माहिती दिली.

पदभार स्वीकारल्यानंतर प्रदूषणमुक्त महाराष्ट्र हे आपले उद्दिष्ट असल्याचे त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच एका प्रश्नोत्तरादरम्यान स्पष्ट केले. पर्यावरणाचा ऱ्हास हा मानवनिर्मित आहे. डोंगर ओसाड झाले असून झाडांची कत्तल मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मात्र, येत्या काळात या विरोधात कडक पावले उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रदूषण रोखण्यासाठी सरकार विविध पावले उचलत आहे. हवेचे प्रदूषण ही सर्वात मोठी समस्या आहे. ही समस्या सोडवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येणार आहे.

सांडपाण्याचा प्रश्न हा गंभीर आहे. यासाठी नगरपालिका, महानगरपालिकांनी




आपला २५ टक्के निधी हा प्रदूषण निवारण, सांडपाण्याची व्यवस्था पाहण्यासाठी खर्च केल्यास प्रदूषणास मोठ्या प्रमाणावर आळा बसेल, असे ते म्हणाले. कंपनीतील प्रदूषणयुक्त पाणी शुद्धीकरण होऊनच बाहेर येण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. प्रदूषणमुक्तीसाठी विविध धोरणांची अंमलबजावणी सरकार करणार असल्याचे ते शेवटी म्हणाले. शासनाने व्यापक जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. या कामांचे सकारात्मक परिणाम अगदी लवकरच नव्हे तर दोन ते तीन वर्षात दिसून येतील असेही पर्यावरणमंत्र्यांनी मुलाखतीदरम्यान सांगितले.

**– अतुल पांडे**

# समन्यायी विकास

**दिलखुलास कार्यक्रमात मार्च महिन्यात प्रसारित झालेल्या निवडक मुलाखतीचा सारांश**

अनुसूचित जाती-जमाती, नवबौद्ध आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सर्व स्तरांवर प्रयत्न करत असून अपंग, ज्येष्ठ नागरिक तसेच व्यसनमुक्तीसारख्या वेगवेगळ्या समस्येवर उपाययोजनेबरोबरच सर्व घटकांचा समन्यायी विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही 'दिलखुलास' कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी दिली.




ऑनलाइन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. तसेच जात प्रमाणपत्र देणे आणि जातवैधता ठरविणे यामध्ये अनुचित प्रकार होत होता त्याला आळा घालण्यासाठी यापुढे या कामाचे संगणकीकरण करून जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्राऐवजी कुटुंब प्रमुखाच्या नावे स्मार्ट कार्ड देण्याचा विभागाचा मानस आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाच्या दर्जाची सुधारणा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन रोजगाराच्या संधी, व्यसनमुक्ती धोरण, व्यसनमुक्ती ही एक वेगळी समस्या आहे. यावर सरकारने विशेष भर दिला आहे. यासाठी समाजाची मानसिकता बदलण्यासाठी शासन प्रचार आणि प्रसार करीत आहे. याबरोबरच अपंगांच्या धोरणाची अंमलबजावणी करताना अपंगांना सन्मानाची वागणूक, मागासवर्गीयांना घरकूल, नोकरीत आरक्षण तसेच इतर सुविधा मिळण्यासंदर्भात येणाऱ्या अंमलबजावणीची तपासणी होणेही तितकेच आवश्यक आहे. समाजातील महत्त्वाचा घटक म्हणून ज्येष्ठ नागरिकांचा सांभाळ आणि संरक्षण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक वृद्धाश्रम अथवा आधारगृहाची निर्मिती करण्यात येणार आहे. याबरोबरच तरुणांना विविध सेवा किंवा करिअरच्या संधी मिळाव्यात यासाठी नागपूर आणि पुणे याठिकाणी पूर्ण वेळ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यात येणार आहे.

माझ्या राजकीय आयुष्यात पहिल्यांदाच महत्त्वाचे मंत्रिपद मिळाले, हा माझ्यासाठी वेगळा अनुभव असल्याचे मनोगत बडोले यांनी कार्यक्रमात व्यक्त केले. प्राध्यापक जसे एखाद्या महाविद्यालयात वावरतात तोच आत्मविश्वास आणि सहजता त्यांच्या वागण्यातून दिसून येत होती.

मंत्री होण्यापूर्वी ते एक प्राध्यापक म्हणून काम करत होते. यामुळेच कदाचित कोठेही मोठेपणाचा किंवा एक मंत्री असल्याचा अविर्भाव त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात दिसत नव्हता.

**- मीरा ढास**

❐ ❐




## कल्पना सरोज यांची उद्योग भरारी



जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाने एक यशस्वी महिला उद्योजक बनलेल्या आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या श्रीमती कल्पना सरोज यांची मुलाखत दिलखुलास कार्यक्रमात प्रसारित करण्यात आली. कल्पना सरोज यांच्या जीवनकार्यावर टाकलेला हा प्रकाशझोत. त्यांचा जीवनप्रवास अतिशय खडतर आहे. अशा या प्रवासात विविध संकटांवर मात करून त्यांनी आपले जीवन यशस्वी केले आहे. सामाजिक कार्यकर्त्या ते बांधकाम व्यावसायिक हा प्रवास दिलखुलास कार्यक्रमातून कल्पना सरोज यांनी श्रोत्यांपुढे उलगडवून दाखवला. २ रुपये रोजंदारीवर काम करणाऱ्या आणि आज २ करोडची उलाढाल असलेल्या कमानी ट्यूबज या कंपनीच्या अध्यक्ष श्रीमती कल्पना सरोज यांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे. कल्पना सरोज यांचा जन्म अकोला जिल्ह्यातील एका छोट्या खेडेगावात झाला. घरची परिस्थिती सर्वसामान्यच होती. यानंतर १० व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. संयुक्त कुटुंबातील जबाबदारी पार पाडताना त्यांना शिक्षण घेण्याची इच्छा होत होती. मात्र ही इच्छा फलद्रूप होत नव्हती. अशा या मानसिक कुचंबणेवर मात करून त्यांनी आपला जीवनप्रवास घडवला. आज त्यांना देशातील पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर सर्वसामान्य कुटुंबातून उच्च ध्येय गाठता येते हे त्यांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.





# महासंधी

**महाराष्ट्रातील तरुणांना योग्य दिशा मिळावी हा दृष्टिकोन समोर ठेऊन नगरविकास आणि माहिती व जनसंपर्क विभागाच्या विद्यमान सचिव तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या तत्कालीन महासंचालक मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी 'महान्यूज' सुरू करताना या नावाशी साधर्म्य साधणारे आणि संधी उपलब्ध करून देणारे सदर 'महाऑप' (सध्याचे नोकरी शोधा) या नावाने सुरू केले. सहा वर्षांहून अधिक काळ लोटला तरी या सदराला मिळत असलेला प्रतिसाद वाढतच असल्याचे दिसून येत आहे.**

करिअरच्या विश्वात तरुण-तरुणींना उंच उडायचे असते. या विश्वात दररोज नवनवीन घडामोडी घडत असतात. त्यामुळे त्यांना आवश्यकता असते ती योग्य मार्गदर्शनाची. अनेक संधी उपलब्ध असताना देखील त्याची योग्य माहिती उमेदवारापर्यंत पोहचणे गरजेचे असते. हे काम महान्यूज नोकरी शोधा या सदरातून अविरत करत आहे.

ऑनलाइन विश्वाच्या जगात आज हजारो संकेतस्थळे विविध घडामोडींसंदर्भात माहिती पुरवित असतात. हा पसारा दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र प्रश्न असतो तो विश्वासाचा. 'महान्यूज'ने मजकुराबाबतची ही विश्वासार्हता टिकविण्याबरोबरच अचूक संधींची माहिती पुरविण्याची परंपराही कायम राखली आहे. महान्यूज सुरू झाले तेव्हा मी महासंचालनालयात नव्हतो, तरीही मागील सहा वर्षातील महान्यूजची वाटचाल आणि त्यात असलेले त्यांचे योगदान याविषयी अनेकदा ऐकले आणि महान्यूजच्या रूपाने पाहिले आहे. त्यामुळे म्हैसकर मॅडमच्याच भाषेत सांगायचे तर महान्यूज हे एक व्रत आहे आणि व्रत एकदा घेतले की ते टिकवून ठेवावे लागते. तशी याची वाटचाल सुरू आहे.

'महान्यूज'च्या संकेतस्थळावर आलेली माहिती ही विश्वासार्ह असते. त्यामुळेच एक प्रमाण म्हणून आपला ठसा उमटविण्यात 'महान्यूज' यशस्वी झाले आहे. यशकथा, योजना, फर्स्ट पर्सन, वाचावे असे काही अशा विविध सदरांमधील उपयुक्त मजकुराप्रमाणेच नोकरी शोधा या सदरातही केंद्र सरकार, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था, विद्यापीठ, रेल्वे, बँका, स्टाफ सिलेक्शन कमिशन आदी संबंधित निघालेल्या जाहिराती अपडेट केल्या जात असतात. कोणत्या विभागात कोणत्या पदाच्या किती जागा आहेत? त्याचे पात्रता निकष कोणते? पदांची एकूण संख्या किती? अर्ज करण्याची अंतिम मुदत कोणती? याची सुटसुटीत माहिती दिली जाते. शिवाय ज्या विभागाची जाहिरात असेल त्या विभागाचे संकेतस्थळ हायपरलिंकने प्रदर्शित केले जाते. जेणे करून पात्रताधारकांना त्या विभागाच्या संकेतस्थळावर केवळ एका क्लिकने पोहोचता येईल. उमेदवारांना जे क्षेत्र निवडायचे आहे, त्याविषयी माहिती त्यांना हवी असते, त्यामुळे उमेदवारांना असलेली माहिती मिळत असल्याने हे संकेतस्थळ अल्पावधीतच उमेदवारांच्या पसंतीत उतरले आहे. दररोज अनेक उमेदवार हे न चुकता 'नोकरी शोधा' या सदराला भेट देत असल्याची माहिती विविध माध्यमातून मिळत असते. आज 'नोकरी शोधा' हे सदर महान्यूजच्या विविध सदरांपैकी एक प्रमुख सदर बनले आहे.







स्पर्धात्मक परीक्षा आणि आपल्या भविष्याविषयी चिंतित असलेल्या उमेदवारांची 'महान्यूज' गरज बनले आहे. अचूक आणि नवनवीन संधीची माहिती महाराष्ट्रातील उमेदवारांना व्हावी, या उद्देशानेच महान्यूजमधील 'नोकरी शोधा' हे सदर यापुढेही चालविण्यासाठी 'टीम महान्यूज' कटिबद्ध आहे.

**- धीरज खडसे**




**टेकसेव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या पाच महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

'स्वच्छ भारत' अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'स्वच्छ महाराष्ट्र' अभियानाची सुरुवात करण्यात आल्यानंतर...

Maharashtra Government decides to implement Swachh Maharashtra all across Maharashtra, in Mission Mode, on the lines of Swachh Bharat.

राष्ट्रीय पुरस्कारावर मराठी चित्रपटांनी आपली मोहोर उमटविल्याबद्दल...

कोर्ट, एलिझाबेथ एकादशी, किल्ला, मित्रा या मराठी चित्रपटांच्या चमूचे विशेष अभिनंदन !!

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना प्रतिष्ठेचा 'टेलर' पुरस्कार जाहीर झाल्यानंतर

Congratulations to the eminent ecologist Dr Madhavji Gadgil for being named for the prestigious Tyler Prize for Environmental Achievement!

ज्येष्ठ अभिनेते शशी कपूर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्यानंतर ...

Congratulations to Legendary Actor Shashi Kapoorji for Dada Saheb Phalke Award & for being the third in the Kapoor family to get this honour.

जागतिक पाणी दिनानिमित्त राज्यातील जनतेला उद्देशून

On this World Water Day I pledge to save every possible drop of water and to preserve water sources, DO YOU? Save Water Save Life !

मराठी नववर्षानिमित्त डोंबिवलीत आयोजित शोभायात्रेतील सहभागानंतर

Pleased to witness the spectacular, traditional Kalyan-Dombivli Shobhayatra on auspicious Gudhi Padwa, this morning.

'महाराष्ट्राची लोकधारा' लोकनृत्य संस्कृती संपूर्ण देशात पोहचवणारे पद्मश्री शाहीर साबळे यांच्या निधनाने धक्का बसला.माझी विनम्र श्रद्धांजली!..

मुंबई मेट्रो प्रकल्पात बाधीत होणाऱ्या कुटुंबांना सरकार तुमच्या पाठीशी आहे हे सांगताना

Made a statement in Assembly on in-situ rehabilitation of residents of Kalbadevi, Girgaon & Malad, affected by Mumbai Metro 3 project.

80% of the affected residents have less than 300 sq ft homes.They will be given double this size in the same/nearby area,to rehabilitate.

मोनोरेलसेवा विस्कळीत झाल्यानंतर

Looking into Mumbai Monorail breakdown incident. Appointed Principal Secretary (Urban Development) to immediately initiate enquiry.

मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर

Maharashtra govt decides to increase the number of HC Judges from 75 to 94. This will help reduce the pendency of cases in the High Court. ❐ ❐

## भारतमातेच्या सुपुत्रांना अभिवादन

भारताच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतीची मशाल हाती घेऊन फाशी गेलेल्या भारतमातेच्या सुपुत्रांना अभिवादन करताना ...

Salutations to the revolutionaries & great sons of Bharat Mata Shaheed Bhagat Singh, Sukhdev & Rajguru on Shaheed Diwas !






महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२२४१
لوک راجیہ
उर्दू लोकराज्य
जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...७४२ भाग
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ५५ लाख
MAHARASHTRA
Ahead
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th April 2015
Date of Publication : 10th of every Month

# प्रतिबिंब बदलत्या महाराष्ट्राचे...




- जाणकारांचे लेख
- यशस्वितांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे

वार्षिक वर्गणी रु.१००

आज आणि उद्यासाठीही

# लोकराज्य

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक